



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ७ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०





# दिल्लीत पाच मजली इमारत कोसळून ५ जणांचा मृत्यू

## अनेक जण ढिगाऱ्याखाली; बेसमेंटमध्ये सुरू होते खोदकाम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशाची राजधानी दिल्लीतील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांचे केंद्र मानल्या जाणाऱ्या सत्य निकेतन परिसरात रविवारी एक अत्यंत भीषण आणि काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना घडली आहे. सुमारे ४० ते ५० वर्षे जुनी असलेली ५ मजली इमारत अचानक पत्त्यासारखी कोसळली. या इमारतीत दिल्ली विद्यापीठासह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी पेइंग गेस्ट म्हणून राहत होते. या दुर्घटनेत ५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, अनेक विद्यार्थी आणि नागरिक ढिगाऱ्याखाली दबले गेले आहेत. जखमींना तात्काळ एम्सच्या ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. घटनेच्या वेळी इमारतीच्या तळघरात अनधिकृत



दुरुस्ती आणि खोदकामाचे काम सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशामक दल, स्थानिक पोलीस आणि एनडीआरएफच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आलेल्या ७ जखमींना तातडीने एम्स ट्रॉमा सेंटरमध्ये नेण्यात आले, त्यापैकी २ विद्यार्थ्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. इतर जखमींवर उपचार सुरू आहेत. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, या ५ मजली इमारतीत २० ते २५ खोल्या होत्या आणि प्रत्येक खोलीत २-२ विद्यार्थी राहत होते. इमारत कोसळली तेव्हा ५० पेक्षा जास्त विद्यार्थी आत उपस्थित होते. आतापर्यंत ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे.

ढिगाऱ्याखाली दबलेल्या एका विद्यार्थ्याने ☞(पान २ वर)

### ■ मालक आनंद बन्सलविरोधात FIR दाखल

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळमजल्यावरील बेसमेंटमध्ये सुरू असलेल्या निष्काळजी दुरुस्तीच्या कामामुळेच हा मोठा अपघात घडल्याचा प्राथमिक संशय आहे. इमारतीचा मालक आनंद बन्सल (रा. गुरुग्राम) याच्याविरोधात दिल्ली पोलिसांनी निष्काळजीपणा आणि मानवी जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# रेबीज लस 'अभयरॅब'चा एक संच निकृष्ट दर्जाचा

## 'DCGI'कडून देशभरात सतर्कतेचा इशारा

### कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारताच्या औषध नियामक प्राधिकरणाने रेबीजवरील प्रसिद्ध लस 'अभयरॅब'चा एक संच प्रयोगशाळा चाचणीत निकृष्ट आणि बनावट असल्याचा संशय व्यक्त केला आहे. यानंतर देशभरातील औषध नियामकांना तत्काळ पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.कसौली येथील मध्यवर्ती औषध प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत संच क्रमांक केई २५०१२ मधील नमुना आवश्यक गुणवत्तेनुसार नसल्याचे स्पष्ट झाले. औषध महानियंत्रक राजीव सिंह रघुवंशी यांनी २७ ऑगस्ट रोजी सर्व राज्यांच्या औषध नियामकांना पत्र लिहून या संचाच्या वितरणावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आणि आवश्यक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. 'इंडियन इम्युनोलॉजिकल्स लिमिटेड'ने स्पष्ट केले आहे की, संशयित नमुने दिल्लीतील मुखर्जीनगर येथील एका अनधिकृत




निवासी परिसरातून जप्त करण्यात आले होते. प्रयोगशाळेतील १७ विसंगतींवरून हे सिद्ध होते की या बाटल्या कंपनीने तयार केलेल्या नाहीत. कंपनीनुसार, नोव्हेंबर २०२५ मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाल्यानंतर या संचाच्या ८३,३७० अधिकृत बाटल्या बाजारात पाठवण्यात आल्या होत्या. अधिकृत रुग्णालये आणि नोंदणीकृत फार्मसींमधील लस पूर्णपणे सुरक्षित असून याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आतापर्यंत चार जणांना अटक केली आहे.

**भारतात रेबीजचे मोठे आव्हान-** आयसीएमआरच्या अहवालानुसार, भारतात दरवर्षी सुमारे ९१ लाख प्राणी ☞(पान २ वर)

## सत्य निकेतन दुर्घटनेनंतर दिल्लीत संतापाचा भडका!

# ABVP कडून सिविक सेंटरमधील MCD मुख्यालयाची तोडफोड

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशाच्या राजधानीतील सत्य निकेतन भागात ५ मजली इमारत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेचे तीव्र पडसाद आता दिल्लीच्या रस्त्यांवर उमटू लागले आहेत. या दुर्घटनेत आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला असून ५ जण गंभीर जखमी आहेत. या घटनेनंतर विद्यार्थी संघटनांचा संताप अनावर झाला असून, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी थेट सिविक सेंटर येथील दिल्ली महानगरपालिका मुख्यालयावर धडक देत जोरदार निदर्शने आणि तोडफोड केली.

सत्य निकेतन दुर्घटनेला महापालिकेचा निष्काळजीपणा थेट जबाबदार असल्याचा आरोप करत, आंदोलक विद्यार्थ्यांनी श्ण्ङ आयुक्तांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

सुमारे १५० ते २०० विद्यार्थी कार्यकर्ते सिविक



सेंटर येथे जमा झाले. आंदोलक गेट क्रमांक ५ मधून सिविक सेंटरच्या आवारात घुसले आणि त्यांनी मुख्य इमारतीबाहेर ठिय्या मारून एमसीडीच्या भ्रष्ट कारभाराविरोधात जोरदार ☞(पान २ वर)

# नक्षलवाद आता भूतकाळातील गोष्ट; काश्मीरमध्ये दहशतवादही शून्याच्या दिशेने, अमित शाह यांचं मोठं विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यानंतर फुटीरतावादात मोठी घट झाली असून, दहशतवादाचे प्रमाणही हळूहळू शून्याच्या दिशेने सरकत आहे, असा दावा शाह यांनी केला. त्याचबरोबर नक्षलवाद आता 'भूतकाळातील गोष्ट' बनला असल्याचेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, दहशतवादी कारवायांमध्ये सातत्याने घट होत असून, प्रदेश विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात असल्याचे त्यांनी नमूद केले. दुसरीकडे, देशातील नक्षलवादविरोधातील कारवाईलाही मोठे यश मिळाले असून, नक्षलवादाचे आव्हान आता जवळपास संपुष्टात आला आहे. सुरक्षा दलांची प्रभावी कारवाई, विकासकामांना चालना आणि केंद्र-राज्य यंत्रणांमधील समन्वयामुळे नक्षल प्रभावित भागातील परिस्थितीत मोठा बदल झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**२०१९ पासून २६४ फरार आरोपींचे प्रत्यार्पण; न्यायालयासमोर हजर**

विविध गुन्हे करून देशातून परदेशात पळून गेलेल्या फरार आरोपींचा माग काढण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या मोहिमेला यश मिळत आहे. २०१९ पासून आतापर्यंत २६४ फरार आरोपींचे प्रत्यार्पण करून त्यांना भारतीय न्यायालयांसमोर हजर करण्यात आले, अशी माहिती शहा यांनी दिली. देशात गुन्हा केल्यानंतर



परदेशात आश्रय घेऊन कायद्याच्या कचाट्यातून सुटण्याचा प्रयत्न [illegible] गुन्हेगारांविरोधात केंद्र सरकारने विशेष मोहीम हाती घेतली आहे. विविध केंद्रीय तपास यंत्रणा, राज्य पोलीस आणि परदेशातील संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून अशा फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे, असे ते म्हणाले. गुन्हेगार कितीही दूर पळाला तरी भारतीय कायद्यापासून सुटका नाही, अशी भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.'

**फरार आरोपींच्या प्रत्यार्पणासाठी 'भारत-पोल'**

दरम्यान, देशातून परदेशात पळून गेलेल्या व फरार घोषित करण्यात आलेल्या आरोपींना भारतात परत आणण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या 'भारत-पोल' प्रणालीमुळे केंद्रीय तपास यंत्रणा आणि राज्य पोलिसांमधील समन्वय अधिक मजबूत झाला आहे.फरार ☞(पान २ वर)

# इस्रोमधील शास्त्रज्ञांच्या नोकऱ्या जाणार?

### ९ कर्मचारी संघटनांचे अध्यक्षांना थेट पत्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोच्या संशोधन आणि उत्पादन प्रक्रियेत खासगी कंपन्यांचा शिरकाव करण्याच्या हालचालींवरून संस्थेमध्ये अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे. इन-स्पेसचे अध्यक्ष पवन गोएंका यांच्या एका विधानामुळे इस्रोच्या हजारो शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांमध्ये नोकरीची सुरक्षा व संस्थेच्या अस्तित्वाबाबत भीतीचे वातावरण तयार झाले आहे. या पार्श्वभूमीवर इस्रोच्या देशभरातील विविध केंद्रांतील ९ प्रमुख कर्मचारी संघटनांनी थेट इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांच्याकडे धाव घेत लेखी हमीची मागणी केली आहे.

केंद्र सरकारच्या अंतराळ विभागांतर्गत काम करणाऱ्या 'इन-स्पेस'चे अध्यक्ष पवन गोएंका यांनी सार्वजनिकरीत्या स्पष्ट केले होते की, भविष्यात उपग्रह आणि प्रक्षेपक वाहने यांची नियमित निर्मिती पूर्णपणे खासगी कंपन्या व सार्वजनिक उपक्रमांकडे सोपवण्यात येईल. इस्रोचे काम भविष्यात केवळ प्रगत संशोधन आणि अत्यंत गुंतागुंतीच्या अंतराळ मोहिमांपर्यंतच मर्यादित ठेवले जाईल. या विधानामुळे इस्रोच्या वर्कफोर्समध्ये संभ्रम निर्माण झाला असून, हे




धोरण केंद्र सरकारचे आहे की केवळ इन-स्पेसचा वैयक्तिक अजेंडा, असा थेट सवाल कर्मचारी संघटनांनी उपस्थित केला आहे.

**'दशकांची मेहनत खासगी हाती सोपवू नका'; कर्मचाऱ्यांचे ३ मोठे आक्षेप-** कर्मचारी संघटनांनी अध्यक्षांना पाठवलेल्या संयुक्त निवेदनात अत्यंत आक्रमक भूमिका मांडली आहे. रॉकेटची रचना, भाग जोडणे, चाचणी आणि प्रक्षेपण ही केवळ सामान्य मॅन्युफॅक्चरिंगची कामे नाहीत. ही भारताची धोरणात्मक ताकद असून ती देशातील करदात्यांच्या पैशातून आणि शास्त्रज्ञांच्या अथक परिश्रमातून ☞(पान २ वर)

## ऑपरेशन सिंदूरमधील शानदार नेतृत्वासाठी

# नागपूरच्या तुषार साखरे यांचा सन्मान!

**नागपूर/प्रतिनिधी :** ऑपरेशन सिंदूरदरम्यान अमृतसर विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था सक्षमपणे सांभाळत, हाय अलर्टच्या काळात प्रभावी नेतृत्व करणारे नागपूरचे वरिष्ठ कमांडंट तुषार ज्ञानेश्वर साखरे यांना प्रतिष्ठित महानिदेशक (DG) / CISF डिस्क (सिल्व्हर) ने सन्मानित करण्यात आले आहे. साखरे सध्या सीआयएसएफ युनिट एएसजी, अमृतसर येथे वरिष्ठ कमांडंट म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या गौरवामुळे नागपूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



वर्ष २०२५ मध्ये ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर अमृतसर विमानतळावर सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर होती. या काळात साखरे यांनी सुरक्षा व्यवस्थेच्या तयारीचे बारकाईने निरीक्षण करत विविध यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. बदलत्या परिस्थितीवर लक्ष ठेवून तातडीने निर्णय घेणे, सुरक्षा पथकांचे योग्य नियोजन करणे आणि विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था सुरळीत ठेवण्यात त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाबरोबरच परिचालन सज्जता, काटेकोर पर्यवेक्षण आणि कर्तव्याप्रती असलेल्या निष्ठेची दखल घेत त्यांना महानिदेशक डिस्क (सिल्व्हर) प्रदान करण्यात आली. हा सन्मान त्यांच्या ☞(पान २ वर)

# लोकांना वाईट वाटलं तर वाटू द्या, डीजे बंदी झालीच पाहिजे- शिरसाट

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आणि मिरवणुकांमध्ये होणाऱ्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजावरून सध्या राज्यात डीजे बंदीची जोरदार चर्चा सुरू आहे. या मुद्द्यावर आता सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी रोखठोक भूमिका मांडली आहे. 'डीजे बंदीमुळे कोणाला वाईट वाटत असेल तर वाटू द्या, पण लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्यासाठी राज्यात डीजेवर बंदी आलीच पाहिजे,' अशी मागणी शिरसाट यांनी केली आहे.



डीजेच्या अति आवाजामुळे होणाऱ्या त्रासावर बोट ठेवत संजय शिरसाट म्हणाले, 'डीजेच्या दणदणाटामुळे लोकांना त्रास होतो. लहान बालकं, वयोवृद्ध नागरिक आणि गंभीर आजारी असलेल्या रुग्णांना याचा त्रास सहन करावा लागतो. या आवाजामुळे लहान मुलं तर मिरवणुकीत येऊही शकत नाहीत आणि ती पाहूही शकत नाहीत. ज्या-ज्या भागातून या मिरवणुका जातात, तेथील स्थानिक रहिवाशांना किती मनस्ताप होतो, हे आपण अजिबात नाकारू शकत नाही.' ☞(पान २ वर)



# शिंदेसेनेला आणखी एक झटका, शिक्षणमंत्री दादा भुसेंच्या अधिकारांवर कात्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारमध्ये पुढच्याकाळात अंतर्गत वाद वाढण्याची चिन्हं आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय फिरवल्यानंतर आता शिक्षणमंत्री दादा भुसेंना धक्का बसलाय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे निकटवर्तीय असलेल्या दादा भुसेंकडील महत्त्वाच्या अधिकारांना कात्री लावण्यात आलीये. प्रशासकीय कारभारात सुधारणा आणि गतिमानता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलाय. नव्या नियमांनुसार, शिक्षणमंत्र्यांकडील कोणत्या अधिकारांवर कात्री लावण्यात आलीये?... ते पाहूयात

स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या अतिरिक्त तुकड्या, शाखांना मान्यता देणे आणि विविध मंडळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आता सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे असणार आहेत. अस्तित्वात असलेल्या शाळांच्या वर्ग वाढीसाठी मान्यता पत्र देण्याचे अधिकार विभागाच्या प्रधान सचिवांकडे सोपवण्यात आलेत. आता शालेय शिक्षणमंत्र्यांकडे असणाऱ्या अधिकारांवर कात्री लावल्यानं आता मंत्रीस्तरावरील निर्णयांची व्याप्ती कमी होणार आहे.

दुसरीकडे, आम्हीच हा निर्णय घेतल्याचं सांगत शिक्षणमंत्र्यांनी अधिकारांना कात्री लावल्याच्या चर्चा फेटाळून लावल्यात... तर विरोधकांनी मंत्र्यांच्या सक्षमतेवरच प्रश्न उपस्थित केलेत... खरंतर, राज्यात जवळपास ३१ हजार खासगी शाळा आहेत. प्रत्येक खासगी ☞(पान २ वर)

# SIR प्रक्रियेमुळे ३५ वर्षांनंतर झाली दोन सख्ख्या भावांची भेट

## बीएलओच्या एका फोनमुळे दोन कुटुंब आले एकत्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशभरातील विविध राज्यात मतदारयादीचे विशेष सखोल फेरतपासणी सुरू आहे. एसआयआरच्या प्रशासकीय कामामुळे हरियाणात दोन सख्ख्या भावांचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेल्याची सुखद घटना समोर आली. तब्बल ३५ वर्षांपूर्वी ताटातूट झालेले दोन सख्खे भाऊ पुन्हा एकत्र आले. हरियाणाच्या जिंद जिल्ह्यातील मनोहरपूर येथील शासकीय वरिष्ठ माध्यमिक विद्यालयात घडलेल्या या भावनिक भेटीमुळे गावकऱ्यांचे डोळे पाणावले. पंजाबमध्ये राहणारे सीताराम हे आपला शाळा सोडल्याचा दाखला आणण्यासाठी जिंदच्या मनोहरपूर येथील शाळेत गेले होते. त्याच वेळी तिथे एसआयआर प्रक्रियेचे काम सुरू होते. प्रक्रियेचा भाग म्हणून बूथ लेव्हल ऑफिसरने सीताराम



यांच्याकडे त्यांच्या मूळ गावाची माहिती, वडिलांचे नाव आणि कुटुंबाचा तपशील विचारला. ही माहिती देत असताना सीताराम यांनी आपले बंधू दलबीर सिंह यांचा उल्लेख केला.

सीताराम यांनी दिलेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी संबंधित बीएलओने दलबीर सिंह यांच्याशी फोनवरून संपर्क साधण्याचा निर्णय घेतला आणि तिथूनच या सुखद पुनर्मिलनाचा मार्ग मोकळा झाला.

**एका फोन कॉलने संपवला ३५ वर्षांचा शोध-** अधिकाऱ्याने सीताराम यांचे नाव घेताच पलीकडून बोलणाऱ्या दलबीर सिंह यांनी क्षणाचाही विलंब न लावता त्यांना ओळखले. 'सीताराम माझा सख्खा भाऊ असून मी गेल्या ३५ वर्षांपासून त्याचा शोध घेत आहे,' असे दलबीर यांनी बीएलओला सांगितले. ही माहिती मिळताच दलबीर सिंह यांनी तातडीने शाळेच्या ☞(पान २ वर)



# बेपत्ता मूकबधिर तरुणीचा अखेर लागला शोध

## -बडनेरा पोलिसांची यशस्वी कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलिसांनी तब्बल ११०० किलोमीटरचा खडतर प्रवास करून आणि राजस्थानातील विविध शहरांचे रस्ते धुंडाळून एका हरवलेल्या मूकबधिर व मतिमंद तरुणीला अत्यंत सुरक्षितपणे शोधून तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले आहे. पोलिसांच्या या कार्य प्रणालीची सर्वत्र प्रशंसा होत आहे. बडनेरा येथील पंचशील नगर, नवी वस्ती परिसरामध्ये राहणारी २६ वर्षीय मूकबधिर व मतिमंद तरुणी नेहा परवीन अब्दुल आरिफ ही २४ ऑगस्ट रोजी अचानक घरातून निघून गेली. मुलगी अचानक बेपत्ता झाल्याने तिच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांनी तत्काळ पोलिसांत धाव घेतली. या गंभीर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके



आणि सहाय्यक आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेऱ्याचे ठाणेदार हनमंत उरलागोंडावार यांच्या नेतृत्वात एक विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत २६ ऑगस्ट रोजी बडनेरा रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेजची कसून पाहणी केली. यामध्ये हरवलेली मुलगी २४ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता बडनेरा रेल्वे स्थानकावरून राजस्थानातील जोधपूरकडे जाणाऱ्या 'भगत की कोठी' या रेल्वेत बसून गेल्याचे निष्पन्न झाले.मुलगी राजस्थानच्या दिशेने गेल्याची माहिती मिळाल्यानंतर हेड कॉन्स्टेबल सचिन श्रीवास आणि कॉन्स्टेबल धनराज ठाकूर यांनी राजस्थानाकडे प्रवास सुरू केला.सलग २० दिवस विविध रेल्वे स्थानकांचे सीसीटीव्ही फुटेज तपासणे, ऑटोरिक्षा चालकांकडे आणि स्थानकांवर चौकशी करणे असा खडतर प्रवास त्यांनी केला. अखेर जोधपूर शहरातील शास्त्रीनगर भागातील अपना घर या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, ती मूकबधिर तरुणी तिथे सुखरूप असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांच्या या संवेदनशील कामगिरीमुळे एका कुटुंबाला पुन्हा त्यांची लेक सुखरूप भेटली असून, सर्वत्र या खाकी वर्दीतील देवमाणसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

# यशोदा नगरमध्ये घरात घुसून मारहाण व वाहनांची तोडफोड करणारे जेरबंद

## पोलिसांनी काढली आरोपीची धिंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील यशोदा नगर नंबर-२ मध्ये रात्रीच्या वेळी एका घरात जबरदस्तीने घुसून कुटुंबीयांना मारहाण करणे आणि घराबाहेर उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड केल्याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत ८ आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींना घटना स्थळी नेऊन 'सीन रिक्रिएशन' देखील केले, त्यावेळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. आर्यन शैलेंद्र राऊत (२०, यशोदा नगर), अखिल संतोष इंगळे (१९, फ्रेजरपुरा), सक्षम प्रकाश सोनके (१९, महादेव खोरी), तेजस अनिल थोरात (१९, क्लासिक बार च्या मागे), सुजल मनीष नागदिवे (१९, फ्रेजरपुरा गल्ली नंबर ३), शैलेश छोटू रोडगे (२०, सिद्धार्थ चौक गल्ली नंबर एक), यश उर्फ चारू चरणदास मेश्राम (२१, सिद्धार्थ क्रीडा मंडळ), आर्यन उर्फ डोंनची श्रीकृष्ण वासनिक (२०, सिद्धार्थ क्रीडा मंडळ) अशी अटक आरोपींचे नाव आहे.तुषार ज्ञानेश्वर दुपारे (वय २०) याने दिलेल्या तक्रारीनुसार, ३ सप्टेंबर रोजी रात्री ११.४५ वाजता ही घटना घडली. ३ सप्टेंबरच्या सायंकाळी यशोदा नगर चौकातील तुषारच्या वडापावच्या दुकानावर



नाश्त्याच्या पैशावरून दोन तरुणांसोबत वाद झाला होता. तुषारचे वडील ज्ञानेश्वर दुपारे यांनी वाद न करण्यास सांगितले असता संबंधित तरुणांनी त्यांना शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली. त्यानंतर रात्री ११.४५ वाजता राऊत, त्याचा मुलगा क्रिश राऊत, प्रीत चिंचखेडे, यश मेश्राम, अखिल सह ५ ते ६ जण हात चाकू, तलवार आणि काठ्या घेऊन दुपारे कुटुंबाच्या घरात घुसले. त्यांनी ज्ञानेश्वर दुपारे आणि निखिल दुपारे यांना शिवीगाळ करून मारहाण केली.कुटुंबाने घराचा दरवाजा बंद करून घेतल्यावर आरोपींनी दगड आणि विटा मारून दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला. तसेच चाकू आणि तलवारीने दरवाजावर वार केले. घरासमोर उभ्या असलेल्या बजाज पल्सर, होंडा शाईन, प्लेझर मोपेड, बजाज ऑटो, होंडा ॲक्टिवा आणि बजाज सिटी अशा ६ वाहनांचीही तोडफोड केली. या घटनेत सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार आहे.तक्रार मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी तत्काळ कारवाई सुरू केली. डीबी स्कॉडच्या पथकाने यशोदा नगर निवासी आर्यन शैलेंद्र राऊत (वय २०) सह ८ आरोपींना अटक केली. अटक केलेल्या काही आरोपींविरुद्ध यापूर्वीही शरीराविरुद्धचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात फ्रेजरपुराचे ठाणेदार रवींद्र राजुलवार यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे, डीबी पथक प्रमुख पीएसआय राहुल महाजन,सुरज यादव, अखिल दळवी, जयेश परीवाले, रोशन वऱ्हाडे, प्रशांत वानखडे, सागर चव्हाण, जावेद पटेल, धर्मा शिंदे, प्रशांत नेवारे, सतीश पराळे, दिनेश नेमाडे यांनी केली.

# १ व १० वरील उर्वरित

## दिल्लीत पाच मजली इमारत

मोबाईलवरून स्वतःचा व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर शेअर करत 'मला वाचवा' अशी आर्त हाक दिली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या त्याच्या मित्राने सांगितले की, तो ढिगाऱ्याखालून फोन करून सातत्याने मदतीची याचना करत होता.इमारत ४० ते ५० वर्षे जुनी असतानाही कोणत्याही

सुरक्षेच्या नियमांचे पालन न करता बेसमेंटमध्ये खोदकाम सुरू होते. त्यामुळे पाया कमकुवत होऊन अख्खी ५ मजली इमारत कोसळल्याचे निष्पन्न झाले आहे.

**गृहमंत्री अमित शाहंकडून घटनेची गंभीर दखल**

या दुर्घटनेनंतर देशातील राजकीय वर्तुळातूनही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत शोक व्यक्त केला. त्यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री, पोलीस आयुक्त आणि एनडीआरएफच्या महासंचालकांशी थेट फोनवरून चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला आणि मदतकार्य अधिक वेगवान करण्याचे निर्देश दिले. सध्या एनडीआरएफच्या पथकांकडून ढिगारा हटवण्याचे काम वेगाने सुरू असून मलब्याखाली अजूनही काही विद्यार्थी अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**'प्रत्येक विद्यार्थ्याचा जीव अमूल्य' - राहुल गांधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तीव्र चिंता व्यक्त करत म्हटले, 'महाविद्यालयांमध्ये पुरेशी वसतिगृहे नसल्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच छताखाली ४०-४० च्या संख्येने अशा अमानवी आणि असुरक्षित पीजीमध्ये राहावे लागते. विद्यार्थ्यांचे आयुष्य आधीच संघर्षाचे असते, त्यात आता ही परिस्थिती जीवघेणी बनली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचा जीव मौल्यवान असून मदत पथकांनी प्रत्येकापर्यंत पोहोचावे.'

## रेबीज लस 'अभयरॅब'चा एक संच

चावण्याच्या घटना घडतात. यापैकी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रकरणे कुत्रे चावल्याची असतात. देशात रेबीजमुळे दरवर्षी ५,७०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू होतो. अशा परिस्थितीत देशांतर्गत बाजारात ४० टक्के वाटा असणाऱ्या 'अभयरॅब'च्या बनावट बाटल्या मिळणे ही चिंतेची बाब ठरली आहे.

**मूळ व जप्त नमुन्यात १७ विसंगती**

चाचणी केलेल्या बाटलीमध्ये आणि उत्पादक कंपनीकडील अधिकृत संदर्भ नमुन्यात तब्बल १७ मोठे फरक आढळले आहेत : लेबल डिझाइन आणि आर्टवर्क, क्यूआर कोड पडताळणी, बाटलीच्या झाकणाचा रंग, पॅकेजिंगवरील मजकूर आणि परवाना तपशील.

## सत्य निकेतन दुर्घटनेनंतर

घोषणाबाजी सुरू केली. घोषणाबाजी सुरू असतानाच संतप्त कार्यकर्त्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीत बळजबरीने घुसण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान कार्यालयाच्या मालमत्तेची तोडफोड करण्यात आली. इमारतीत शिरण्यापासून रोखणाऱ्या पोलिसांशी आंदोलकांची तीव्र धक्काबुक्की झाली. पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत सुमारे १५ प्रमुख विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले असून त्यांना कमला मार्केट पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे. त्यांच्यावर दिल्ली पोलीस कायद्यान्वये कारवाई सुरू आहे.

'प्रशासनाला लाज वाटली पाहिजे' - ँञ्झ चा घणाघात

कारवाईनंतर आक्रमक झालेल्याँञ्झ नेत्यांनी महापालिका आणि दिल्ली पोलिसांवर सडकून टीका केली. 'ढिगाऱ्याखाली निष्पाप विद्यार्थी आणि कामगार गुदमरून मरत असताना दिल्ली पोलीस आणि प्रशासन जबाबदार एमसीडी अधिकाऱ्यांना अटक करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्याउलट न्यायाची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जात आहे,' असा संताप व्यक्त करण्यात आला.

## नक्षलवाद आता भूतकाळातील

आरोपींचा शोध घेणे, त्यांच्याविरोधातील माहिती विविध यंत्रणांमध्ये सामायिक करणे आणि प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुलभ करणे, यासाठी 'भारत-पोल' महत्त्वाची भूमिका बजावत असून या प्रणालीमुळे केंद्रीय यंत्रणा आणि राज्य पोलिसांना अधिक प्रभावीपणे एकत्रित काम करता येत आहे.परदेशात लपून बसलेल्या गुन्हेगारांना भारतात परत आणण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.'

## इस्रोमधील शास्त्रज्ञांच्या नोकऱ्या

उभी राहिली आहे. नियमित ऑपरेशन्स खासगी कंपन्यांकडे दिल्यास इस्रोमधील सध्याच्या कर्मचाऱ्यांचे भवितव्य काय? नवीन भरती आणि पदोन्नती प्रक्रियेवर याचा विपरीत परिणाम होणार नाही, याची लेखी हमी व्यवस्थापनाने द्यावी. संपूर्ण यंत्रणा बाहेरील कंपन्यांवर सोपवल्याने इस्रोची मूळ वैज्ञानिक चौकट खिळखिळी होईल.

## ऑपरेशन सिंदूरमधील शानदार

व्यावसायिक कौशल्याची आणि उत्कृष्ट सेवाभावाची पावती मानला जात आहे.

तुषार साखरे हे मूळचे नागपूरच्या वैशाली नगर-बिनाकी लेआउट परिसरातील रहिवासी आहेत. सीआयएसएफमधील उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना यापूर्वीही राष्ट्रपती पोलीस पदक तसेच 'डीजी डिस्क (कांस्य)'ने सन्मानित करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरसारख्या संवेदनशील परिस्थितीत महत्त्वाची जबाबदारी समर्थपणे पार पाडून पुन्हा एकदा प्रतिष्ठित सन्मान मिळवल्याने साखरे यांच्या कुटुंबीयांसह नागपूरकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## लोकांना वाईट वाटलं तर वाटू द्या,

शिरसाट म्हणाले, उत्सवाचा आनंद आणि परंपरा जपली पाहिजे, पण दुसऱ्यांच्या जिवाशी खेळून उत्सव साजरा करणे योग्य नाही. डीजे बंदीचा निर्णय घेतल्यास काही लोकांची नाराजी ओढवून घ्यावी लागली तरी चालेल, पण समाजाच्या व्यापक हितासाठी कठोर पावले उचलणे काळाची गरज असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

## शिंदेसेनेला आणखी एक झटका

शाळेला प्रत्येक नवीन वर्ग वाढवण्यासाठी मान्यतापत्र हवे असल्यास राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या कार्यालयात पर्यायाने मंत्र्यांकडे खेपा माराव्या लागत होत्या. त्यामुळे शाळाचालकांकडून या निर्णयाचं स्वागत होतंय. तर दुसरीकडे, परिवहनमंत्र्यांनंतर शिंदेसेनेच्या आणखी एका मंत्र्यांचे अधिकार काढून घेतल्यानं भविष्यात महायुतीत अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता आहे.

## एंईं प्रक्रियेमुळे ३५ वर्षांनंतर झाली

दिशेने धाव घेतली.

शाळेच्या आवारात ३५ वर्षांनंतर हे दोन बंधू समोरासमोर आले, तेव्हा दोघांनाही अश्रू अनावर झाले. एकमेकांना मिठी मारून रडणाऱ्या या भावांना पाहून शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकारीही भावुक झाले होते. यानंतर दलबीर सिंह सीताराम यांना आपल्या दुचाकीवरून घरी घेऊन गेले.

प्रशासकीय प्रक्रियेचे कौतुक

मतदार पडताळणीदरम्यान अधिकाऱ्याने प्रसंगावधान राखून केलेला एक फोन कॉल या दोन भावांमधील दुवा ठरला. या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले अतिरिक्त साहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी डॉ. रमेश कुमार यांनी टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना सांगितले की, 'केवळ शासकीय औपचारिकता वाटणाऱ्या या कामामुळे इतक्या वर्षांनी विभक्त झालेल्या कुटुंबाची पुन्हा भेट घडू शकते, हे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.'

सीताराम पंजाबमध्ये स्थायिक

सीताराम दिव्यांग असून त्यांनी शाळेत असतानाच घर सोडले होते. ते पंजाबमध्ये गेले आणि तिथे त्यांनी एका खासगी शाळेत शिपाई म्हणून नोकरी स्वीकारली. एसआयआर प्रक्रियेसाठी ते शाळेतील नोंदणीचे प्रमाणपत्र आणण्यासाठी गेले होते.

## वाघिणीच्या हल्ल्यात २०

धावले. गावकऱ्यांचा गोंधळ ऐकून वाघीण पळून गेली, मात्र तोपर्यंत या तरुणीचा मृत्यू झाला होता.

ही वाघीण गेल्या काही दिवसांपासून या परिसरात फिरत असून तिने यापूर्वी मोर्शी तालुक्यातील भांबोरा येथे एका ५२ वर्षीय शेतकऱ्याचा बळी घेतला होता. त्यानंतर सुमारे ५० किलोमीटरचा प्रवास करत ती चांदूर बाजार तालुक्यात दाखल झाली. दोन दिवसांपूर्वी रिद्धपूर शेतशिवारात एका गायीवर हल्ला केल्यानंतर, रविवारी सकाळी जालनापूर रस्त्यालगत ही वाघीण चालताना दिसून आली होती. त्यानंतर सकाळी १० वाजताच्या सुमारास सोनोरी येथील झुडपी जंगलात या वाघिणीने दोन शेळ्यांची शिकार केली.

सकाळी शेळ्यांची शिकार आणि सायंकाळी तरुण मुलीचा बळी गेल्यामुळे सोनोरी परिसरातील नागरिक अत्यंत संतप्त झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच चांदूर बाजार आणि ब्राम्हणवाडा थडी पोलिसांचा ताफा तसेच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वनविभाग आणि पोलीस बंदोबस्त तैनात असतानाही ही दुर्घटना घडल्याने संतप्त जमावाने वनविभागाच्या वाहनांची तोडफोड केली. या नरभक्षी वाघिणीला तातडीने जेरबंद किंवा ठार करण्याची तीव्र मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

## पैशाच्या वादातून

त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र तेथे उपचार न झाल्याने त्याला पुन्हा घरी आणण्यात आले. दरम्यान, रात्री उशिरा मोहनचा मृत्यू झाला. घटनेची तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली नव्हती. मोहनची पत्नी काजल गेल्या दोन वर्षांपासून माहेरी राहत होती. पतीच्या मृत्यूची माहिती मिळताच ती वरूड येथे परतली आणि तिने पोलिसांना घटनेची माहिती दिली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी गजानन काळे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास वरूड पोलीस करीत आहेत.

## पीक कर्जासाठी स्टॅम्प

असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत. सर्व बँकांसाठी पीक कर्जाच्या कागदपत्रांबाबत एकसमान नियम आहेत का, की संबंधित बँकांच्या अंतर्गत धोरणानुसार ही प्रक्रिया बदलते, याबाबत प्रशासनाने स्पष्टता देण्याची गरज व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांकडून अनावश्यक खर्च होऊ नये आणि पीक कर्जाच्या प्रक्रियेत गैरसमज निर्माण होऊ नयेत, यासाठी तहसील प्रशासन, सहकार विभाग व संबंधित बँक प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांबाबत अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, अशी मागणी होत आहे.

या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही काही शेतकरी करीत असून, जर स्टॅम्प पेपर व प्रतिज्ञापत्राची अट नियमानुसार आवश्यक असेल, तर त्याबाबत सर्व बँकांमध्ये एकसमान पद्धतीने अंमलबजावणी करावी. मात्र, ही अट आवश्यक नसल्यास शेतकऱ्यांकडून अतिरिक्त खर्च करून घेऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पीक कर्जाच्या प्रक्रियेत नेमके कोणते कागदपत्र आवश्यक आहेत आणि स्टॅम्प पेपरचे मूल्य किती असावे, याबाबत शासनाने तातडीने स्पष्टता करून दिलासा द्यावा, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहे

## एसटी कामगारांच्या हक्कासाठी

उपाययोजना करण्याचे व्हिजन शिवप्रहार कामगार सेनेच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. शिवप्रहार संघटनेची स्थापना राज्याचे नेते व शिवसेना नेते एकनाथराव शिंदे , खासदार श्रीकांत शिंदे आणि प्रतापजी सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून, आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत आज 'शिवप्रहार कामगार सेने'ची घोषणा करण्यात आली. बैठकीस लातूरचे व्यंकटराव बिरादार, साताऱ्याचे अमर शिंदे, छत्रपती संभाजीनगरचे,शशिकांत तुर्भे,ईमरान जिलानी,शिकांत दुरभे,सोलापूरच्या सविता पवार, इमरान पठाण, शिवाजी निरवळ, परभणीचे संतोष हरकळ, बीडचे रोहन आगाव यांच्यासह राज्यभरातील एसटी कामगार हितासाठी कार्यरत प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कामगारांचा सन्मान, एसटीचे संवर्धन आणि 'लालपरी'ला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्यभर संघटित ताकदीने काम करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

'कामगाराच्या घामाला न्याय आणि एसटीच्या चाकांना गती-हेच आमचे ध्येय. कामगार मजबूत झाला तर एसटी मजबूत होईल आणि एसटी मजबूत झाली तर महाराष्ट्राचा सामान्य माणूस मजबूत होईल.' - आ. बच्चु कडू

## अखेर बंद असलेला

संबंधित कंत्राटदाराने ऐतिहासिक परकोट भिंतीच्या संरक्षणसाठी असलेले लोखंडी कठडे या गेट जवळ रस्ता बंद करण्यासाठी लावल्याचे चित्र पाहायला मिळाले. या रस्त्यावर अचलपूर बस स्थानक,स्मशान भूमी ,विविध प्रसिद्ध मंदिर ,शाळा ,जीवनपुरा परिसर आणि नाका वरून शहराकडे ये - जा करण्यासाठी हा मुख्य रस्ता आहे .यामुळे या रस्त्यावर दुचाकी,चारचाकी ,ट्रक , ट्रॅक्टर, ऑटो,रुग्णवाहिकेची रेलचेल असते . पण संबंधित ठेकेदाराने दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम न करता प्रथम अचलपूर नाक्यावरून रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे काम केले.त्यानंतर जीवनपुरा परिसर आणि पुलावर बांधकाम केले नाही.त्यानंतर दुसरी बाजू म्हणून माळवेशपुरा गेट पासून रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम सुरू केले.विशेष म्हणजे रस्त्याची एक बाजू चे बांधकाम पूर्ण करून वाहतूक बंद होऊ नये अशी आशा नागरिकांमध्ये होती .मात्र दोन्ही बाजूने बांधकाम केल्याने माळवेशपुरा गेट परिसर बंद करण्यात आला.आणि या रस्त्यावर आजही महावितरण चे विद्युत खांब जैसे थे आहे .यामुळे यासंदर्भात दैनिक जनमाध्यम मध्ये बातमी प्रकाशित झाल्याने अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी त्या स्थळी पाहणी करून रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे निर्देश बांधकाम अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदाराला दिले आहे. आता संबंधित ठेकेदार याचे पालन किती करतो ? हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

## रमेशराव उंडे कुटुंबाची

, सहसचिव शुभांगी उंडे, कोषाध्यक्ष जयंत खंदारकर, कार्यकारिणी सदस्य जयंत देशपांडे,सुनिल वेळूकर, अमृता वेळूकर, रेखा देशपांडे ही मंडळी उपस्थित होती.

## खैरीया नगरात जुगार

ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान जुगार खेळताना गोलू याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ५२ ताशपत्ते तसेच जुगारासाठी वापरले जाणारे साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण १० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परिसरातील अवैध जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, दशरथ आडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक फिरोज खान तसेच पथकातील कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## चालकाचे संतुलन बिघडल्याने

येणारी राख भरून आणली व वरुड येथे ती राख खाली करून ट्रक चालक खाली ट्रक घेऊन मोर्शी मार्गे अमरावतीकडे जात असताना मडघे मंगल कार्यालयाजवळ ट्रक चालकाला अचानक चक्कर आला व त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. हा डंपर ट्रक रस्त्याच्या खाली जाऊन एका झाडावर आदळला. ही घटना पाहणाऱ्या लोकांनी घटनास्थळी धाव घेऊन कॅबिनमध्ये अटकलेल्या ट्रक चालकाला बाहेर काढले.ट्रकची झाडाला धडक लागून झाडाच्या खोडाचे मोठी सालटे तुटून बाहेर पडली.झाडाची एखादी फांदी ट्रकच्या कॅबिनमध्ये घुसली असती तर जीवित हानी सुद्धा घडू शकली असती.सुदैवाने मात्र मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल निरंजन उकंडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.ट्रक मालक घटनास्थळी दाखल होऊन जेसीबीद्वारे ट्रक बाहेर काढण्यात आला.ट्रकचे काही प्रमाणात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## विदर्भात पावसाचा जोर

आहे. परिणामी मध्य भारतासह विदर्भातील पावसाचे वितरण असमान राहू शकते. आयओडी आणि एमजेओ या हवामानशास्त्रीय प्रणाली सध्या मान्सूनसाठी विशेष अनुकूल नसल्याने पुढील आठवडाभर मान्सूनची सक्रियता जेमतेम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्थानिक पावसाची स्थिती लक्षात घेऊन पिकांच्या पाण्याचे नियोजन करावे, असे आवाहन प्रा. बंड यांनी केले आहे.

## कावड यात्रेनिमित्त दर्यापूरात

जात आहे. यावेळी दर्यापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार अजित राठोड यांनी नागरिकांनी कावड यात्रा शिस्तीत, शांततेत आणि आनंदाने साजरी करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच सामाजिक सलोखा आणि शांतता कायम राखावी, असे आवाहनही त्यांनी केले. कावड यात्रेच्या निमित्ताने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, पोलिस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तामुळे यात्रा सुरळीत पार पडण्यास मदत होणार आहे.

## अंबाडा येथील युवा

पोलीस अधिनस्त चमू यांनी घटनास्थळी जाऊन मृतकाचा पंचनामा केला व प्रेत शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय येथे रवाना केले.आज दि.६ सप्टेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. त्यांच्या पश्चात वृद्ध आई लहान भाऊ, बहीण आहे. अचानक घडलेल्या घटनेत कुटुंबाचा आधारवड सुशील गेल्याने वाघमारे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## डॉ. सुधांशु तायडे यांचे

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची -सी. एम. एस परीक्षेची तयारी सुरू केली. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी कोणताही पूर्वानुभव नसताना प्रथम प्रयत्नातच परीक्षा उत्तीर्ण करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली. ग्रामिण भागातून आलेल्या डॉ. सुधांशु तायडे यांनी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्याने त्यांच्या यशाकडे विशेष अभिमानाने पाहिले जात आहे. जिल्हा परिषद शाळेपासून सुरू झालेला त्यांचा शैक्षणिक प्रवास केंद्रीय लोकसेवा आयोगापर्यंत पोहोचला, ही बाब ग्रामिण विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून सातत्याने मेहनत केली, तर कोणतेही यश अशक्य नाही. असा प्रेरणादायी संदेश डॉ. सुधांशु तायडे यांच्या यशातून मिळत असल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

# खासदारांनी केले शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील मुलांसोबत जेवन

**अमरावती/प्रतिनिधीः-** डोमा येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेत गेल्या काही दिवसांपासून भूत - प्रेत यांसारख्या अफवांमुळे विद्यार्थी शाळेत येण्यास घाबरत होते. खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी व त्यांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी



स्वतः डोमा येथील शासकीय आश्रम शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला व त्यांच्यासोबत संध्याकाळचे जेवण देखील पंगतीमध्ये बसून घेतले. यावेळी संजय चौधरी ( मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा डोमा ) , सहदेव बेलकर, रोहित पटेल , राहुल येवले, राजेश सेमलकर, किशोर झाडखंडे , विकी राठोड , आर.आर. कान्हे ( अधीक्षक ), जयकुमार झाडखंडे व गावातील मंडळी उपस्थित होती.

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सदस्य मोटार अपघात प्रकरण प्राधीकरण, अकोला.**
**जिल्हा न्यायाधिश १ व अति सत्र न्यायाधिश, अकोला.**

M.A.C.P.M.A. No. 42/2024 प्रोसेस नं. ९५२/२०२६
Fix for: 28/09/2026 दिनांक : ०२/०९/२०२६

बनाम: 1) Matin Shah S/o Mehboob Shah, R/o Near Mithi Boring, Yasmin Nagar, Amravati, Tq. and Dist. Amravati. 2) Sohail Ahmad Khan S/o Shakeel Ahmad Khan, R/o Azad Colony, Near Samar Decoration, Amravati, Tq. and Dist. Amravati

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार दिलीप गजानन इंगळे, यांनी माटीन शाह मेहबुब शाह व सोहेल अहमद खान शकील अहमद खान विरूध्द 'जिल्हा न्यायाधीश- १ तथा अति सत्र न्यायाधिश, अकोला' या न्यायालयामध्ये, दिनांक १९/०१/२०२३ रोजी घडलेल्या अपघाताबद्दल नुकसान भरपाई मिळणेबाबत मोटार अपघात कायदा प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख २८/०९/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला २८/०९/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ०२ माहे सप्टेंबर सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

अकोला । वाशिम । बुलडाणा
■ सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## २६ कोटींचा निधी, काम फक्त १५ टक्के!

# अकोला उड्डाणपुलाच्या रखडगाथेवर उच्च न्यायालयात सुनावणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

आठ वर्षे उलटली, कोट्यवधींचा निधी गेला; तरीही न्यू तापडिया नगरचा उड्डाणपूल रखडलेलाच! रेल्वेच्या हिस्स्याचे काम संथगतीने सुरू असल्याचा थेट ठपका सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातून ठेवला आहे. विशेष म्हणजे रेल्वेला आतापर्यंत २६ कोटी ८१ लाख ६९ हजार ८१९ रुपयांचा निधी देण्यात आला असतानाही रेल्वेच्या हिस्स्याचे काम केवळ १५ टक्के पूर्ण झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे कोट्यवधींचा निधी देऊनही प्रत्यक्ष कामाची गती एवढी संथ का, असा सवाल आता न्यायालयीन सुनावणीत ऐरणीवर आला आहे.

न्यू तापडिया नगर रेल्वे गेटवरील उड्डाणपुलासाठी नागरिकांना गेल्या आठ वर्षांपासून प्रतीक्षा करावी लागत आहे. रेल्वे गेट बंद होताच होणारी वाहतूक कोंडी, पर्यायी मार्गांवर वाढणारा ताण आणि त्यातून नागरिकांचा होणारा वेळेचा अपव्यय यामुळे या रखडलेल्या प्रकल्पाविरोधात नाराजी वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ॲड. नरेंद्र बेलसरे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १०/२०२६ वर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.

### पीडब्ल्यूडीने रेल्वेच्या संथ कारभारावर ठेवले बोट

**३६ कोटींचा अंदाज थेट ७९.२६ कोटींवर!**

उड्डाणपुलाच्या खर्चात झालेली वाढही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. सुरुवातीला सुमारे ३६ कोटी रुपयांचा अंदाज होता. त्यानंतर तो ४८ कोटींवर पोहोचला. पुढे ओव्हरब्रिज आणि अंडरब्रिज मिळून तब्बल ७९ कोटी २६ लाख रुपयांचा अंदाज रेल्वेकडून सादर करण्यात आल्याचे पीडब्ल्यूडीने म्हटले आहे. या वाढीमागील कारणे काय, खर्चाचे स्वरूप काय आणि कामानुसार स्वतंत्र अंदाज कसा आहे, याचे तुलनात्मक विवरण रेल्वेकडून मागविण्यात आल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे.



पीडब्ल्यूडीच्या प्रतिज्ञापत्रामुळे या प्रकल्पाच्या रखडण्यामागील कारणांवरून शासनातीलच दोन यंत्रणांमध्ये जबाबदारीची टोलवाटोलवी सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. रेल्वेच्या हद्दीतील काम रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारित असल्याचे स्पष्ट करताना पीडब्ल्यूडीने रेल्वेकडून खर्चाचे तपशील आणि कामाच्या प्रगतीसंबंधी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

**मंजुरीपूर्वीच 'अंडरब्रिज'चा समावेश?**

मूळ मंजूर प्रस्तावात केवळ Railway Over Bridgeचा समावेश होता. त्यानंतर Railway Under Bridgeचा समावेश करण्यात आल्याचे पीडब्ल्यूडीने न्यायालयाला सांगितले आहे. विशेष म्हणजे आरयूबीचे काम सुरू झालेले नसतानाही त्यासाठी स्वतंत्र अंदाज सादर करण्यात आलेला नसल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद आहे. त्यामुळे आरयूबीसाठी स्वतंत्र अंदाज आणि सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक असल्याची भूमिका पीडब्ल्यूडीने घेतली आहे.

**कोट्यवधींचा निधी; कागदपत्रांचा मात्र पत्ता नाही?**

रेल्वेला देण्यात आलेल्या २६.८१ कोटी रुपयांच्या निधीच्या वापराबाबतही पीडब्ल्यूडीने प्रश्न उपस्थित केले आहेत. युटिलायझेशन प्रमाणपत्र, खर्चाचे सविस्तर विवरण, कंत्राटदाराच्या वेतनाची माहिती, मोजमाप पुस्तिका, काम पूर्णत्वाचा अहवाल आणि वाढीव खर्चाची कारणे यांसारखी कागदपत्रे रेल्वेकडून सादर करण्यात आलेली नसल्याचे विभागाने म्हटले आहे. त्यामुळे पुढील निधी देताना आर्थिक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असल्याचे राज्य शासनाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

**'जबाबदारी ढकलू नका, काम पूर्ण करा'**

उड्डाणपूल रखडल्याने नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शासनाच्या दोन विभागांनी एकमेकांवर जबाबदारी ढकलण्यापेक्षा समन्वय साधून आठ वर्षांपासून रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी याचिकाकर्ते ॲड. नरेंद्र बेलसरे यांनी केली. दरम्यान, पीडब्ल्यूडीने न्यायालयात सादर केलेल्या अहवालाची प्रत याचिकाकर्त्यांनी स्वीकारली असून, गरज पडल्यास ती सार्वजनिक करण्यात येणार आहे. आता रेल्वे प्रशासनाच्या उत्तराकडे लक्ष लागले असून, सुनावणी अंतिम टप्प्यात असल्याचे याचिकाकर्त्यांचे उच्च न्यायालयातील वकील ॲड. उज्ज्वल देशपांडे यांनी सांगितले.

# उपसरपंच महिलेची ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

### ग्रामसभा रोखल्याचा आरोप; निंबोळी येथील घटनेप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यातील निंबोळी येथे ग्रामसभा घेण्यासाठी गेलेल्या अनुसूचित जातीच्या महिला उपसरपंचाला अपमानित करून ग्रामसभा घेण्यास मज्जाव केल्याचा आरोप करीत संबंधिताविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पीडित उपसरपंच सौ. सविता रवींद्र भिसे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे.

सविता भिसे या दापुरा-निंबोळी गटग्रामपंचायतीच्या उपसरपंच आहेत. त्यांच्या तक्रारीनुसार, ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता निंबोळी येथील सामाजिक सभागृहात ग्रामसभा घेण्याचे सरपंच सौ. मुक्ता सुनील शेंडे यांनी निश्चित केले होते. त्यानुसार गावात दवंडीही देण्यात आली होती. ग्रामसभेसाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कर्मचारी व नागरिक सामाजिक सभागृहात पोहोचले असता, गावातील राजकुमार गुलाबराव शेंडे यांनी ग्रामपंचायतीने लावलेले सभागृहाचे कुलूप तोडून स्वतःचे कुलूप लावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, हातात लोखंडी पाईप घेऊन सभागृहात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही भिसे यांनी केला आहे. या घटनेचे व्हिडीओ व छायाचित्रे आपल्याकडे असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

**पोलिसांना बोलावूनही ग्रामसभा होऊ शकली नाही**

घटनेदरम्यान आपल्याला सार्वजनिक सभागृहात गावकऱ्यांसमोर अपमानित करण्यात आले. आपण अनुसूचित जातीतील महिला असल्यामुळे जातीय स्वरूपात अपमानास्पद वागणूक देण्यात आली, असा आरोप उपसरपंच भिसे यांनी केला आहे. परिस्थिती गंभीर झाल्यानंतर त्यांनी ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना घटनास्थळी बोलावले. मात्र, त्यानंतरही ग्रामसभा घेण्यास मज्जाव करण्यात आल्याने ग्रामसभा रद्द करावी लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकारामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण झाला असून, महिला उपसरपंचाचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधिताविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यासह लागू असलेल्या इतर कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी आणि आपल्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सौ. सविता भिसे यांनी अकोटच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे केली आहे. या तक्रारीतील आरोपांची पोलीस चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

# मुंडगाव ग्रामपंचायतीची ऑगस्टची ग्रामसभा अद्याप नाही

### ३१ ऑगस्टची मुदत उलटूनही ग्रामसभा न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या मुंडगाव ग्रामपंचायतीने ऑगस्ट महिन्यातील महत्त्वाची ग्रामसभा अद्याप घेतलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. १५ ऑगस्टची ग्रामसभा ३१ ऑगस्टपर्यंत घेणे आवश्यक असतानाही ग्रामसभा न झाल्याने नागरिकांचे विविध प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. ग्रामसभेमध्ये घरकुल यादी वाचून दाखविणे, घरकुल योजनेत नाव न आलेल्या नागरिकांना पुढील प्रक्रियेबाबत माहिती देणे तसेच गावातील विविध विकासकामे आणि शासकीय योजनांबाबत चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र ग्रामसभा न झाल्याने या विषयांवर नागरिकांना आपले म्हणणे मांडता आलेले नाही. युवकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती तसेच विविध कामांसाठी आवश्यक असलेल्या ग्रामसभेच्या मंजुरीचे प्रश्नही प्रलंबित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ग्रामसभा का घेण्यात आली नाही, याबाबत नागरिकांनी ग्रामसेवक सैय्यद नजाकत यांच्याकडे विचारणा केली. मात्र समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, ग्रामसभा घेण्याबाबत अकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांनी काही दिवसांपूर्वी ग्रामपंचायतींना सूचना केल्याचे सांगण्यात येते. तरीही मुंडगाव ग्रामपंचायतीकडून ग्रामसभा घेण्यात न आल्याने या प्रकाराची दखल घेण्याची मागणी होत आहे. 'ग्रामसभा ३१ ऑगस्टपर्यंत घेणे गरजेचे होते. घरकुल यादी ग्रामसभेत वाचून दाखविणे आवश्यक होते. मात्र ग्रामसभा न झाल्याने नागरिकांची



महत्त्वाची कामे रखडली आहेत. ग्रामसभा न घेणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी,' अशी मागणी नागरिक सचिन सरकटे यांनी केली. 'युवकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती ग्रामसभेच्या माध्यमातून देणे आवश्यक आहे. घरकुल योजना तसेच विविध कामांसाठी ग्रामसभेची मंजुरी महत्त्वाची असताना मुंडगावसारख्या मोठ्या ग्रामपंचायतीची ग्रामसभा न होणे ही गंभीर बाब आहे,' असे युवक आकाश चांदणे यांनी सांगितले. '१५ ऑगस्टची ग्रामसभा ३१ ऑगस्टच्या आत घेणे आवश्यक असतानाही ती घेण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांचे अनेक प्रश्न खोळंबले आहेत,' असे नागरिक गजानन वारकरी यांनी सांगितले. ग्रामसभा न घेण्यामागचे कारण जाणून घेण्यासाठी ग्रामसेवक सैय्यद नजाकत यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांचा मोबाईल बंद असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. आता अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी या प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करतात, याकडे मुंडगाव परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकार कुंदन जाधव आत्महत्या प्रकरण : दोषींवर कारवाई न झाल्यास राज्यभर आंदोलन; गोर सेनेचा पोलीस प्रशासनाला इशारा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मूळ महागाव, ता. कारंजा (जि. वाशिम) येथील रहिवासी तथा आयबीएन-१८ लोकमत अकोला चे जिल्हा प्रतिनिधी व निर्भीड पत्रकार कुंदन श्रीराम जाधव यांना अज्ञात व्यक्तींनी केलेल्या मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याच्या घटनेला आठवडा उलटूनही पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी दोषींवर तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी गोर सेना या संघटनेच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला निवेदन देण्यात आले आहे.

दि. ०४ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कुंदन जाधव हे अनेक वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत होते. गेल्या काही वर्षांपासून पत्रकार लोकांमध्ये गटबाजीचे प्रकार सुरू होते. त्यांना वेगवेगळ्या माध्यमातून मानसिक त्रास देण्याचा प्रकार सुरू होता.

या त्रासाला कंटाळून कुंदन जाधव यांनी दि. २७/०८/२०२६ च्या मध्यरात्री राहत्या घरात गळफास घेऊन आपले जीवन संपवले. या संदर्भात त्यांच्या पत्नी सौ. प्रियंका कुंदन जाधव यांनी पतीला त्रास देणाऱ्या आणि आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या संशयित व्यक्तींविरुद्ध खदान पोलीस स्टेशन, अकोला येथे दि. ०१/०९/२०२६ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.मात्र, तक्रार देऊन एवढे दिवस होऊन सुद्धा दोषींवर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, असा आरोप गोर सेनेने केला आहे.

**कारवाई नाही तर राज्यव्यापी आंदोलन**

संबंधित प्रकरणावर येत्या सात दिवसात त्वरीत कारवाई न झाल्यास गोर सेनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व त्यामुळे होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर शासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असा इशारा प्रा. संदेश चव्हाण यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनासोबत तक्रारीची प्रत जोडण्यात आली आह.

ड्स्व.कुंदन जाधव यांच्या मागे राहिलेली त्यांची पत्नी, दोन निरागस लहान मुली आणि वयोवृद्ध वडील यांचे सह एका निर्भीड पत्रकाराला न्याय मिळावा आणि पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना पोलीस प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची उकल करावी.

# सोंड्यात येथे बिबट्याच्या हल्ल्यात वासरू ठार !

## वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शनिवारी ( दि.५ )चे रात्रीला ८ते ९ दरम्यान सोंडा( ता.वाशीम)येथील शेतकरी माणिक श्रीराम वाबळे यांच्या शेतातील गोठ्यात घुसून बिबट्याने वासराचा बळी घेतल्याची खळबळजनक घटना घडली .या घटनेमुळे सोंडा व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली असून, बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाशीम तालुक्यातील जंगल भागाच्या जवळपास सोंडा गाव शेतीशिवार आहे.शेतकरी माणिक श्रीराम वाबळे यांचा शेतात गोठा आहे.या मध्ये पाळीव प्राणी बांधलेले असतात.अशामध्ये त्यांच्या शेतातील गोठ्यात असलेल्या वासरावर शनिवारी रात्री बिबट्याने चढवीलेल्या हल्ल्यात त्यांचे वासरू जागीच ठार झाले. हिंस्त्र वन्य प्राण्यांच्या हमल्यात



वासरु ठार झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना वनविभागाने नुकसान भरपाई ही अर्थ सहाय्यता च्या माध्यमातून द्यावी अशी मागणी होत आहे.सध्या शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा रात्रीला होत असल्याने व पावसाने खंड दिल्यानं पिकांना पाणी देण्यासाठी या भागात बिबट्याचा वावर वाढल्याने रात्रीच्या वेळी शेतात जिव मुठीत धरून जावे लागत आहे.

# मंगरूळपीर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मंगरूळपीर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीची तातडीने दखल घेऊन तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी,वाशिम यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. मंगरूळपीर तालुक्यात पावसाअभावी शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, शेतीपिकांवरही विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे तालुक्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने तातडीने पंचनामे करून परिस्थितीचा आढावा घ्यावा व मंगरूळपीर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# भारत प्राथमिक मराठी शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात



■ प्रतिनिधी | रिसोड ■

येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी शिशुवर्ग व पूर्वप्राथमिक वर्गातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राधा, कृष्ण व गवळणी यांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित विविध नृत्यांचे सादरीकरण केले.

त्यानंतर शाळेच्या मैदानात बालगोपाळांसाठी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. 'गोविंदा आला रे, गोपाळ आला' अशा जयघोषात चिमुकल्या गोविंदांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना गोपाळकाल्याचा पारंपरिक प्रसाद व खाऊचे वाटप करण्यात आले.

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सण-उत्सवांची ओळख करून देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका सौ. किरणताई दुबे म्हणाल्या, 'शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांतून भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यास चालना मिळते.

# पाणीटंचाईच्या शक्यतेने मनपाची धावपळ ; पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन

### २१.३१३ दलघमी जलसाठा; विविध भागांसाठी पाइपलाइन, विहिरी अधिग्रहण आणि टँकरची तयारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिका क्षेत्रात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजनांचे नियोजन सुरू केले आहे. आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी मनपा आयुक्तांच्या दालनात झालेल्या बैठकीत शहरातील विविध भागांसाठी पर्यायी पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

सध्या उपलब्ध असलेल्या २१.३१३ दशलक्ष घनमीटर जलसाठ्याचा विचार करून पाणीपुरवठ्याचे फेरनियोजन करण्याच्या सूचना आमदार सावरकर यांनी दिल्या. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाणीपुरवठ्याच्या दिवसांमध्ये आवश्यक बदल करून कपातीद्वारे पाणीसाठा वाचविण्याचे नियोजन करण्याचेही निर्देश देण्यात आले. प्रभाग क्रमांक १, २ आणि ३ मधील काही भागांना पाणीपुरवठा करण्यासाठी चोहोट्टा येथून ८४ खेडी योजनेसाठी अस्तित्वात असलेल्या पाइपलाइनवरून जोडणी करून



३५० मिमी व्यासाची पाइपलाइन टाकण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला. तसेच प्रभाग क्रमांक ४ साठी सांगळूद-धोतर्डी ६४ खेडी योजनेवरून पाइपलाइन टाकून पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले.

प्रभाग क्रमांक १९ आणि २० मधील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी बार्शीटाकळी तालुक्यातील मोठ्या विहिरी अधिग्रहित करून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची तयारी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर मोर्णा प्रकल्पातूनही अतिरिक्त पाणी उपलब्ध करून घेण्याच्या पर्यायावर चर्चा झाली. पातूर तालुक्यातील मोर्णा प्रकल्प येथे ताशी २० लाख लिटर क्षमतेचे पंप बसवून मोर्णा ते महान जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत ६०० मिमी व्यासाची पाइपलाइन टाकण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दगडपारवा ते महानदरम्यान मोठ्या व्यासाची पाइपलाइन टाकून पाणीपुरवठा करण्याच्या पर्यायाचाही विचार करण्यात आला.

शहरातील मोठ्या विहिरी, हायड्रंट तसेच उच्च क्षमतेच्या बोअरवेल अधिग्रहित करण्याबाबतही बैठकीत सूचना देण्यात आल्या. संभाव्य टंचाईच्या काळात उपलब्ध स्त्रोतांचा अधिकाधिक वापर करून नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रशासनास सांगण्यात आले. बैठकीस महापौर शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजपा शहराध्यक्ष जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेता पवन महल्ले यांच्यासह पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता चिन्मय वाकोडे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता निलेश राठोड, सहायक अभियंता निखिल राऊत, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके, उपअभियंता उमाळे, मनपा पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता नरेश बावणे, श्रीकांत माणिकराव आदी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## काँग्रेस हायकमांडचा मोठा निर्णय

# ६ राज्यांचे प्रभारी बदलले, महाराष्ट्राच्या प्रभारीपदी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांची वर्णी

**नवी दिल्ली-** काँग्रेस हायकमांडने एक मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेसने संघटनात्मक पातळीवर मोठे फेरबदल केले आहेत. देशातील ६ राज्यांचे प्रभारी काँग्रेसने बदलले आहेत. आसाम, पंजाब, महाराष्ट्र, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेश या राज्यात काँग्रेसने संघटनात्मक फेरबदल केले आहेत.

राजस्थानमधील काँग्रेसचे नेते सचिन पायलट यांच्यावर आता काँग्रेस हायकमांडने मोठी जबाबदारी सोपवली आहे. आगामी पंजाब विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सचिन पायलट यांची पंजाबचे प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भूपेश बघेल यांच्या जागी सचिन पायलट यांची पंजाबचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.तसेच आता भूपेश बघेल यांच्याकडे आसामची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, म्हणजे भूपेश बघेल हे आता आसाम काँग्रेसचे नवे प्रभारी असणार आहेत.

दरम्यान, काँग्रेस पक्षाने अधिकृत एक्स (ट्विटर) हँडलवर एक निवेदन प्रसिद्ध करत या संदर्भातील सविस्तर माहिती दिली आहे.

महाराष्ट्राचे प्रभारी म्हणून डॉ.सिरिवेल्ला प्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.सिरिवेल्ला प्रसाद हे अर्थतज्ज्ञ असून दलित नेते आहेत. तमिळनाडू आणि झारखंड राज्याचे सहप्रभारी म्हणून त्यांनी याआधी काम केलेलं आहे. तसेच २०१९ मध्ये डॉ.सिरिवेल्ला प्रसाद यांनी आंध्र प्रदेशमधील ओंगाले या मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती.

काँग्रेस हायकमांडने संघटनात्मक फेरबदल केले आहेत. माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांची आसामचे प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच छत्तीसगडचे प्रभारी म्हणून सुखदेव भगत यांची नियुक्ती केली आहे. तसेच महाराष्ट्राचे प्रभारी म्हणून डॉ.सिरिवेल्ला प्रसाद यांची नियुक्ती केली आहे. तसेच आंध्र प्रदेशचे प्रभारी म्हणून पी.व्ही. मोहन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पंजाबचे प्रभारी म्हणून सचिन पायलट यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर आसामचे प्रभारी म्हणून भूपेश बघेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## डीजेबंदीवरून राज ठाकरेंनी मांडली रोखठोक भूमिका

### सण-उत्सव पारंपरिक पद्धतीनेच



**मुंबई-** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज ठाण्यात पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना येणाऱ्या सण-उत्सवाच्या काळात कसं वागलं पाहिजे, काय भूमिका घेतली पाहिजे यावर मार्गदर्शन केलं. तसंच, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या डीजेबंदीच्या मुद्द्यावरूनही त्यांनी आज भाष्य केलं.

राज ठाकरे म्हणाले, 'डीजे बंदीवरून सध्या वाद चालू आहे. याबाबत मी कधीच भूमिका घेतली होती. कसले डॉल्बी वगैरे लावत आहात? कसले डीजे? आपल्या पारंपरिक पद्धतीने सण का साजरे होत नाहीत?' असा प्रश्न राज ठाकरेंनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, 'इतक्या श्रद्धेने गणपती घरी आणायचा. आणि विसर्जन करताना नाचता? कसला आनंद होतोय? यात कसला आनंद साजरा करता? उत्साह गेल्यासारखा वाटते. वाईट वाटते त्यावेळेला.

## आता १० वर्षांनंतरही धावणार डिझेल वाहने

### आयआयटी दिल्लीच्या उपकरणाला हिरवा कंदील

**नवी दिल्ली-** जुन्या डिझेल वाहनांबाबत वाहनधारकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी IIT दिल्लीने विकसित केलेल्या विशेष उपकरणाला हिरवा कंदील दाखवला आहे. हे उपकरण जुन्या डिझेल वाहनांमधून होणारे प्रदूषण तब्बल ९० टक्क्यांपर्यंत कमी करू शकते.


दिल्लीसह देशातील इतर शहरांमध्ये जुन्या डिझेल वाहनांमुळे होणारे प्रदूषण हा चिंतेचा विषय बनला आहे. मात्र, आता सरकार जुन्या डिझेल वाहनांना पुन्हा रस्त्यावर धावण्याची परवानगी देऊ शकते. यामागे छ्छ्ऊ दिल्लीने विकसित केलेले खास उपकरण कारणीभूत ठरू शकते. हे उपकरण जुन्या डिझेल वाहनांमधून होणारे प्रदूषण मोठ्या प्रमाणात नियंत्रित करू शकते.




आयआयटी दिल्लीने विकसित केलेल्या या उपकरणाचे नाव रेट्रोफिट एमिशन कंट्रोल डिव्हाइस असे आहे. वाहनाच्या धुरातून बाहेर पडणारे पार्टिक्युलेट मॅटर म्हणजेच सूक्ष्म कण हे उपकरण तब्बल ९० टक्क्यांपर्यंत नियंत्रित करू शकते. याशिवाय नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाणही ६० टक्क्यांपर्यंत कमी करण्यास मदत होऊ शकते याबाबत माहिती देताना नितीन गडकरी यांनी सांगितले की, बीएस-आयआयआय किंवा बीएस-व्हीआय वाहनांमध्ये हे उपकरण बसवण्यात आले, तर ही वाहने बीएस-व्हीआय वाहनांप्रमाणे प्रदूषणाच्या दृष्टीने अधिक चांगली कामगिरी करू शकतील.

सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चरर्स कार्यक्रमात बोलताना गडकरी यांनी सांगितले की, या उपकरणाची चाचणी यशस्वी झाली आहे. त्यामुळे जुन्या वाहनधारकांना मोठा दिलासा मिळू शकतो आणि प्रत्येक जुने वाहन भंगारात काढण्याची गरज भासणार नाही.गडकरी यांनी सांगितले की, जुने व्यावसायिक वाहन विकून नवीन वाहन खरेदी करणे अनेकांच्या खिशावर मोठा आर्थिक भार टाकते. मात्र, हे नवीन उपकरण फार महाग असणार नाही. त्याची किंमत अंदाजे ४,००० ते ५,००० रुपये असू शकते.लवकरच ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड २२८ अंतर्गत यासंदर्भात मसुदा अधिसूचना जारी केली जाऊ शकते. या उपकरणाचा वापर डिझेलवर चालणाऱ्या जनरेटरमध्येही करता येऊ शकतो.

## 'एल निनो'चा धोका अधिक मजबूत होण्याची शक्यता




### २०२७पर्यंत तीव्र हवामान घटना, WMOकडून अलर्ट जारी

**मुंबई-** प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान झपाट्याने वाढत असल्याने 'एल निनो'ची स्थिती आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. वर्षअखेरीस एल निनोचा प्रभाव अतिशय तीव्र पातळीवर पोहोचू शकतो, असा इशारा जागतिक हवामान संघटनेने दिला आहे. या घटनेचा प्रभाव फेब्रुवारी २०२७पर्यंत कायम राहण्याची शक्यता असून, जगातील अनेक भागांत पाऊस, तापमान आणि वातावरणीय स्थितीत मोठे बदल होऊ शकतात. अतिवृष्टी, पूर, दुष्काळ आणि तीव्र उष्णतेचा धोकाही वाढू शकतो.

मध्य-पूर्व विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानातील विसंगती मोजणारा 'निनो ३.४' निर्देशांक मे ते जुलै २०२६दरम्यान सरासरीपेक्षा १.५ अंश सेल्सिअसने अधिक होता. जुलैमध्ये तो सरासरीपेक्षा दोन अंश सेल्सिअसने अधिक नोंदला गेला. जुलैअखेर ते ऑगस्टच्या मध्यापर्यंत हा निर्देशांक आणखी वाढला असून, तो सरासरीपेक्षा २.६ अंश सेल्सिअसने अधिक होता. या वाढीवरून 'एल निनो'ची तीव्रता लक्षात घेणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.'एल निनो'चा प्रभाव सर्व देशांवर सारखा पडत नाही. त्याची तीव्रता, कालावधी, ऋतू; तसेच हिंदी महासागरासह इतर महासागरीय स्थिती यावर स्थानिक परिणाम अवलंबून असतात. त्यामुळे अतिशय तीव्र 'एल निनो' म्हणजे भारतात हमखास दुष्काळ, असा थेट निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, भारतात 'एल निनो'चे परिणाम यापूर्वीही सातत्याने अनुभवास आले आहेत.'एल निनो'च्या वाढत्या तीव्रतेमुळे 'सुपर एल निनो' अशी चर्चा सुरू असली, तरी जागतिक हवामान संघटनेच्या प्रमाणित वर्गीकरणात 'सुपर एल निनो' ही संज्ञा वापरली जात नाही. सध्याच्या अंदाजानुसार विकसित होत असलेला 'एल निनो' अधिक सशक्त किंवा अधिक मजबूत श्रेणीत जाण्याची शक्यता आहे.

## ५.७२ कोटी खात्यांमध्ये 'झिरो बॅलन्स', आरटीआयमधून धक्कादायक माहिती समोर

**नवी दिल्ली-** देशातील प्रत्येक कुटुंबाला बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या प्रधानमंत्री जन धन योजनेबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशातील दर चार जन धन खात्यांपैकी एक खाते सध्या अकार्यक्षम झाले आहे. तसेच तब्बल ५.७२ कोटी खात्यांमध्ये एक रुपयाही शिल्लक नसल्याचे स्पष्ट झाले आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते चंद्रशेखर गौर यांनी दाखल केलेल्या अर्जाला उत्तर देताना केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने ही ताजी आकडेवारी जाहीर केली आहे. 'पीटीआय'ने याबाबत वृत्त दिले आहे.

केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत देशभरात एकूण ५९ कोटी ३ लाख ७४ हजार ९०७ जन धन खाती उघडण्यात आली आहेत. या सर्व खात्यांमध्ये मिळून एकूण ३,१५,१७९.९० कोटी रुपयांची रक्कम जमा आहे. विशेष म्हणजे या योजनेत महिलांचा सहभाग लक्षणीय असून एकूण खात्यांपैकी ३२.८९ कोटी खाती महिलांची (तृतीयपंथीयांसह) आहेत, तर २६.१४ कोटी खाती पुरुषांच्या नावावर आहेत.

मात्र, खात्यांची संख्या मोठी असली तरी त्यातील निष्क्रियतेचे प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. देशातील १५.३६ कोटींहून अधिक खाती अकार्यक्षम झाली असून ५.७२ कोटी खात्यांमध्ये शून्य शिल्लक आहे.

अकार्यक्षम आणि शून्य शिल्लक असलेल्या खात्यांच्या संख्येत उत्तर प्रदेश आणि बिहार ही राज्ये अव्वल स्थानावर आहेत. उत्तर प्रदेशात सर्वाधिक ९५.९२ लाख शून्य शिल्लक खाती असून, बिहारमध्ये ६२.३५ लाख आणि महाराष्ट्रात ३६.०४ लाख खात्यांमध्ये शून्य शिल्लक आहे. तसेच अकार्यक्षम खात्यांच्या बाबतीतही उत्तर प्रदेश ३.२३ कोटी खात्यांसह प्रथम स्थानी आहे. बिहारमध्ये १.५९ कोटी, मध्य प्रदेशात १.३५ कोटी, तर महाराष्ट्रात सुमारे ९७.९४ लाख खाती बंद किंवा अकार्यक्षम स्थितीत आहेत.आरटीआयच्या उत्तरात १ सप्टेंबर रोजी स्पष्ट करण्यात आले की, जन धन खात्यांमधील जमा रक्कमेचे लिंगनिहाय वर्गीकरण किंवा १०० रुपयांपेक्षा कमी शिल्लक असलेल्या खात्यांची स्वतंत्र नोंद केंद्र सरकारकडून मध्यवर्ती पातळीवर ठेवली जात नाही. याशिवाय गेल्या पाच वर्षांत बंद पडलेली खाती आणि सायबर फसवणूक किंवा संशयास्पद व्यवहारांमुळे गोठवण्यात आलेली खाती यांची माहितीदेखील केंद्र स्तरावर उपलब्ध नसल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## 'एमपीएससी'वर भाजपाचा ताबा!



**नवी दिल्ली-** महाराष्ट्रात हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरून शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत आहेत. विद्यार्थ्यांचा हा संताप केवळ एखाद्या परीक्षेपुरता किंवा भरतीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेवरून त्यांचा उडालेला विश्वास दर्शवतो, अशा शब्दांत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र आणि राज्यातील महायुती सरकारवर तीव्र निशाणा साधला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत त्यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून सरकारला घेरले आहे.

केंद्र असो वा राज्य, भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे देशातील आणि राज्यातील तरुण वर्ग पूर्णपणे त्रस्त झाला आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. पेपर फुटीचे सत्र, वर्षानुवर्षे रखडलेल्या भरती प्रक्रिया, शिक्षणाचा प्रचंड वाढलेला खर्च, वसतिगृहांची दयनीय अवस्था आणि जेवणाचा खालावलेला दर्जा यांमुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. तसेच 'डीबीटी' (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) योजनेतील कथित गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क मिळत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाबत चिंता व्यक्त करताना राहुल गांधी म्हणाले की, 'एमपीएससी सारख्या घटनात्मक संस्थेवर ताबा मिळवून तिची स्वायत्तता आणि विश्वासार्हता पूर्णपणे नष्ट करण्यात आली आहे.'

## कपाशीच्या भरपाईला शेतकरी मुकणार

### सुधारित पीकविमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीची अट वगळली



**मुंबई-** पीक योजनेच्या निकषात झालेल्या बदलामुळे आणि सुधारित पीक विमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीची अट वगळण्यात आल्याने २०२५-२६ मधील कपाशी उत्पादक शेतकऱ्यांना पीकविमा मिळालेला नाही आणि मिळणार नसल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. सुधारित पीकविमा योजनाही पीककापणी प्रयोग आणि उंबरठा उत्पादन यावर आधारित असल्याने गेल्या वर्षीच्या कपाशी उत्पादक शेतकरी आता कपाशी पीकविम्याला मुकले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यात २०२४ पर्यंत पीकविमा योजना राबवण्यात येत होती. या पीकविमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीची अट होती. नैसर्गिक आपत्ती झाल्यानंतर पंचनाम्याच्या सूचना आल्यानंतर महसूल आणि कृषी विभागाकडून करण्यात येणाऱ्या पंचनाम्यानुसार शेतकऱ्यांना अतिवृष्टीग्रस्त कपाशी पिकाची भरपाई देण्यात येत होती. मात्र, २०२५च्या सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजनेत बदल करण्यात आला. तसेच पूर्वीच्या विमा योजनेतील स्थानिक नैसर्गिक आपत्तीची अट वगळण्यात आल्याने २०२५-२६ मधील कपाशी उत्पादक शेतकऱ्यांना पीकविमा मिळालेला नाही.

आता शेतकऱ्यांना उत्पादन आधारित पीकविमा लागू करण्यात आलेला असून, यात पीककापणीसह तांत्रिक बाबींवर आधारित पीकविमा देण्यात येत आहे. यानुसार सोयाबीन, कापूस आणि भात पिकाला विमा देण्यात येत आहे. जिल्ह्यात पूर्वी एक रुपयात पीकविमा उतरवण्यात येत होता. जिल्ह्यात कपाशी पिकाचे क्षेत्र मोठे होते. २०२४-२५ मध्ये पावसाचे प्रमाण अधिक होते. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात विमा मंजूर झाला होता. मात्र, त्यानंतर पीकविमा योजनेत बदल केल्याने गेल्या वर्षीच्या एकाही कपाशी उत्पादक शेतकऱ्याला विमा मोबदला मिळालेला नाही. विशेष म्हणजे गेल्या वर्षी किती शेतकऱ्यांनी कपाशी पिकाचा विमा उतरवला, याचा तपशील कृषी विभागाकडे उपलब्ध झाला नाही दरम्यान, जिल्ह्यात अनेक ठिकाणी शेतकरी गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीबाधित कपाशी पिकाच्या भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

## संक्षिप्त

### लाडकी बहीण योजनेच्या नावाने फेक मॅसेज व्हायरल

**मुंबई-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सोशल मीडियावर एक मॅसेज सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामध्ये योजनेची नवीन नोंदणी आणि e-KYC प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, हा दावा खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचे समोर आले आहे. महिला व बालविकास विभागाने नव्याने नोंदणी किंवा e-KYC सुरू करण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे.सोशल मीडियावरील या मेसेजमध्ये e-KYC राहिलेल्या किंवा हप्ते बंद झालेल्या महिलांनी पुन्हा अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी एका अनधिकृत लिंकवर क्लिक करून नवीन फॉर्म भरण्यास सांगितले जात आहे. या प्रक्रियेसाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, महाराष्ट्राचे रहिवासी प्रमाणपत्र, बँक खात्याची माहिती आणि फोटो यांसारखी वैयक्तिक कागदपत्रे मागितली जात आहेत. महिला व बालविकास विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेची नवीन नोंदणी किंवा I-ख्य्ण पुन्हा सुरू करण्याबाबत सध्या कोणताही सरकारी निर्णय झालेला नाही. तसेच यासंदर्भात मंत्री आदिती तटकरे किंवा मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांकडूनही कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे सोशल मीडियावरील अशा मेसेजवर विश्वास ठेवू नये.




### विद्यानंद बापट यांच्या निवासस्थाना बाहेर पोलीस बंदोबस्त वाढवला



**पुणे-** गणेशोत्सवात डीजे आणि साऊंड सिस्टीमच्या वापराला विरोध दर्शवणारे विद्यानंद बापट यांच्या घराबाहेर पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. त्यांच्यावर नुकत्याच झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी विद्यानंद बापट यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली असून, त्यांच्या घराबाहेर पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात वाढवला आहे.सुरक्षेची गंभीर दखल घेत बापट यांनी आज निघणाऱ्या डीजेविरोधी मोर्चात प्रत्यक्ष सहभागी न होण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आणि त्यांच्या डीजेमुक्तीच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवण्यासाठी सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी बघ्यांची तसेच स्थानिक नागरिकांची मोठी गर्दी झाली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासन सतर्क झाले असून बापट यांच्या निवासाभोवती कडक पहारा ठेवण्यात आला आहे.


### राज्यात १४ टक्के पाऊसतूट



**मुंबई-** सप्टेंबर पहिल्या आठवड्याच्या अखेरीस देशात सरासरीपेक्षा १३ टक्के पावसाची तूट असून, राज्यात १४ टक्के तूट आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीच्या स्थितीमध्ये फारशी सुधारणा होण्याची चिन्हे नाहीत. भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या पुढच्या चार आठवड्यांच्या अंदाजानुसार ही माहिती देण्यात आली आहे.तीन सप्टेंबरपासून १० सप्टेंबरपर्यंतच्या आठवड्यामध्ये राज्यभरात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असेल. त्यानंतर विदर्भाला फायदा होण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरातील प्रणालीमुळे विदर्भाला फायदा मिळू शकतो. त्या पुढच्या आठवड्यांसाठी वर्तवण्यात आलेल्या अंदाजाबद्दल खात्री कमी असली तरी नंतरच्या दोन आठवड्यांमध्ये मराठवाडा आणि कोकणाला फायदा होऊ शकेल.एक जून ते चार सप्टेंबर या कालावधीत गोव्यामध्ये ३३ टक्के तूट असून कर्नाटकमध्ये २४ आणि केरळमध्ये २३ टक्के पावसाची तूट आहे. सप्टेंबरमधील पावसामुळे ही तूट भरून निघण्यास खूप मदत होईल का, याचा अंदाज दोन आठवड्यांनंतर येऊ शकेल. कोकण विभागामध्ये एक जून ते चार सप्टेंबर या काळात मुंबई शहर जिल्ह्यात दोन टक्के तूट, मुंबई उपनगर जिल्ह्यात दहा टक्के अतिरिक्त, पालघर जिल्ह्यात २५ टक्के अतिरिक्त, ठाणे जिल्ह्यात सात टक्के तूट, रायगड जिल्ह्यात सरासरीइतका, रत्नागिरी जिल्ह्यात १३ टक्के तूट तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३४ टक्के तूट आहे.

### गोंदिया-चांदाफोर्ट रेल्वे मार्गालगत बिबट्याचा मृत्यू

**गोंदिया -** गोंदिया–चांदाफोर्ट रेल्वेमार्गावर अर्जुनी रेल्वेस्थानक ते बडेगाव रेल्वेस्थानकादरम्यान महालगाव शिवारात रेल्वेची धडक बसून बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना रविवार ६ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. मृत बिबट्या हा अंदाजे ८ ते १० महिन्याच्या असल्याच्या प्राथमिक अंदाज वन विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.रेल्वे पोल क्रमांक ४०८/१५ जवळ रेल्वे रुळालगत बिबट्या मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. वन्यजीवांच्या अधिवासातून जाणाऱ्या रेल्वेमार्गावरील सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.रविवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर रेल्वे विभागाने तातडीने वनविभागाला माहिती दिली.यावेळी उपवनसंरक्षक अविनाश मेश्राम, प्रकोष्ठ निष्कासन अधिकारी, नवेगावबांध, अर्जुनी मोरगाव चे तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, मानद वन्यजीव रक्षक रुपेश निनावे, पशुधन विकास अधिकारी डॉ. कपिल कोरेटी यांच्यासह वनविभागाचे अधिकारी, हिरवळ बहुउद्देशीय संस्था आणि एस. एस. जे. महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी आर. एम. बहुरे वनक्षेत्र अर्जुनी मोर. हे करीत आहेत.



जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८१ ■ सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## आष्टी-थार मार्गावर वाघाचा रोजच 'दरबार

# दिवसेंदिवस वाढतोय वाघाचा वावर; वाहनचालक, शेतकरी धास्तावले

### रस्त्यावर वारंवार दर्शन; वनविभागाच्या उपाययोजनांकडे नागरिकांचे लक्ष

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील जंगलालगतच्या परिसरात वाघाचा वावर दिवसेंदिवस वाढत असून आता आष्टी-थार मार्गावर वाघाचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर अचानक वाघ दिसत असल्याने वाहनचालकांची तारांबळ उडत असून सायंकाळनंतर या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक ठरत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

थार, बोरखेडी, चामला, बांबरडा यासह परिसरातील जंगल आणि शेतशिवारात गेल्या काही दिवसांपासून वाघाच्या हालचाली सातत्याने आढळून येत आहेत. त्यातच आष्टी-थार मार्गावर वाघाचा वारंवार वावर दिसत असल्याने हा मार्ग नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

**अचानक दर्शनाने वाहनचालकांची उडते भंबेरी**

आष्टी-थार मार्गावर प्रवास करताना रस्त्याच्या कडेला किंवा शेतशिवाराच्या दिशेने वाघ दिसत असल्याचे नागरिक सांगत आहेत. काही वेळा वाघ रस्त्यालगत थांबलेला तर काही वेळा जंगलाच्या दिशेने जाताना दिसून येतो. त्यामुळे वाहनचालकांना वेग कमी करून अत्यंत सावधपणे प्रवास करावा लागत आहे.

दुचाकीस्वार, दूध उत्पादक, शेतकरी तसेच रात्री उशिरा कामावरून परतणाऱ्या ग्रामस्थांमध्ये विशेष भीती निर्माण झाली आहे. अचानक वाघ वाहनासमोर आल्यास काय करायचे, असा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे.



**शेतकऱ्यांच्या चिंतेत भर**

या परिसरातील शेतकरी पहाटे आणि सायंकाळी शेतात जातात. मात्र, वाघाच्या वाढत्या वावरामुळे शेतीची कामे करतानाही भीतीचे सावट आहे. पाळीव जनावरांवर हल्ला होण्याची शक्यता असल्याने पशुपालकही चिंतेत आहेत.

वनविभागाकडून या परिसरात गस्त, कॅमेरा ट्रॅप आणि इतर उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगितले जात असले तरी आष्टी-थार मार्गावर वारंवार वाघाचे दर्शन होत असल्याने अधिक प्रभावी उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे.

**वाघाचा वावर की नागरिकांच्या सुरक्षेची परीक्षा**

वन्यजीवांचे संरक्षण करणे आवश्यक असले तरी मानवी वस्ती, रस्ते आणि शेतशिवारात वन्यप्राण्यांचा वाढता वावर हा नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न ठरत आहे. त्यामुळे वनविभागाने केवळ गस्त न वाढवता वाघाच्या हालचालींचे शास्त्रीय पद्धतीने निरीक्षण करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस कृती आराखडा तयार करण्याची मागणी होत आहे.

आष्टी-थार मार्गावर विशेष पथक तैनात करावे, रात्रीची गस्त वाढवावी, नागरिकांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात आणि वाघाच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वाघाचा वाढता वावर आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती पाहता वनविभाग आता कोणती ठोस पावले उचलणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## गॅस सिलेंडर की पाण्याची टाकी आष्टीत धक्कादायक प्रकार

### ग्राहकांच्या जीवाशी खेळ कोणाचा गॅस एजन्सीच्या कारभारावर संताप; तपासणीचा बोजवारा उडाल्याचा आरोप

**आष्टी शहीद जनमाध्यम :** घरगुती स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅस सिलेंडरमध्ये चक्क पाणी आढळल्याचा धक्कादायक प्रकार आष्टी शहीद परिसरात समोर आला आहे. ३ सप्टेंबर रोजी घेतलेल्या सिलेंडरमध्ये पाणी असल्याचे ग्राहकाच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे गॅस एजन्सीच्या कारभारावरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्राहकांच्या सुरक्षिततेशी खेळ सुरू आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ग्राहकाने घरगुती वापरासाठी गॅस सिलेंडर घेतला होता. सिलेंडर वापरण्यापूर्वी तपासणी केली असता त्यामध्ये पाणी असल्याचे आढळून आले. त्यामुळे ग्राहकाला मोठा धक्का बसला. गॅस सिलेंडरसारख्या ज्वलनशील वस्तूच्या वितरणापूर्वी त्याची योग्य तपासणी होणे अपेक्षित असताना असा प्रकार घडल्याने वितरण व्यवस्थेतील निष्काळजीपणावर बोट ठेवले जात आहे.



सिलेंडरमध्ये पाणी नेमके आले कुठून ग्राहकापर्यंत पोहोचण्यापूर्वी सिलेंडरची तपासणी झाली होती का तपासणी झाली असेल तर हा प्रकार निदर्शनास का आला नाही असे अनेक प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे, गॅस सिलेंडरच्या सुरक्षेशी संबंधित बाब असल्याने संबंधित विभागाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

ग्राहकाने गॅस एजन्सीकडे लेखी तक्रार करून पाणी आढळलेला सिलेंडर तातडीने बदलून देण्याची मागणी केली आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. ग्राहकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत गॅस वितरण व्यवस्थेची तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते जलतरण स्पर्धेचे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा उच्च उच्च उच्च उच्च नगर परिषदेच्या जलतरण तलाव येथे ब्ल्यू स्टार ॲकाडमीच्यावतीने आयोजित वर्धा स्वीम गाला या जलतरण स्पर्धेचे उद्घाटन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी निमिश मुळे, ॲथलेटीक्स असोशिएशनचे सुधीर चौधरी आदी उपस्थित होते.

वर्धा शहरात जलतरण तलावाची चांगली सुविधा निर्माण झाल्यामुळे येथील जलतरणपटूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करण्यासाठी या जलतरण तलावाचा उपयोग होत आहे. जलतरणामुळे जलतरणपटूंचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होत आहे. नव्याने महिला व बालकांसाठी बांधण्यात येत असलेला जलतरण पुर्णत्वास येत असून लवकरच लोकार्पण करण्यात येणार आहे. जलतरण तलावामुळे महिला व बालकांना मोठा लाभ होणार असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर



यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाला जलतरणपटू, त्यांचे पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेट तलावात सहा युवकांचा जलधाडसीपणा; एक बेपत्ता

### धबधब्यासारख्या प्रवाहात आंघोळ महागात; पाच जण सुखरूप, रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** पावसामुळे मेट तलाव ओसंडून वाहत असताना सांडव्यावर तयार झालेल्या धबधब्यात आंघोळ करण्याचा मोह सहा युवकांच्या जीवावर बेतला. पाण्याच्या प्रचंड प्रवाहात एक युवक बेपत्ता झाला असून, पाच युवक थोडक्यात बचावले. रविवारी, ६ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास नागपूर-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवरील मेट गावाजवळ ही थरारक घटना घडली. बेपत्ता युवकाचा रात्री उशिरापर्यंत शोध सुरू होता.

कोंढाळी येथील सहा युवक रविवारी दुपारी धोतीवाडा परिसरालगत असलेल्या मेट तलावावर गेले होते. तलावातील पाणी ओसंडून वाहत असल्याने सांडव्यावरून पाणी वेगाने खाली कोसळत होते. त्यामुळे परिसरात धबधब्यासारखे मनोहारी दृश्य निर्माण झाले होते. याच दृश्याने भुललेल्या युवकांनी पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला.

मात्र काही वेळातच पाण्याचा जोरदार प्रवाह वाढला आणि त्यातील एक युवक प्रवाहाच्या तडाख्यात सापडून खोल पाण्यात बेपत्ता झाला. तो दिसेनासा होताच उर्वरित पाच युवकांनी कसाबसा पाण्याबाहेर येत कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच कोंढाळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुमित परतेकी यांनी पोलीस पथक घटनास्थळी पाठविले. पोलिसांसह स्थानिक ग्रामस्थ आणि पोहण्यात तरबेज युवकांनी बेपत्ता युवकाचा शोध सुरू केला. मात्र पाण्याचा वेग आणि वाढलेली पाणीपातळी यामुळे शोधकार्यात अडथळे येत होते.

धबधब्याचे आकर्षण जीवघेणे ठरू शकते, याची जाणीव असूनही तरुणांकडून धोकादायक ठिकाणी जाण्याचे प्रकार सुरू आहेत. या घटनेने अशा पर्यटनस्थळांवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## आर्वीत 'कामगार भवन व संताजी सभागृह'साठी निधी द्या

### खा.काळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी शहरातील कामगार, सुरक्षा रक्षक, महिला, युवक तसेच नागरिकांना सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी 'कामगार भवन व संताजी सभागृह' उभारण्याची मागणी खासदार अमर शरदराव काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आर्वी नगरपरिषद हद्दीतील गुरुनानक धर्मशाळेसमोरील राणी लक्ष्मीबाई शाळेच्या जागेची नियमानुसार पाहणी करून ही जागा सभागृहासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.

आर्वी येथील 'जय संताजी सेवा संस्था' कामगार कल्याण, सुरक्षा रक्षक हित, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे. मात्र संस्थेकडे स्वतःची इमारत नसल्याने उपक्रम राबविताना अडचणी निर्माण होत आहेत. ही अडचण दूर करण्यासाठी प्रस्तावित जागेवर 'कामगार भवन व संताजी सभागृह' बांधण्यात यावे. त्यासाठी आवश्यक निधी शासनाने तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार काळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## कृतिशील शिक्षकच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवू शकतो-रामदास तडस

### १२ आदर्श शिक्षकांचा सन्मान



**देवळी जनमाध्यम :** देशाची खरी ताकद आधुनिक सुखसुविधांमध्ये नसून तेथील तरुणाईमध्ये आहे. तरुण पिढीला सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्याचे काम शिक्षक करतात. कृतिशील शिक्षकच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवू शकतात, असे प्रतिपादन माजी खासदार रामदास तडस यांनी केले.

२१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत एस. एस.एन. जे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना युनिटतर्फे शिक्षक दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण व 'सन्मान शिक्षकांचा' कार्यक्रम ५ सप्टेंबर रोजी रामदास तडस आयटीआय कॉलेज सभागृहात झाला. अध्यक्षस्थानावरून तडस बोलत होते.

यावेळी प्राचार्या डॉ. सुनीता सोनारे, प्रा. डॉ. प्रियराज महेशकर, कॅप्टन मोहन गुजरकर, डॉ. दीपक पुनसे, शुभांगी कुर्जेकर, प्राचार्य राहुल तडस यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

'रोल मॉडेल शिक्षक कसा असावा?' या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत हायस्कूल गटात राजेश्वरी वानखेडे प्रथम, खुशी शिंगाडे द्वितीय ठरल्या. कनिष्ठ महाविद्यालयीन गटात अक्षरा शंभरकर प्रथम, आरती मरघडे द्वितीय, तर दीक्षा डेहनकर तृतीय आल्या. वैष्णवी भोयर व राधिका नागोसे यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला. 'स्वयंशासन' उपक्रमांतर्गत उत्कृष्ट विद्यार्थी शिक्षक म्हणून नऊ विद्यार्थ्यांचा, तर विद्यार्थी प्राचार्य म्हणून सार्जंट यामिनी पारधी हिचा सन्मान करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १२ आदर्श शिक्षक व प्राध्यापकांना एनसीसी युनिटचे स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अंडर ऑफिसर कोमल शितळे हिने केले. रेंजर लीडर वैष्णवी शिरभाते हिने आभार मानले. 'हम सब भारतीय हैं' या एनसीसी गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आकोडा टाकून वीजचोरी; दोघांवर गुन्हे दाखल

### १७ हजार ३७० रुपयांची वीज चोरी; महावितरणची कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** शहर परिसरातील दोन वेगवेगळ्या भागांत आकोडा टाकून वीज चोरी करणाऱ्या दोघांविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महावितरणच्या तपासणीत दोघांनी मिळून तब्बल १७ हजार ३७० रुपयांची वीज चोरी केल्याचे समोर आले.

गोंड प्लॉट परिसरात महावितरणचे सहायक अभियंता चैतन्य देशपांडे वीज बिल वसुलीसाठी गेले होते. त्यावेळी सचिन चौधरी हा आकोडा टाकून वीज वापरताना आढळून आला. तपासणीत त्याने ३४६ युनिट वीज चोरी केल्याचे स्पष्ट झाले. चोरी केलेल्या विजेची किंमत सहा हजार ३० रुपये असल्याचे निष्पन्न झाले. महावितरणकडून संबंधित रकमेचे बिल देण्यात आले. मात्र, ते स्वीकारण्यास नकार दिल्याने देशपांडे यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, बुरड मोहल्ल्यातही वीज चोरीचा प्रकार उघडकीस आला. सहायक अभियंता अमोल पिंपळे वीज चोरी शोधण्यासाठी गेले असता दीपक कुरिल हा आकोडा टाकून वीज वापरताना आढळला. तपासणीत त्याने ५७७ युनिट वीज चोरी केल्याचे समोर आले. या विजेची किंमत ११ हजार ३४० रुपये होती. बिलाची रक्कम भरणा न केल्याने त्याच्याविरुद्धही शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार नीतेश भोयर पुढील तपास करीत आहेत.

## कुऱ्हाडीने डोक्यावर वार; भावाला जीवे मारण्याचा प्रयत्न

### शेतीच्या वादातून कोरा येथे पुतण्याचा राडा; चुलत्यालाही मारहाण, दोघांना धमकी

**समुद्रपूर जनमाध्यम :** शेतीच्या वाटणीवरून सुरू असलेल्या जुन्या वादाला शुक्रवारी सायंकाळी हिंसक वळण लागले. पुतण्याने चुलत काकाच्या भावावर कुऱ्हाडीने डोक्यात जोरदार वार करून गंभीर जखमी केल्याची घटना कोरा येथे घडली. यावेळी मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या चुलत्यालाही हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्याच्या पत्नीला देखील मारहाण झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी गिरड पोलिसांनी चेतन गुलाब ऊर्फ रमाकांत वैरागडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिलीप रामाजी वैरागडे रा. कोरा हे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबाची वडिलोपार्जित शेती असून भावंडांमध्ये तिची आपसी वाटणी झालेली आहे. दिलीप यांचा लहान भाऊ देविदास ऊर्फ नारायण वैरागडे हे नागपूर जिल्ह्यातील गुमगाव येथे कुटुंबासह राहतात. वाटणीतील शेतीची पाहणी करण्यासाठी ते अधूनमधून कोरा येथे येत असतात. देविदास आणि त्यांचा पुतण्या चेतन यांची शेती एकमेकांना लागून असल्याने शेतीच्या कारणावरून दोघांमध्ये मागील काही दिवसांपासून वाद सुरू असल्याचे तक्रारीत नमूद आहे.



शुक्रवारी गावात आठवडी बाजार असल्याने दिलीप हे बाजारात गेले होते. तेथे त्यांना देविदास आणि श्रीकांत आत्राम भेटले. तिघे सायंकाळी घरी परतत असताना घराजवळ असलेल्या चेतनने देविदास यांना शेतीच्या कारणावरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. देविदास यांनी शिवीगाळ करण्याचे कारण विचारले असता चेतनने जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

त्यानंतर चेतनने घरातून कुऱ्हाड आणून देविदास यांच्या डोक्यावर जोरदार वार केला. वारामुळे देविदास जखमी होऊन खाली पडले. दिलीप यांनी धावत जाऊन चेतनला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने दिलीप यांनाही हाताबुक्क्यांनी मारहाण केली. दिलीप यांच्या पत्नी ज्योती वैरागडे या पतीला सोडविण्यासाठी गेल्या असता चेतनची आई जिजाबाई हिनेही दोघांना मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेनंतर दिलीप यांनी तेथून निघून जवळच्या श्रीकांत आत्राम यांच्या घरी जाऊन ११२ क्रमांकावर पोलिसांना माहिती दिली. जखमी देविदास यांना गणेश वैरागडे, नामदेव वैरागडे, श्रीकांत आत्राम आणि दिलीप यांनी ॲम्बुलन्सने सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी गिरड पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## पाण्याच्या टाकीतील पाण्यावरून सासू-सुनेत हाणामारी

### प्लास्टिकच्या बादलीने मनगटावर मारल्याचा आरोप हिंगणघाट पोलिसांत गुन्हा

**हिंगणघाट जनमाध्यम :** अंगणातील कचरा साफ केल्यानंतर खराटा पाण्याच्या टाकीत धुतल्याच्या कारणावरून सासू-सुनेमध्ये वाद झाला. या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. सुनेने प्लास्टिकची बादली हातात घेऊन वृद्ध सासूच्या हातावर मारल्याने त्या जखमी झाल्याचा आरोप आहे. ही घटना हिंगणघाट शहरातील अन्नपूर्णा बेकरीजवळ घडली.

पुष्पा मोहनराय वैरागडे वय ७० रा. अन्नपूर्णा बेकरीजवळ, हिंगणघाट यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पुष्पा वैरागडे यांच्या पतीचे सुमारे चार वर्षांपूर्वी निधन झाले आहे. पतीच्या नावावर असलेल्या सहा खोल्यांच्या घरातील तीन खोल्यांमध्ये त्यांचा मुलगा मनोज आणि सून पूजा राहतात. उर्वरित तीन खोल्यांमध्ये पुष्पा या एकट्या राहतात.

घर खाली करण्याच्या कारणावरून मुलगा आणि सुनेसोबत त्यांचा वाद सुरू असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

६ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास पुष्पा घरकाम करत होत्या. त्यावेळी सून पूजाने अंगणातील कचरा काढल्यानंतर खराटा पाण्याच्या टाकीत धुतला. यावर पुष्पा यांनी घरातील पाणी विहिरीतून काढून वापरत असल्याने टाकीतील पाणी खराब करू नको, असे सांगितले.

यावरून दोघींमध्ये तोंडी वाद झाला. आरोपानुसार, पूजाने शिवीगाळ करून प्लास्टिकची बादली उचलून पुष्पा यांच्या उजव्या मनगटावर आणि डाव्या हाताच्या अंगठ्यावर मारली. यात त्या जखमी झाल्या.

पुष्पा यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पूजा वैरागडे हिच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## कुपोषण मुक्तीच्या दाव्यांना धक्का; १९ बालके तीव्र कुपोषित

### ४२ हजार ६३५ बालकांची तपासणी

### ३२१ मध्यम कुपोषित, समुद्रपूरमध्ये सर्वाधिक संख्या

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा कुपोषणमुक्त करण्याच्या प्रयत्नांना जुलै महिन्यातील तपासणीच्या आकडेवारीने धक्का दिला आहे. ० ते ५ वर्षे वयोगटातील तब्बल ४२ हजार ६३५ बालकांची उंची आणि वजन तपासल्यानंतर १९ बालके तीव्र तर ३२१ बालके मध्यम कुपोषित असल्याचे समोर आले आहे. एकही बालक कुपोषित राहू नये, अशी भूमिका असताना प्रत्यक्ष आकडेवारी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे करत आहे. मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण ०.७५ टक्के, तर तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण ०.०४ टक्के आहे. संख्या कमी दिसत असली तरी तीव्र कुपोषणाचा फटका बसलेल्या १९ बालकांच्या आरोग्याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. तालुकानिहाय चित्र अधिक चिंताजनक आहे. समुद्रपूरमध्ये सर्वाधिक सात तीव्र कुपोषित बालके आढळली आहेत. कारंजा आणि हिंगणघाटमध्ये प्रत्येकी चार, आष्टीत दोन, तर देवळी आणि वर्धा तालुक्यात प्रत्येकी एक बालक तीव्र कुपोषित आढळले.



जिल्ह्यातील १ हजार ४२२ अंगणवाडी केंद्रांमार्फत बालकांच्या पोषणस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. मात्र केवळ तपासणीपुरते अभियान न राहता कुपोषित बालकांना सकस आहार, नियमित उपचार आणि सातत्यपूर्ण आरोग्य तपासणी मिळणे आवश्यक आहे. कुपोषणाचे आकडे शून्यावर आणण्याचे खरे आव्हान प्रशासनासमोर आहे.

## दोन दिवसीय विदर्भस्तरीय कराटे प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय शितो कराटे आणि कोबुडो संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय विदर्भस्तरीय कराटे प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलसचिव कादर नवाज खान यांच्या हस्ते ५ सप्टेंबर रोजी नागार्जुन अतिथीगृहात करण्यात आले. ५ व ६ सप्टेंबरदरम्यान हे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा समितीचे पदसिद्ध सचिव सहयोगी प्राध्यापक डॉ. निशीथ राय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिरात विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने कराटे प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.



यावेळी ट्रेडिशनल शितो रियू इंडियाचे चेअरमन शिहान शेख दत्तू सर, चेअरमन कृष्णा ढोबळे, अध्यक्ष गणेश लांजेवार तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष, कार्यक्रमाचे आयोजक आणि ट्रेडिशनल शितो रियू महाराष्ट्राचे चेअरमन पराग पाटील उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून सहभागी प्रशिक्षणार्थींना कराटेच्या विविध तंत्रांचे प्रगत प्रशिक्षण तसेच शारीरिक आणि मानसिक क्षमता विकसित करण्यासाठी मार्गदर्शन मिळणार आहे. विविध जिल्ह्यांतून आलेल्या प्रशिक्षणार्थींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अन्न सुरक्षितता महत्वाचीच..

विविध उत्सवांतील महाप्रसादाचे कार्यक्रम, मंदिरांमधील प्रसाद, गुरुद्वारांमधील लंगर, दर्ग्यातील भंडारा, रमजानमधील इफ्तार किंवा एखाद्या धार्मिक-सामाजिक सोहळ्यातील सामूहिक भोजन यामागे श्रद्धा, भक्तिभाव, दानधर्म, सामाजिक सहभाग आणि सामूहिकतेची दीर्घ परंपरा आहे. भाविक ईश्वराचा प्रसाद या भावनेने हे अन्न सेवन करतात. अन्नदान श्रेष्ठ मानणाऱ्या संस्कृतीमुळे अशा महाप्रसादांमध्ये भाविक, धनिक वर्ग रोख रक्कम, धान्य आदी रूपाने योगदान देतो. वर्षानुवर्षे हा अन्नदान यज्ञ सुचारू पद्धतीने सुरू असला, तरी अन्नातून विषबाधेमुळे लोकांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याच्या दुर्घटना सामूहिक भोजन पद्धतीत अधिक सजगतेची गरज अधोरेखित करतात. फेब्रुवारी २०२४ मध्ये नांदेडमध्ये महाप्रसादानंतर सुमारे १८०० जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. त्याच्या आदल्या दिवशी परभणीत २५० जण बाधित झाले होते. कर्नाटकात चामराजनगरमध्ये २०१८ मध्ये मंदिरात प्रसादातून झालेल्या विषबाधेत १३ मृत्यू झाले. गतवर्षी इचलकरंजीजवळ शिवनाकवाडी यात्रेत महाप्रसादातून साडेतीनशे जणांना विषबाधा झाली. अशा घटनांनी सामूहिक अन्नवाटपाच्या व्यवस्थेकडे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पाहण्याची गरज प्रकर्षाने पुढे आली. आगामी काळात गणेशोत्सव आणि अन्य धार्मिक सोहळ्यांमधील सामूहिक भोजनामध्ये असे प्रकार घडू नयेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने अधिक काटेकोर चौकट उभी करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. कार्यक्रमाच्या सात दिवस आधी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, अन्न तयार करण्यासाठी वैध परवानाधारक किंवा नोंदणीकृत केटररचा वापर, कच्चा माल कोठून आणला याची नोंद ठेवणे, अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तंदुरुस्ती तपासणी आणि अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणीची जबाबदारी देणे, अशा तरतुदी यामध्ये आहेत. वर्षभरातील सण, जत्रा, उरूस आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी कायमस्वरूपी 'फेस्टिव्हल एन्फोर्समेंट कॅलेंडर' तयार केले आहे. सणाच्या २१ दिवस आधीपासून सणानंतर ३० दिवसांपर्यंत तपासणी, नमुने आणि कारवाईची व्यवस्था राहणार आहे. अन्नसुरक्षेसंदर्भातील ही दिशा नवी नाही. अन्नसुरक्षा आणि मानके कायदा २००६ आणि त्याखालील नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाकडे आधीपासून आहे. मे २०२६ अखेर महाराष्ट्रात ११.३० लाखांहून अधिक सक्रिय खाद्य परवाने आणि नोंदण्या आहेत. धार्मिक स्थळांवरील अन्नाबाबतही केंद्राच्या अन्नसुरक्षा प्राधिकरणाने 'भोग' किंवा 'ईट राईट प्लेस ऑफ वर्शिप' सारख्या उपक्रमांतून स्वच्छता, अन्न हाताळणाऱ्यांचे प्रशिक्षण, ऑडिट आणि नोंदणीचा आग्रह धरला आहे. राज्य प्रशासनाने गणेशोत्सवात मंडळांना प्रसाद तयार करण्यासाठी नोंदणी, स्वयंपाक उघड्यावर किंवा रस्त्यावर करू नये, स्वच्छतेचे निकष पाळावेत अशा सूचना यापूर्वी दिल्या होत्या. फरक इतकाच की, आतापर्यंतची कारवाई बहुतेक वेळा सणनिहाय आणि प्रसंगाधारित होती. एखादा सण जवळ आला की, मिठाई, खवा, पनीर, तेल, उपवासाच्या पदार्थांवरील छापे वाढत; प्रसाद वितरण करणाऱ्या मंडळांना सूचना दिल्या जात. आता प्रथमच वर्षभराची एकसंध अंमलबजावणी पद्धत तयार करण्याचा प्रयत्न होत आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ अशा सणांपासून आषाढी-कार्तिकी वारी, महाशिवरात्र, जन्माष्टमी, दहीहंडी आणि स्थानिक जत्रा-उरुसांपर्यंत वेगवेगळ्या स्तरांवर जोखीम नोंदवून तपासणीचे नियोजन केले जाणार आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, तेल, पाणी-बर्फ, खाद्यरंग, सुका मेवा, उपवासाचे पदार्थ आणि सामूहिक अन्नवाटप यांसारख्या बाबींना विशेष संवेदनशील मानले आहे. घरात ५-१० लोकांसाठी तयार केलेल्या अन्नात चूक झाली, तर तिचा परिणाम मर्यादित राहतो; पण पाच-दहा हजार लोकांसाठी तयार केलेल्या भातामध्ये, आमटीत, खिरीत किंवा प्रसादात दूषित पाणी वापरले गेले, शिजलेले अन्न चुकीच्या तापमानात काही तास ठेवले गेले किंवा कच्च्या मालातच जंतुसंसर्ग असेल, तर एकाच वेळी हजारो लोक बाधित होऊ शकतात. या कार्यक्रमांत स्वयंपाक उघड्या जागेत होतो. पाण्याचा स्रोत कायमचा नसतो, स्वच्छ साठवणूक अपुरी असते, स्वयंसेवकांची संख्या मोठी असते आणि किती लोक जेवणार याचा अंदाजही चुकतो. दमट हवामानात ही जोखीम वाढते. लोक शंका न घेता प्रसाद ग्रहण करतात. त्यामुळे आयोजकांवरची जबाबदारी अधिक असायला हवी. त्यासाठी सात दिवसांची पूर्वसूचना ही योग्य सुरुवात आहे. तिचा उपयोग 'परवानगी' पुरता राहू नये. त्या सात दिवसांत नियोजित कार्यक्रमाचे ठिकाण, अपेक्षित गर्दी, पिण्याचे पाणी, स्वयंपाकाची जागा, कच्च्या मालाचे पुरवठादार, केटररची नोंदणी आणि तयार अन्न साठविण्याची व्यवस्था यांची प्राथमिक पडताळणी झाली पाहिजे. मोठ्या कार्यक्रमासाठी वेगळा जोखीम दर्जा आणि गावातील १००-२०० लोकांच्या छोट्या प्रसादासाठी वेगळी पद्धत ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येकवेळी तितकीच कागदपत्रे मागितल्यास हेतू चांगला असूनही नियम कटकट वाटतील. राज्यात गावोगवी वर्षभर सप्ताह, यात्रा, पालख्या, देवस्थानांच्या उत्सवांत हजारो लहान-मोठे कार्यक्रम होतात. प्रत्येक ठिकाणी अधिकारी पाठविणे विद्यमान मनुष्यबळात शक्य होईल का, हा प्रश्न आहे. कॅलेंडर करणे सोपे असले, तरी त्यावर नियमित तपासणी करणे कठीण काम आहे. आदेशाचे रूपांतर केवळ नोंदणी, फॉर्म आणि फायलींमध्ये झाले, तर त्याचा अन्नाच्या प्रत्यक्ष गुणवत्तेवर फारसा परिणाम होणार नाही. दुसरी अडचण 'परवानाधारक केटरर'च्या सक्तीची आहे. मुंबई-पुण्यात व्यावसायिक केटरर सहज उपलब्ध असतील; पण ग्रामीण भागात गावकरी स्वतः स्वयंपाक करतात. अनेक वर्षे अन्नछत्र चालविणाऱ्या संस्था अशांना थेट व्यावसायिक केटरर लावण्याची सक्ती केली, तर खर्च वाढेल आणि नियमापासून दूर राहण्याची प्रवृत्ती वाढू शकते. अशा ठिकाणी स्थानिक स्वयंपाकी आणि स्वयंसेवकांना अल्पकालीन अन्नसुरक्षा प्रशिक्षण देणे, जबाबदार 'फूड सेफ्टी सुपरवायझर' नेमणे आणि कच्चा माल साठवणुकीची साधी तपासणी सूची देणे उपयुक्त ठरू शकते. 'भोग' आणि 'फोस्टॅक' सारख्या प्रशिक्षण उपक्रमांचा उपयोग यासाठी करता येईल. या निर्णयाला धार्मिक स्वातंत्र्यावरचे निर्बंध म्हणून पाहण्याचेही कारण नाही. कारण, प्रशासनाने यासाठी धर्मनिरपेक्ष चौकट स्वीकारली आहे. कोणाच्या श्रद्धेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारला नाही; पण हजारो नागरिकांना दिले जाणारे अन्न सुरक्षित आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी मात्र सरकार टाळू शकत नाही. त्यादृष्टीने हे पाऊल लोकहितैषीच आहे, हे समजून घेऊन सहकार्याची भूमिका घेण्यातच सर्वांचे हित आहे.

# अन्नसुरक्षाः कडकडाट आणि पाऊस

**मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडील प्रकरणांत एफडीएच्या उद्दिष्टाचे कौतुक करतानाच कार्यपद्धतीवर कठोर भाष्य केले. ढगांचा गडगडाट किती मोठा झाला यावर शेतीचे उत्पादन ठरत नाही; पाऊस किती पडला यावर ते ठरते. महाराष्ट्राच्या अन्नसुरक्षेलाही हाच साधा, किंचित कंटाळवाणा आणि म्हणून प्रसिद्धीस कमी पोषक नियम लागू होतो.**

अन्नाची स्वच्छता, शुचिता, गुणवत्ता आणि भेसळमुक्तता या केवळ चव, रंग किंवा सुगंधाच्या गोष्टी नाहीत, त्या थेट मानवी सुरक्षिततेशी जोडलेल्या आहेत.अस्वच्छ हाताळणी, दुषित पाणी, अपुरी शीतसाखळी,निकृष्ट कच्चा माल, रोगकारक जीवाणू-विषाणू, बुरशीजन्य विषद्रव्ये किंवा रासायनिक भेसळ यांपैकी प्रत्येक घटक आपल्या ताटातून शरीरात प्रवेश करून कधी अन्नविषबाधा, अतिसार, उलट्या व ताप घडवतो; तर कधी यकृत, मूत्रपिंड, मज्जासंस्था आणि अंतःस्रावी यंत्रणेवर दीर्घकालीन आघात करतो. काही दूषित घटक कर्करोगाचा धोकाही वाढवतात. म्हणून अन्नसुरक्षा ही उपाहारगृहातील झाडूपोछ्यापुरती बाब नसून प्रत्येक घासामागील सार्वजनिक आरोग्याची पहिली, अत्यंत महत्त्वाची आणि निःशब्द संरक्षणरेषा आहे.

हॉटेलच्या स्वयंपाकघरात झुरळ दिसले, उंदराने फेरफटका मारला, अन्न चुकीच्या पद्धतीने साठवलेले आढळले किंवा मुदतबाह्य पाकीट सापडले, तर त्याचे समर्थन करण्यासाठी बौद्धिक कसरत करण्याची गरज नाही. असुरक्षित अन्नाविरुद्ध कारवाई झालीच पाहिजे; जाणूनबुजून भेसळ करणाऱ्याला शिक्षा झाली पाहिजे आणि ग्राहकाच्या जीवाला तातडीचा धोका असेल तर आस्थापना बंद करण्याचे अधिकार प्रशासनाकडे आहेत. परंतु नावाजलेल्या कंपन्या, पंचतारांकित हॉटेले आणि उच्चभ्रू क्लब यांतून राज्यातील एकूण अन्नाचा अत्यल्प हिस्सा कदाचित ०.०१ टक्क्यांहूनही कमी लोकांच्या पोटात जातो. अन्नधान्य, डाळी, भाज्या, फळे, सुटे दूध, मसाले आणि खाद्यतेल या घराघरांतील व व्यावसायिक स्वयंपाकघरांतील कच्च्या मालाची गुणवत्ता अधिक व्यापक समस्या आहे. म्हणून मूलभूत प्रश्न असा आहे अन्नसुरक्षा म्हणजे छापे की व्यवस्था ? सध्या हा प्रश्न विचारणेही धाडसाचे झाले आहे.

सन १९५४चा अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा छापे आणि नमुने घेण्याच्या प्रतिक्रियात्मक संस्कृतीवर आधारलेला होता. चार दशके छापे पडूनही गुणवत्तापूर्ण अन्नाची खात्री निर्माण झाली नाही; उलट ही पद्धत अनेक ठिकाणी भ्रष्टाचाराचे कुरण ठरली. म्हणून आंतरराष्ट्रीय अनुभव, विज्ञानाधिष्ठित मानके आणि प्रतिबंधात्मक नियमन यांचा विचार करून संसदेने 'अन्नसुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६' केला, त्याची व्यापक अंमलबजावणी २०११ पासून सुरू झाली.

नव्या कायद्याने छापा हे प्रशासनाचे मध्यव तत्त्व न ठेवता प्रतिबंध सुधारणा अनुपालन प्राणबद्ध कारवाई यांना केंद्रस्थानी आणले. महाराष्ट्रात सध्या अन्नसुरक्षचा कडकडाट मोठा ऐकू येतो. रोज तपासणी, निलंबन, प्रसिद्ध आस्थापनाचे नाव, छायाचित्रे, दृश्यफिती आणि दुसऱ्या दिवशी उत्साहवर्धक मथळे दिसतात. २५ मे ते ३१ जुलै २०२६ या काळात महाराष्ट्र व औषध प्रशासनाने म्हणजेच एफडीएने ३,१३७अन्न आस्थापनाची तपासणी करून ६६४ सुधारणा नोटिसा दिल्याआणि १६५ परवाने निलंबित केले , अशी प्रशासनाची आकडेवारी आहे. कारवाई होत आहे हे निर्विवाद प्रश्न तिच्या वैधानिक प्रमाणबद्धतेचा आणि तिला दिल्या जाणाऱ्या अभूतपूर्व प्रसिद्धीचा आहे.

एफडीएचा हा विभाग २५ मे २०२६ रोजी अचानक प्रकट झालेला नाही. विद्यमान आयुक्त येण्याच्या अवघ्या अडीच महिन्यांपूर्वी, १२ मार्च २०२६ रोजी विधानसभेत मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात १२,६९३ तपासण्या, ५,७७६ सुधारणा नोटिसा, १६७ परवाना निलंबने, ८४० तडजोडीची प्रकरणे आणि ७५.३४ लाख रुपयांचा दंड झाला होता. काम झाले होते, फक्त प्रत्येक निलंबनानंतर संध्याकाळी विशेष दृश्यफीत पाहण्याचे भाग्य नागरिकांना लाभले नव्हते.

'महाराष्ट्र टाइम्स' ने ५ मे २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, केवळ कोकण विभागात एका वर्षात सुमारे ४,७०० आस्थापनांची तपासणी, १,१११ सुधारणा नोटिसा, सुधारणा न करणाऱ्या १४० आस्थापनांचे परवाना निलंबन आणि १७१ ठिकाणी कारवाई करून सुमारे ६.४४ कोटी रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला होता. 'इंडियन एक्सप्रेस'च्या १६ जून २०२४ च्या वृत्तानुसार पिझ्झा हट, डॉमिनोज, बर्गर किंग, केएफसी, सबवे, मॅकडोनाल्ड्स आणि बार्बेक्यू नेशन यांच्या ३६१ शाखांची तपासणी करून ३०० सुधारणा नोटिसा देण्यात आल्या आणि १३ परवाने निलंबित झाले तपासणी, नोटीस, निलंबन, जप्ती आणि खटले हे एफ एफडीएच्या नियमित कामाचेभाग आहेत. त्यासाङ्गी अधिकारी नेमलेले आहे. त्यांना वेतन मिळते आणि अर्थसंकल्पात आस्थापना,प्रयोगशाळा, कर्मचारी, प्रवास, उपकरणे तसेच 'जाहिरात व प्रसिद्धी' साठीही ही तरतूद असते. पूर्वी सरकारी सेवेत आपले नेमून दिलेले काम करणे ही स्वतंत्र बातमी नसते, गैरसमज होता काळ बदलला तरतूद असते. असा एक जुनाट आहे आता काम होण्याइतके ते दिसणेही महत्त्वाचे समजले जात असावे.

जगात सर्वोत्त काय करतात सर्वोत्तम अन्नसुरक्षा असलेले देश काय करतात - २०२२च्या अन्नसुरक्षा निर्देशांकात अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता कॅनडा प्रथम, डेन्मार्क द्वितीय, अमेरिका तृतीय, बेल्जियम आणि किनलॅंड पुढील सर्वोच्च स्थानांवर



होते. त्यांनी निरीक्षक रद्द केलेली नाहीत, कारवाई बंद केलेली नाही आणि दोषी व्यावसायिकांना गुलाबाची फुलेही दिलेली नाहीत. त्यांच्या व्यवस्थेचा पाया प्रतिबंध, जोखीम-मूल्यमापन, धोका-विश्लेषण व निर्णायक नियंत्रणबिंदू व्यवस्था, मागोवा व्यवस्था, स्वयंनियंत्रण, प्रयोगशाळा पर्यवेक्षण, सुधारणा, पुनर्तपासणी आणि शेवटी प्रमाणबद्ध कायदेशीर कारवाई हा आहे.

संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना आणि जागतिक आरोग्य संघटनेने उभारलेली 'कोडेक्स मानके ॲलिमेन्टेरियस' व्यवस्था विज्ञानाधिष्ठित मानके आणि धोका उत्पन्न होण्यापूर्वी त्याचे नियंत्रण या तत्त्वांवर उभी आहे. निरीक्षकाने चूक शोधणे आवश्यक असले, तरी चूक मुळात होऊच नये अशी व्यवस्था व्यवसायात रुजवणे अधिक श्रेष्ठ आहे. कॅनडात व्यवसायाच्या जोखमीप्रमाणे तपासणी होते, डेन्मार्कमध्ये उत्तम अनुपा लन करणाऱ्यांच्या तपासणीची वारंवारता कमी होऊ शकते; फिनलंडच्या ओइव्हा पद्धतीत त्रुटीचे उत्कृष्ट, चांगले, सुधारणा आवश्यक आणि निकृष्ट असे प्रमाणबद्ध वर्गीकरण केले जाते बेल्जियममध्ये स्वयंनियंत्रण, मागोवा-व्यवस्था, अनिवार्य सूचना आणि अधिकृत नियंत्रण ही चार चाके आहेत. अमेरिकेने २०११च्या अन्नसुरक्षा आधुनिकीकरण कायद्याद्वारे प्रतिक्रियात्मक कारवाईकडून प्रतिबंधात्मक व्यवस्थेकडे स्विकारले आपल कायदाही याच दिशेचा आहे आपण मात्र भावनात्मक प्रवासाला टाळायला परतीच्या प्रवासाला निघालो की काय अशी शंका येते.

अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये त्रुटी आढळल्यास सुधारणा नोटीस,सुधारणेसाठी मुदत पुनर्तपासणी, पालन न झाल्यास निलंबन आणि शेवटी परवाना रद्द करणे अशी क्रमबद्ध व्यवस्था आहे. सार्वजनिक आरोग्याला तातडीचा धोका असल्यास कारणे लेखी नोंदवून त्वरित निलंबन करण्याचा एक अपवादात्मक अधिकारही आहे. कायदा भोळा नाही; तो फक्त विचारपूर्वक आहे. अडचण तेव्हा निर्माण होते, जेव्हा अपवादाला रोजच्या प्रशासनाचे वस्त्र चढवले जाते. तेथे न्यायालयाला प्रशासनाला हस्तक्षेप करावा लागतो

मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडील प्रकरणात एफडीएच्या उद्दिष्टाचे कौतुक करतानाच कार्यपद्धतीवर कठोर भाष्य केले. 'पद्धतशीरपणे चला','डास मारण्यासाठी तलवार वापरू नका', बुध्दीचा स्वतंत्र उपयोग करा व्यवहार्य होण्याऐवजी शब्दशः नियमामध्ये अडकू नका आणि 'अनावश्यक घाई करू नका' अशा शब्दांत न्यायालयाने प्रमाणबद्धतेची आठवण करून दिली. एका प्रकरणात ९८ टक्के अनुपालन झाल्यानंतरही व्यवसाय बंद ठेवल्याने एफडीएला पाच लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देश झाले. २९ ऑगस्टच्या मुंबई क्रिकेट असोसिएशन प्रकरणात न्यायालयाने, वारंवार समजावून सांगून आपण थकल्याचे नमूद करीत अवमान कारवाईचा इशारा दिला, त्यानंतर निलंबन मागे घेण्यात आले.

न्यायालय अन्नातील झुरळांचे समर्थन करित नाही झुरळ काढताना संविधान बाहेर नका, एवढेच सांगते. परंतु न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांवरही समाजमाध्यमांत अर्वाच्च टीका आणि भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यावर ना शासनाने आक्षेप घेतला ना पोलिसांनी काही केले. मी कायदा समजावून सांगितला की काही अतिउत्साही रक्षक तलवारी उपसतात. त्यांपैकी कोण स्वखर्चाने सेवा करतो आणि कोणाचा उत्साह व्यावसायिक स्वरूपाचा आहे.याची माहिती नसल्याने 'पेड ट्रोल' हा शब्द वापरण्याचा मोह मी नम्रपणे वावरतो. पुणेरी शिष्टाचारालाही मर्यादा असतात. कायद्याची तरतूद सांगणाऱ्याला भेसळखोरांचा समर्थक ठरवायचे असेल, तर उद्या वाहतूक पोलिसाला नियम पाळण्यास सांगणारे न्यायालय वाहतूक अपघातांचे समर्थकही ठरेल.

खरी अन्नसुरक्षा कॅमेऱ्याच्या चौकटीबाहेर घडते. ती स्वच्छतेच्या दैनंदिन सवयीत, एचएसीसीपीच्या नोंदीत, प्रयोगशाळेत, शीतसाखळीत, मागोवा-व्यवस्थेत, सुधारणा नोटिशीत पुनर्तपासणीत आणि दोष पुन्हा निर्माण होऊ न देणाऱ्या व्यवस्थेत असते. छापा कधी आवश्यक असतो; पण छापा ही घटना आहे. नियमन ही व्यवस्था आहे.

सन २०११ मध्ये अन्न व औषध प्रशासनाचा आयुक्त असताना प्रगत देशाप्रमाणे कायदा कलम ४४ आणि इतर तरतुदी अन्वये केवळ एफडीएच्या यंत्रणेवर अवलंबून न राहता व्यापक प्रमाणात लायसेन्स आस्थापनाकडून अन्नसुरक्षा लेखापरीक्षण, नियमित प्रयोगशाळा चाचण्या आणि सातत्यपूर्ण अनुपालन यावर आधारित प्रतिबंधात्मक व्यवस्था राबविण्यास सुरुवात केली होती. त्याचे अतिशय प्रभावी बदल दिसून आले. माझ्या बदलीनंतरही हे प्रयत्न सुरू राहिले असते, तर महाराष्ट्रातील अन्नगुणवत्तेची संरक्षणव्यवस्था अधिक भक्कम झाली असती. आज ही अन्नगुणवत्ताविषयी खरोखरच गांभीर्य असेल, तर प्रशासनाने या व्यवस्थेला पुन्हा चालना द्यावी, त्यासाठी प्रसिद्धीपेक्षा सातत्याची गरज आहे ढगांचा गडगडाट किती मोठा झाला पावर यावर ते ठरते. पाउस किती पडला यावर ते ङ्करते. महाराष्ट्राच्या अन्नसुरक्षेलाही हाच साधा, किंचित कंटाळवाणा आणि म्हणून प्रसिद्धीस कमी पोषक नियम लागू होतो. किती छापे पडले, हा प्रश्न एक दिवस आकर्षक वाटेल, पाच वर्षांनी महाराष्ट्रातील अन्न प्रत्यक्षात किती सुरक्षित झाले इतिहास शेवटी हाच प्रश्न विचारणार आहे.

**महेश झगडे**

संवाद

## दहीहंडीच्या कार्यक्रमांत डीजेचा दणदणाट !

यंदाचा गणेशोत्सव वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत आहे. गणेशोत्सव मिरवणुकीत वाजवला जाणारा डीजे हे त्यातीलच एक कारण.सध्या पुण्यात हा विषय चांगलाच गाजतो आहे. डीजे आणि मिरवणुकांतील ध्वनी प्रदूषण याबाबत विद्यानंद बापट यांची मते न पटल्याने त्यांना झालेल्या मारहाणीनंतर हा विषय अधिक चवीने चर्चिला जाऊ लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी डीजेचे स्तोम लोकसहभागातून कमी करण्याचे आश्वासन देऊन सावध भूमिका घेतली आहे. गणेशोत्सवात डीजे वाजवावा कि वाजवू नये हा मुद्दा अद्याप कोणालाही स्पष्ट झाला नसला तरी नुकत्याच पार पडलेल्या गोपाळकाला उत्सवात मात्र मुंबई-ठाण्यासह पुण्यातही डीजेचा दणदणाट पाहायला मिळाला. कालपरत्वे गोपाळकाला हा उत्सव सुद्धा नवरात्री उत्सवाप्रमांणे राजकीय मंडळी आणि उद्योगपती यांनी हायजॅक केला आहे. त्यामुळे या ठिकाणी उत्सवातील धार्मिकता केवळ नावाला दिसून आली.सकाळपासून रात्रीपर्यंत सुरु असलेल्या या कार्यक्रमांत दिवसभरात अनेक सेलिब्रिटी आणि मंत्री संत्रींनीं भेटी दिल्या. उपस्थित लोकांमधील आणि थर लावण्यासाठी येणाऱ्या गोपाळकाला मंडळांतील तरुणांचा उत्साह टिकून राहावा यासाठी जवळपास सर्वच ठिकाणी मोठ्या आवाजातील डीजेंची व्यवस्था करण्यात आली होती. त्यांचा दणदणाट दूरवर ऐकू येत होता. अशा ठिकाणी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी पक्षातील अनेक मंत्री यांनी हजेरी लावली मात्र कोणीही डीजे बाबत साधे अवाक्षर काढले नाही. त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण देणारा, गर्भवती स्त्रिया, लहान मुले आणि वयोवृद्ध यांच्या जीवावर बेतणाऱ्या डीजेला सत्ताधारी मंडळींसह मुख्यमंत्र्यांची मूकसंमती आहे का असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडला आहे.

**जगन घाणेकर**

## निसर्ग कोपतो आहे

नेपाळमधील महातांडव नेपाळला अंधःकारात नेणारे ठरले.'ना भुतो ना भविष्यती' अशा प्रकारचा विनाशकारी महाप्रलय जगाने पहाला.यात हजारोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असूनही ६ हजारपेक्षा जास्त नागरिक आजही बेपत्ता आहेत व लाखोंच्या संख्येने तेथील लोक बेघर झाले आहेत ही अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी घटना संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली.तरीही जगातील अनेक देश विकासाच्या नावाखाली हिमालयावर किंवा निसर्गावर वेगवेगळ्या पध्दतीने घणाघाती प्रहार करीत आहेत.हिमालयाच्या लगतच्या देशांमध्ये भारत, नेपाळ,चीन(तिबेट परिसर), भूतान तर पूर्णपणे हिमालयीन प्रदेश आहे,पाकिस्तान आणि काही भौगोलिक नोंदीमध्ये अफगाणिस्तान किंवा म्यानमारचा काही सिमावर्ती भाग जोडला जातो.परंतु मुख्यत्वे करून हिमालया लगतचे पाच देश मानले जातात.त्यामुळे हिमालया लगतच्या विकासकामामुळे व जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीने या पाचही देशांसाठी महाविनाशाचा आलाराम नेपाळमधून २६ ऑगस्टला झाला आहे. त्यामुळे या पाचही देशांना हिमालयालगतचे विकास कामे ताबडतोब थांबविने किंवा नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे.मुख्यत्वेकरून चीन हिमालया लगतच्या तिबेट परिसरात एकापाठोपाठ एक नवीन-नवीन जलविद्युत प्रकल्प उभारत आहे.सोबतच रेल्वे,रस्ते वाहतूक उद्देशाने हिमालयालयामध्ये बोगदे तयार करीत असून खनण सुरू आहे.त्यामुळे आजच्या परिस्थितीत हिमालयाला सर्वात जास्त खिळखिळा करण्याचे काम चीन करीत आहे. त्यांचाच परिणाम आज वॉटर बॉम्बच्या रूपात व महाप्रलयाच्या रूपात नेपाळला भोगावा लागतो आहे.आज दोन आठवडे उलटुन गेल्यानंतरही हजारो नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तरीही शोध मोहीम सुरूच आहे.अशा कठीण घडीला जगातील संपूर्ण देशांनी व संयुक्त राष्ट्र संघटनेनी सर्वोतोपरी सरळ हातांनी मदत करण्याची गरज आहे.नेपाळची भीषण नैसर्गिक आपत्ती ही निसर्गाची फक्त एक झलक आहे.परंतु यापुढे जगात भयानक महाप्रलय, सुनामी, भुकंप,हिमकडा कोसळणे, भूस्खलन,ज्वालामुखीचा उद्रेक अशा भयावह घटना ओढावण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे चीन सारख्या देशाने निसर्गावर अतीरेक करने थांबवावे.आज नेपाळ,भारत,पाकिस्तान,चीन (तिबेट परिसर), भूतान या देशातील हिमालयातील अनेक हिमकडे धोकादायक श्रेणीमध्ये आले आहेत.यामुळेच निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत भारतातील उत्तराखंड, केदारनाथ, झारखंड, ओडिशा, बिहार , उत्तरप्रदेश व इतर भागात जे पावसाचे थैमान व नद्यांच्या पुरांचे वाढते प्रमाण हा सर्वप्रकार ग्लेशियर वितळणे व निसर्गावर होत असलेला अतिरेक यामुळेच देशासह जगात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन बसले आहे,यात जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड,वाढते
शहरीकरण,औद्योगिक,हिमालय परिसरात जलविद्युत प्रकल्प उभारणी,वाढती लोकसंख्या यामुळे आकाश-पाताळ,स्थल,जल,वायू यांना मोठा धोका निर्माण झाला आहे त्याचे प्रायश्चित्त मानवजातीसह संपूर्ण सृष्टीला भोगावे लागणार आहे.

**रमेश लांजेवार,** नागपूर.

## नवीन चलनी नोटा

आता विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या अत्याधुनीकरणामुळे युद्ध केवळ रणांगणावर खेळले जात नाही तर अनेक माध्यमातून वेगवेगळ्या पातळीवर खेळले जाते.त्यामध्ये फेक नॅरेटीव्हच्या(खोटे कथानक) माध्यमातून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करणे, असंतोष निर्माण करणे असे प्रयत्न शत्रू राष्ट्राकडून केले जातात त्याच बरोबर देशाची अर्थव्यवस्था मोडकळीस आणण्यासाठी आपल्या शेजारील बांगलादेश ,पाकिस्तान नेपाळ यासारखी शत्रुराष्ट्रे तसेच आय. ए. एस. सारख्या आतंकवादी संघटना नकली नोटा भारतात पाठवत असतात.'धुरंधर' या चित्रपटाच्या माध्यमातून हे भीषण संकट ,एक प्रकारचे षड्यंत्र सर्वांना चांगले समजले. या संकटाचा सामना करण्यासाठी ८ नोव्हेंबर २०१६ या दिवशी नोटबंदी जाहीर करण्यात आली होती. पाचशे आणि हजार रुपयांच्या चलनी नोटा बंद करण्यात आल्या. हा उपाय तत्कालीक ठरतो हे लक्षात घेऊन नवीन धोरण आखण्यात आले. हे नवीन धोरण म्हणजे पॉलीमर नोटांची निर्मिती. सध्या साठ देशातून या प्रकारच्या नोटा वापरल्या जातात.यापूर्वी चलनात असलेल्या कागदी नोटा टाकाऊ होण्याचे प्रमाण पुष्कळ अधिक होते.त्याचा पुनर्वापर करणे ही पुष्कळ खर्चिक गोष्ट असते. त्यामुळे करदात्यांनी दिलेला पैसा असा आनाठाई खर्च होऊ नये म्हणून पॉलीमर नोटा !

दैनंदिन व्यवहारात चहाचे दुकान, भाजी मंडई, रिक्षा, बस इत्यादींसाठी दहा आणि वीस रुपयांच्या नोटांचा वापर अधिक होतो. त्यामुळे त्या जास्त वेळा हाताळल्या जातात आणि लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी पहिल्या टप्प्यात दहा आणि वीस रुपयांच्या कागदी नोटां ऐवजी आता पॉलीमर नोटा असतील.या नोटा विशिष्ट प्लास्टिक कागदापासून तयार केलेल्या आहेत. या चलनी नोटा चुरगळणार नाहीत, घड्यापडून जीर्ण होणार नाहीत , अगदी गटाराच्या पाण्यात पडल्या तरीही त्या धूवून स्वच्छ होतील.या पुष्कळ टिकाऊ आहेत त्यामुळे कागदी नोटांचा वारंवार होणारा छपाईचा खर्च वाचणार आहे. सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की या नोटांच्या एका भागात एक विशिष्ट गोल असेल त्याला ट्रान्सपरंट विंडो असे म्हणतात यामुळे तसेच अन्य तांत्रिक उपाययोजनांमुळे त्या सहजासहजी इतरत्र छापता येणार नाहीत. ही सर्वात महत्त्वाची आणि जमेची बाजू आहे. नकली नोटांच्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था मोडीत काढण्याचे शत्रूचे मनसुबे धुळीस मिळणार आहेत.

**संध्या काटदरे**

सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# दहीहंडी आली आणि नगरपरिषद 'ॲक्शन मोड'मध्ये!

## काही तासांत शहरातील खड्डे बुजविण्याचा 'विक्रम' पाहुणे येणार म्हणूनच रस्त्यांना अच्छे दिन?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ :** यवतमाळच्या इतिहासात नगरपरिषदेने एका दिवसात नव्हे, तर अवघ्या काही तासांत शहरातील अनेक खड्डे बुजविण्याचा 'विक्रम' केल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे. विशेष म्हणजे, हा वेग यवतमाळात आयोजित करण्यात आलेल्या भव्य दहीहंडी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिसून आल्याने नगरपरिषदेच्या कामकाजावरच नागरिकांकडून उपरोधिक सवाल उपस्थित केले जात आहेत.

नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्या पुढाकारातून यवतमाळात दहीहंडीचे आयोजन करण्यात आले असून अभिनेत्री नेहा पेंडसे आणि गायिका वैशाली सामंत यांच्यासह नामवंत कलाकारांची उपस्थिती राहणार आहे.




या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नगरपरिषद परिसर ते इंदिरा गांधी मार्केट, भावे मंगल कार्यालय मार्ग तसेच कामगार चौक ते तिरंगा चौक या परिसरातून कलाकारांसह सामूहिक रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे या मार्गांवरील रस्त्यांची दुरवस्था अचानक नगरपरिषदेच्या नजरेत आली आणि खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले. विशेष म्हणजे, गेल्या अनेक महिन्यांपासून यवतमाळ शहरातील खड्डे, खराब रस्ते आणि नागरिकांच्या गैरसोयीबाबत वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, सामाजिक संघटना तसेच राजकीय विरोधकांनी सातत्याने आवाज उठविला. तक्रारी आणि बातम्यांचा मारा होऊनही नगरपरिषदेच्या कारवाईला अपेक्षित वेग मिळत नव्हता. मात्र, दहीहंडीच्या कार्यक्रमाची घोषणा होताच काही तासांत रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे बुजविले जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामुळे 'कार्यक्रम असेल तरच विकासकामांना वेग येतो का?' असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. या खड्डे बुजविण्याच्या कामासाठी नगरपरिषदेने नेमकी केव्हा निविदा काढली? वर्क ऑर्डर कधी दिली? कोणत्या ठेकेदाराला काम सोपविण्यात आले? कामाची अंदाजित किंमत किती? तसेच कामाच्या गुणवत्तेची तपासणी कोण करणार? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत.

### दर आठवड्याला दहीहंडी घ्या!

**या प्रकारावर यवतमाळकरांनी उपरोधिक प्रतिक्रिया व्यक्त करत, "नगराध्यक्षांनी दर आठवड्याला एखादा मोठा कार्यक्रम घ्यावा, किमान त्या निमित्ताने तरी शहरातील रस्ते आणि खड्ड्यांकडे नगरपरिषदेचे लक्ष जाईल," अशी मिश्कील प्रतिक्रिया दिली. शहरातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी नागरिकांना वारंवार तक्रारी कराव्या लागतात. मात्र, बाहेरून येणारे मान्यवर पाहुणे आणि मोठे कार्यक्रम असतील, तरच शहराची रंगरंगोटी आणि रस्त्यांची डागडुजी होत असेल, तर हा विकासाचा नेमका कोणता निकष, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.**
**दहीहंडीच्या निमित्ताने खड्डे बुजविले जात असतील तर त्याचे स्वागतच; मात्र यवतमाळकरांना सेलिब्रिटी पाहुण्यांची गरज नसून वर्षभर खड्डेमुक्त, सुरक्षित आणि सुस्थितीत रस्त्यांची गरज आहे. कार्यक्रम संपल्यानंतर पुन्हा रस्त्यांची अवस्था 'जैसे थे' होणार नाही, याची हमी नगरपरिषद देणार का, हा खरा प्रश्न आहे.**

# दिव्यांगांना दया नको, हक्क हवा! निधी, रोजगार आणि सुविधांसाठी खासदाराकडे साकडे

## ३० लाखांचा निधी रोजगारासाठी वापरा ग्रामपंचायत-नगरपरिषदांचा ५ टक्के निधीही दिव्यांगांवर खर्च करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ :** जिल्ह्यातील दिव्यांग नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर स्थानिक विश्रामगृहात दिव्यांग नागरिक व विविध दिव्यांग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी बैठकीत सहभागी होत दिव्यांगांच्या अडचणी जाणून घेतल्या.

दिव्यांगांसाठी जिल्हा नियोजन विभागामार्फत उपलब्ध होणारा सुमारे ३० लाख रुपयांचा निधी केवळ औपचारिक वाटपासाठी न वापरता रोजगारनिर्मितीच्या योजनांवर खर्च करावा, अशी मागणी करण्यात आली. सायकल वाटपाऐवजी दिव्यांगांना स्कुटी किंवा मोपेड उपलब्ध करून दिल्यास त्यांना प्रवासासोबत रोजगाराच्या संधीही मिळू शकतील, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. ग्रामपंचायत व नगरपरिषद स्तरावर दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी अनेक ठिकाणी खर्च केला जात नसल्याचा आरोपही संघटनांनी केला. हा निधी दिव्यांगांच्या विकासासाठी प्रत्यक्ष उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, आधार कार्डमधील दुरुस्ती, अंगठ्याचे ठसे व डोळ्यांची स्कॅनिंग न होणे यामुळे अनेक दिव्यांगांना शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याचे बैठकीत निदर्शनास



आणून देण्यात आले. यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दिव्यांग तपासणी व नोंदणी होत असली तरी ऑनलाइन प्रक्रियेसाठी सेतू केंद्रावर जावे लागत असल्याने दिव्यांगांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शासकीय रुग्णालयातच सेतू केंद्र सुरू करावे आणि दिव्यांग नोंदणीची ऑनलाइन साईट कायम कार्यरत ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. खासदार संजय देशमुख यांनी या प्रश्नांवर लवकरच तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली. बैठकीस प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बिपिन चौधरी यांच्यासह विविध दिव्यांग पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात



### आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर ढाणकी पोलीस चौकीत 'शांतता समिती'ची बैठक संपन्न!

**ढाणकी :** आगामी काळात येत असलेले कृष्ण जन्माष्टमी, पोळा आणि गणेशोत्सव हे सण-उत्सव शांततेत, उत्साहात आणि सलोख्याने साजरे व्हावेत, यासाठी दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता पोलीस चौकी ढाणकी येथे 'शांतता समिती'च्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक अत्यंत उत्साहात आणि शांततापूर्ण वातावरणात संपन्न झाली. सदर बैठक मा. प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे साहेब (भा.पो.से.) यांच्या प्रमुख मार्गदर्शनात पार पडली.या बैठकीत आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सण-उत्सव साजरे करताना सर्व नियमांचे पालन करावे आणि शांतता टिकवून ठेवावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.या बैठकीला ढाणकी व परिसरातील सर्व शांतता समिती सदस्य, गणेश मंडळांचे अध्यक्ष व सदस्य, ज्येष्ठ नागरिक, विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, पत्रकार बांधव आणि पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. बिटरगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग शिंदे यांनी बैठकीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले आणि उपस्थितांचे आभार मानले.



### घाटंजी येथील तीज विसर्जन उत्साहात साजरा

**घाटंजी :** तीज विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून बंजारा समाजाची परंपरा, एकता, संस्कृती आणि श्रद्धा जपणारा सुंदर उत्सव आहे. श्रीसंत सेवालाल महाराज तांड्याचा तीज विसर्जन सोहळा नुकताच मोठ्या जल्लोषात पार पडला. बंजारा समाजाच्या परंपरेनुसार संत सेवालाल महाराज मंदिरात तांड्याचे नायक नामदेव आडे, कारभारी अरविंद जाधव, डावो बंडू जाधव व तांड्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत रक्षाबंधनाच्या शुभमुहूर्तावर तीज पेरण्यात आले होते. बंजारा समाजातील अविवाहित मुली या तीजच्या अवती भवती नाचत, बंजारा गाणी गात तीजवर पाणी टाकून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जन्माष्टमीच्या दिवशी श्रीकृष्ण मूर्तीची स्थापना करून पूजा करीत ढमोलीचा कार्यक्रम झाला. तांड्यातील समस्त बंजारा समाजबांधव तीज तोडण्यासाठी एकत्र आले होते. याप्रसंगी उपस्थित तांड्यातील मान्यवर नायक नामदेवराव आडे, पी.एस.राठोड, सौ.सुमित्रा अविनाश चव्हाण , फुलसिंग राठोड, ऐड सौ. निता मनोज राठोड, यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. गावातील प्रमुख मार्गावरून डफड्याच्या तालावर नाचत मिरवणूक काढण्यात आली. वसंतराव नाईक चौक व गणराज वाडा चौकात अभिवादन करण्यात आले. सायंकाळी सात वाजता वाघाडी नदीच्या पवित्र पात्रात श्रीकृष्ण मूर्तीचे व तीजचे विसर्जन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. एस. राठोड यांनी केले तर राष्ट्रीय बंजारा टायगर्सचे शहराध्यक्ष संजय आडे यांनी आभार मानले.



### वसंत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये गोकुळाष्टमी साजरी

**झरी:** वसंत इंग्लिश मीडियम स्कूल, मुकुटबन येथे गोकुळाष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा व गोप-गोपी यांच्या वेशभूषेत सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. शाळेच्या परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. श्रीकृष्णाच्या बाललीला आणि गोकुळातील वातावरणाची सुंदर झलक विद्यार्थ्यांच्या वेशभूषेतून पाहायला मिळाली. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांचे महत्त्व समजण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे गोकुळाष्टमीचा सोहळा अविस्मरणीय ठरला.

# क्रांतिकारी बापू बिरू वाटेगावकरांचे स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा

## यवतमाळ नगरपरिषदेच्या सभेत एकमताने ठराव..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ :** गोरगरीब, वंचित आणि अन्यायग्रस्तांच्या न्यायासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे धनगर समाजाचे क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व बापू बिरू वाटेगावकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी यवतमाळ शहरात स्मारक उभारण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

यवतमाळ नगरपरिषदेच्या सभेत त्यांच्या स्मारकासाठी एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. नगराध्यक्ष प्रियदर्शनी अशोकराव उईके आणि उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी स्मारक उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. बापू बिरू वाटेगावकर यांनी तब्बल २५ वर्षे सह्याद्रीच्या डोंगररांगांत राहून



अन्यायाविरुद्ध संघर्ष केला. कृष्णा खोरे दहशतीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी त्यांनी लढा दिला. पुढे बिनशर्त शरणागती पत्करल्यानंतर न्यायालयाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. शिक्षा भोगून परतल्यानंतर त्यांनी सामाजिक प्रबोधनाचा मार्ग स्वीकारत भजन, कीर्तन आणि प्रवचनातून समाजजागृती केली. व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, गरिबांना कर्जमुक्ती आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा वीर बापू बिरू वाटेगावकर सेवाभावी संस्था संस्थापक अध्यक्ष प्रमोद मेटांगे यांच्या नेतृत्वाखाली पुढे नेत आहे. स्मारकाला मिळालेली एकमताची मंजुरी म्हणजे बापूंच्या संघर्षमय सामाजिक कार्याला यवतमाळचा मानाचा मुजरा असल्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली.

# पावसा अभावी दुष्काळाचे संकट ! खरिप पिकाचे नुकसान..!

## आता सर्वाचेंच बजेट कोलमडणार, .. शेतकरी गोविंदराव देशमुख

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ६ :** तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. खरीप पिकाचे नुकसान होत असून, दुष्काळाचे सावट निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. शेतकरी गोविंदराव देशमुख यांच्या मते बाजारात कांदा, टोमॅटो, भाजीपाला,साखर कोणत्याही शेतमालाचे भाव वधारले की,दोन दोन लाख रुपये पगार असणार्या लोकांच्या बायका माध्यमातून आमचे बजेट कोलमडले वैगरे बोलताना दिसतात. वास्तविक या दरवाढीमुळे शेतकर्या ऐवजी दलाल आणि भांडवलदार व्यवस्थेचा आधीक फायदा होतो.

आतातर यावर्षी सर्वच समाज घटकांचे बजेट कोलमडणार आहे. मागील आनेक दिवसांपासून पावसाने दडी मारली. सोयाबीन, व कपाशी, माना टाकुन शेवटच्या घटका मोजत आहेत. रोग आणि किडीचा प्रादुर्भाव खुप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तर ऊसाची वाढ पन्नास टक्क्यांपेक्षाही खुंटली आहे काल पासुन तर सुर्य आक्टोबंर हिट प्रमाणे आग ओकत आहे. सर्वच हवामान तज्ञाचे पाण्याचे अंदाज फेल ठरले आहेत. आणि शेतकर्‍यांना सुध्दा आता पाणी



पडण्याची शक्यता कमीच दिसत आहे. त्यामुळे हाता तोडांशी आलेले पिक जळतानां पाहुन डोळ्यात पाणी तरळत आहे परंतु यापुढचे चीत्र अतिशय भंयकर आसणार आहे. शासनाच्या कोणत्याही मदतीने भरुन न येणारे नुकसान होणार तर आहेच परंतु शेतकर्यांचा शेतमाल बाजारात येणे बंद झाल्याने काय परीस्थिती निर्माण होते याचा अनुभव या आठ दिवसांत पावसाचे पाणी आले नाही तर सर्वांनाच कळणार आहे. सर्वाचे बजेट कोलमडणार नाही तर सर्व व्यवस्थाच कोलमडुन पडल्याचे दिसून येणार आहे.

**शेतकरी गोविंदराव देशमुख**
**रा. सवना, तालुका महागाव.**

# बोअरची गळती, रस्त्यावर सांडपाणी पाटणबोरीत अपघाताला निमंत्रण!

## स्मशानभूमीजवळील रस्ता निसरडा; मोठी दुर्घटना होण्यापूर्वी ग्रामपंचायतीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पाटणबोरी, दि. ६ :** पाटणबोरी येथील स्मशानभूमीपासून मांडवी मार्गाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून सांडपाणी वाहत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामपंचायतीच्या बोअरवेलला गळती लागल्याने मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावरून वाहत असून, त्यामुळे रस्ता निसरडा झाला आहे.

सततच्या पाण्यामुळे रस्त्यावर शेवाळ साचले असून, दुचाकीस्वार घसरण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. काही वाहनचालक जखमी झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. विशेषतः मांडवी कडे जाणाऱ्या नदीच्या पुलाजवळ पाणी साचल्याने वाहनचालकांना



मोठी कसरत करावी लागत आहे. या मार्गावर पिवरडोल, गवारा आदी भागातील भाजीपाला विक्रेते, शाळकरी विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असते. सांडपाण्यामुळे दुर्गंधी आणि अस्वच्छतेची समस्याही निर्माण झाली आहे. किरकोळ अपघातांनंतरही प्रशासनाला जाग येणार कधी? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सुदैवाने अद्याप मोठी जीवितहानी झालेली नसली तरी परिस्थिती कायम राहिल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपघाताची वाट न पाहता बोअरवेलची गळती तातडीने दुरुस्त करून रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# गोकी डॅमच्या भिंतीवर 'जंगलराज'!

## पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षाने धरण सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर संतप्त नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. ६ :** दारव्हा तालुक्यातील पाथ्रड देवी येथील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या गोकी डॅम प्रकल्पाच्या देखभालीचा बोजवारा उडाला असून धरणाच्या मुख्य भिंतीसह सुरक्षा रस्त्यावर काटेरी झाडाझुडपांचे साम्राज्य पसरले आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या या महत्त्वपूर्ण सिंचन प्रकल्पाकडे पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि संबंधित अभियंते अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

धरणाची मुख्य भिंत हा प्रकल्पाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील भाग मानला जातो. मात्र, या भिंतीवर बाभळींसह विविध जंगली झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. झाडांच्या मुळांमुळे बांधकामाला भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता असून, मोठी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन



पाहत आहे का?, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. धरणावरून जाणारा सुरक्षा रस्ताही झाडाझुडपांनी झाकोळला आहे. काटेरी फांद्यांमुळे नागरिकांना ये-जा करताना दुखापत होण्याचे प्रकार घडत असून, दाट झाडीमुळे साप, विंचू व रानडुकरांचा वावर वाढला आहे. पावसाळा आणि उन्हाळ्यात निसर्ग पर्यटनासाठी जिल्हाभरातून नागरिक येथे येतात. मात्र, अस्वच्छता आणि खराब रस्त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे. देखभालीसाठी निधी खर्च होतो तरी प्रत्यक्षात काम कुठे आहे?, असा सवालही उपस्थित होत आहे.धरणाच्या भिंतीवरील झाडाझुडपांची तातडीने साफसफाई करून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# सोशल मीडियाचा वापर जपून करावा.- अमोल कोळी, (एसडीपीओ)

## तालुक्यात ४३ पैकी ३२ ठिकाणी १ गाव १ गणपती ची स्थापना.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. ६ :** सोशल मीडियाचा वापर करताना अतिशय जबाबदारीने करावा पोलीस पाटलांनी सोशल मीडियावर काय चालले आहे त्यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे म्हणजे वेळेत आक्षेपार्य पोस्ट काढता येईल असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांनी व्यक्त केले.

ते बाभूळगाव पोलीस स्टेशन मध्ये आयोजित केलेल्या तालुका स्तरीय शांतता समितीच्या सभेत अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. तालुक्यात ४३ पैकी ३२ गावात एक गाव, एक गणपतीची स्थापना करण्यात आल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

या वेळी मंचकावर पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित बेंबरे, पोलीस



उपनिरीक्षक दीपक आसकर, पोलीस उपनिरीक्षक विकी जाधव प्रामुख्याने विराजमान होते.

सर्व सन उत्सव शांततेत पार पाडले जावे असे आवाहन पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी केले. गणेश मंडळात येणाऱ्या महिला, मुलींची विशेष काळजी घेणे गरजेचे असून गणेश मंडळांनी स्वयंसेवक ठेवावे असे अमोल कोळी यांनी आपले विचार व्यक्त करताना निर्देश दिले.

शांतता समितीच्या सभेला राळेगाव विधानसभा प्रमुख सतीश मानलवार, माजी सरपंच भारत इंगोले, नगर पंचायतीचे उपाध्यक्ष श्याम जगताप, नगरसेवक अनिकेत पोहोकार, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब गौरकार, नगर सेवक शेख कादर, मयूर पिसे, मुकुंद कासेट्टीवार, प्रेस क्लबचे अध्यक्ष आरिफ अली, राजू नवाडे, शहजाद शेख, सागर परडखे, पोलीस पाटील रसिका मेश्राम, धनश्री देशमुख, लीना महानूर, पुष्पा जयस्वाल, स्वाती गर्जे, गोपनीय शाखेचे पोलीस शिपाई अर्णव अहिरे, तालुक्यातील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी प्रामुख्याने हजर होते. आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक विकी जाधव यांनी केले.

# ग्रामसभेच्या नावाखाली शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा नको!

## शिक्षक समितीचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ६ :** ग्रामसभा घेण्याची सक्ती करून शिक्षकांना अशैक्षणिक कामात जुंपू नये, या मागणीसह प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित सेवाविषयक प्रश्नांकडे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महागाव शाखेने प्रशासनाचे लक्ष वेधले. ४ सप्टेंबर रोजी समितीच्या शिष्टमंडळाने गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

ग्रामसभेच्या कामकाजाबाबत शिक्षकांमध्ये असलेली संभ्रमावस्था दूर करताना गटविकास अधिकाऱ्यांनी, "शिक्षकांनी कोणतीही भीती बाळगू नये. या संदर्भात कोणत्याही शिक्षकावर प्रशासकीय कारवाई होणार नाही. ग्रामसभेत प्रशासकीय प्रतिनिधी म्हणून केवळ इतिवृत्ताचे वाचन करण्याची जबाबदारी राहील," असे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच शिक्षकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी लवकरच विशेष सभा घेण्यात येणार असल्याचे सांगितले. शिक्षकांना शासन निर्णय व



न्यायालयीन आदेशानुसार अशैक्षणिक कामांपासून मुक्त ठेवावे, दरमहा वेतन पावती वेळेत द्यावी, प्रलंबित वैद्यकीय देयके मंजूर करावीत, कपातीचे धनादेश वेळेत जमा करावेत, सेवापुस्तक अद्ययावत करण्यासाठी शिबिर घ्यावे आणि रिक्त पदे पवित्र पोर्टलद्वारे तातडीने भरावीत, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या. शिष्टमंडळात सुरेश पांचाळ, अभिमान मुंडे, सुनील राठोड, संभाजी निंबाळकर, अंकुश पाटील, नितीन व्यवहारे यांच्यासह शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# चांदूर रेल्वेच्या विकासासाठी नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा आक्रमक

## ‘दिशा’ समितीच्या बैठकीत विविध प्रलंबित प्रश्नांकडे जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधींचे वेधले लक्ष

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात खासदार बळवंत वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक पार पडली. या बैठकीत चांदूर रेल्वे नगरपरिषद हद्दीतील विविध विकासकामे आणि नागरिकांच्या समस्यांचा मुद्दा नगराध्यक्ष प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी प्रभावीपणे मांडला. शहराच्या विकासाला



गती देण्यासाठी प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी त्यांनी केली. बैठकीला आमदार प्रवीण पोटे, गजानन लवटे, प्रवीण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह विविध अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकी त मुद्दे उपस्थित करतांना नगराध्यक्ष प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी म्हटले की, चांदूर रेल्वे नगरपरिषदेतील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा करार मे महिन्यात संपला आहे. मात्र, त्यानंतरही नवीन प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण होत आहे. निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून निविदा उघडण्यासही विलंब होत असल्याचे नगराध्यक्षांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी त्यांनी केली. नगरपालिकेकडून घर बांधकामाची परवानगी मिळण्यास मोठा विलंब होत असल्याचा मुद्दाही नगराध्यक्षांनी उपस्थित केला. अनेक नागरिकांनी उन्हाळ्यात बांधकाम पूर्ण केले असतानाही त्यांना वेळेत बांधकाम परवानगी मिळाली नसल्याने नागरिकांसह नगरपरिषदेचेही नुकसान होत आहे. त्यामुळे बांधकाम परवानगीची प्रक्रिया सुलभ व गतिमान करून नागरिकांना तत्काळ परवानगी देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय निधीच्या वापराबाबतही लक्ष वेधले

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार नागरिकांना थकीत कर भरण्यासाठी लागू करण्यात आलेल्या अभय योजनेला शहरवासीयांनी मोठा प्रतिसाद दिला. या माध्यमातून अनेक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कर भरल्याने नगरपरिषदेला महसूल प्राप्त झाला आहे. मात्र, मागील चार महिन्यांपासून नगरपरिषदेच्या निधीतून विविध खर्च होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत निधीचा योग्य व नियोजनबद्ध वापर करण्याची गरज नगराध्यक्षांनी अधोरेखित केली. तसेच नगरपरिषदेत अनेक कर्मचारी पदे रिक्त असल्यामुळे दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे नगरपरिषदेतील रिक्त पदे तातडीने भरून नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी केली. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना थेट जिल्हास्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देत नगराध्यक्ष प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी चांदूर रेल्वेच्या विकासासाठी ठोस पाठपुरावा सुरू ठेवला आहे. त्यामुळे शहरातील प्रलंबित प्रश्नांना आता जिल्हास्तरावरून गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**अमृत पाणीपुरवठा योजनेतील त्रुटींवरही लक्ष वेधले**

रेल्वे शहरात सुरू असलेल्या अमृत पाणीपुरवठा योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळत असल्याचा मुद्दाही त्यांनी बैठकीत उपस्थित केला. योजनेच्या कामाचा दर्जा, नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटी जिल्हाधिकारी तसेच उपस्थित लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत कामाची योग्य तपासणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याची मागणी त्यांनी केली.

## पद्मश्री सुभाष शर्मा यांनी ग्राहक पंचायतच्या मिशन टॅग ए बॅग चे केले कौतुक

**अमरावती/का.प्र.**




नैसर्गिक शेती हा विषय अत्यन्त अभ्यासपूर्ण आणि पोटतिडिकेने मांडून समाजात फार मोठया प्रमाणावर जनजागृती ज्यांनी केली ते आदरणीय पद्मश्री श्री. सुभाषजी शर्मा हे डॉ. हेमंतजी मुरके यांच्या गोकुलम गोरक्षण संस्थेत आले असताना अखिल भारतीय ग्राहक पंचायत, अमरावती शाखेने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक प्रदान करून भावपूर्ण सत्कार केला.

याप्रसंगी पॉलिथीन पिशव्यांच्या नियंत्रणाबद्दल सर्वत्र गाजत असलेल्या मिशन टॅग ए बॅग ची माहितीसुद्धा त्यांना दिली.आणि तारेचा टॅग आणि दोन कापडी पिशव्या देखील स्नेह भेट म्हणून दिल्यात. या अभियानांतर्गत परतवाडा येथील रूट्स पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी हजारो पॉलिथीन पिशव्या बाहेर न फेकता जमा केल्यात आणि रिसायकल करायला दिल्यात हे ऐकून त्यांनी सर्वांचे कौतुक केलेत.हे मिशन एक वेगळ्या प्रकारचे असून आपल्याला खूप आवडले अशी प्रतिक्रिया पद्मश्री सुभाषजी शर्मा यांनी दिली आणि याचा असाच प्रचार प्रसार करा असे सांगत शुभेच्छा दिल्यात.

## आजपासून खारवगळ नाल्यात शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर-ट्रॉली लावून बेमुदत उपोषण

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील घुईखेड परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी अडथळा ठरणाऱ्या खारवगळ नाल्यावर पक्का पूल बांधण्याच्या मागणीने आता आक्रमक वळण घेतले आहे. वारंवार निवेदने, आश्वासने आणि मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी आज, ७ सप्टेंबरपासून खारवगळ नाल्यातच आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, नाल्यात ट्रॅक्टर-ट्रॉली उभी करून पाण्यातच ट्रॉलीमध्ये बसून उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे या आंदोलनाकडे प्रशासन किती गांभीर्याने पाहते,



याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

खारवगळ नाल्याच्या पलीकडे मोठ्या प्रमाणात शेती असून पावसाळ्यात नाल्याला पूर आल्याने शेतकऱ्यांचा शेताकडे जाणारा मार्ग पूर्णपणे धोकादायक बनतो. पाण्याची पातळी वाढल्यानंतर शेतकरी आणि शेतमजुरांना जीव धोक्यात घालून नाला ओलांडावा लागतो. त्यामुळे शेतीची कामे, पिकांची निगा आणि शेतमालाची वाहतूक यावरही मोठा परिणाम होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पुलाची मागणी करूनही केवळ आश्वासनांवरच बोळवण होत असल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला आहे. ‘पूल बांधण्याचे आश्वासन नको, प्रत्यक्ष काम सुरू करा’, अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

नाल्यातील पाण्यामुळे शेतीचे नुकसान होत असतानाच शेतकऱ्यांच्या ये-जा करण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे केवळ पुलाचे बांधकामच नव्हे, तर नाल्याच्या पाण्याचा योग्य निचरा, पाणीप्रवाह आणि परिसरातील शेतीचे होणारे नुकसान यावरही कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शेतकरी पाण्यात उतरून आंदोलन करणार असल्याने प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन तातडीने तोडगा काढणार की आंदोलनाला सामोरे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

खारवगळ नाल्यावर पूल बांधण्याच्या मागणीसाठी वर्षानुवर्षे पाठपुरावा करूनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांनीच नाल्यात उतरून प्रशासनाला जागे करण्याचा निर्णय घेतला आहे. आश्वासनांचा पूर आला, मात्र पुलाच्या बांधकामाचा थेंबही पडला नाही, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांमध्ये आहे.

## संक्षिप्त

### हर हर महादेवच्या गजराने गजबजले श्री बालकनाथ मंदिर.

**निंभा-** भातकुली तालुक्यातील श्री क्षेत्र निंभा येथे श्रावणमासानिमित्य श्री सिद्धयोगी बाबा बालकनाथ मंदिरात भगवान शिवशंकर आणि सिद्धयोगी बाबा बालकनाथ यांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी बघायला मिळत आहे. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बालकनाथ मंदिरात दर सोमवारला निंभा ग्रामस्थ तसेच संस्थानच्यावतीने महाआरती व प्रसादाचे आयोजन करण्यात येते.७ सप्टेंबर रोजी श्रावण महिन्यातील शेवटचा सोमवार असल्यामुळे गावातील काही तरुण उत्साही मंडळाच्यावतीने कावड यात्रेचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या निमित्याने सोमवार तसेच मंगळवारला महाआरती तथा मंगळवार ८ सप्टेंबर रोजी बालकनाथ संस्थानच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन देखील संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

### गोकुळ अष्टमी जन्मोत्सव व अवधुती भजन जागृती

**कुऱ्हा-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कुऱ्हा येथील वार्ड नं. २ मधील शिशुपाल इखार व इखार परिवारातर्फे गोकुळ अष्टमी जन्मोत्सव निमीत्त अवधुती भजनाची सुरुवात दुपारी ४ वा. पासून तसेच रात्री १२ वा. जन्मोत्सव करण्यांत आला. नंतर सामूहीक अवधुती भजन जागर मांड यामध्ये रघुनाथपूर येथील अवधुती



भजन मंडळ रामदास मुंद्रे व संच, वाढोडा खुर्द अवधुती भजन मंडळ रामदास निवल व संच, कुऱ्हा अवधूती भजन मंडळ व शिशुपाल इखार व संच चेनुष्ठा अवधुती भजन मंडळ, मिलींद ढोणे व संच यांचा सहभाग होता. कार्यक्रमाला रूपराव इखार, यशवंत इखार, शिशुपाल इखार, अरविंद इखार, श्रीकांत इखार आणि समस्त इखार परिवार यांच्या उपस्थितीत सामूहीक जागर व भजन मांड सांगता करण्यांत आली. दुपारी १२ वा. पासून आंबिका देवी संस्थान कौंडण्यपूरचे पुजारी व पंढरीनाथ अळसपूरे (मिर्चापूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत महाप्रसाद सुरुवात करण्यांत आली.

### डॉ. नरेंद्र पुरुषोत्तम सिनकर यांना पुरस्कार

**अमरावती-** शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे



विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र पुरुषोत्तम सिनकर यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ऐतिहासिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते डॉ. सिनकर यांचा गौरव करण्यात आला.डॉ. नरेंद्र पुरुषोत्तम सिनकर हे शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

# मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू शाळेत शाळा व्यवस्थापन समिती गठण

## सलमान उर्फ राजिक खान अध्यक्ष, फरहत अंजुम यांच्यावर उपाध्यक्षपदाची जबाबदारी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

नगर परिषद मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू पूर्व माध्यमिक शाळा, चांदूर रेल्वे येथे सन २०२६-२८ या कालावधीसाठी नवीन शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. शाळेच्या परिसरात नकत्याच आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला १३३ विद्यार्थ्यांच्या पालकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवत शाळेविषयीची आपली जागरूकता अधोरेखित केली.

बैठकीत सर्वानुमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी सलमान उर्फ राजिक खान रशीद खान (मेहरबाबा नगर) यांची निवड करण्यात आली, तर माजी उपाध्यक्ष फरहत अंजुम यांच्यावर पुन्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. शाळेच्या



मुख्याध्यापिका नाहिद अख्तर यांनी समितीच्या सचिवपदाची जबाबदारी स्वीकारली. कार्यकारिणीच्या सदस्यपदी हिना सैय्यद अबरार, फरहत जहाँ रजे खाँ, शबाना अजीज पठाण, अब्दुल फहीम, नवेद खान नियामत खान, परविन निखहत, सैय्यद एजाज, इस्राईल खान नसरुल्ला खान, नाहिद अंजुम, सुमैय्या सदफ वजाहत हुसैन आणि अब्दुल नसीम यांची निवड करण्यात आली. तसेच ‘शिक्षक तज्ज्ञ’ म्हणून मोहम्मद साबीर मो. कसीम, तर ‘शिक्षक प्रतिनिधी’ म्हणून अब्दुल गफ्फार यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी न.प. गटनेते हाजी अनीस सौदागर, नगरसेविका निलोफर शेख, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष नूरुलहसन कुरेशी, माजी अध्यक्ष फिरोज खान, नवाज अहमद, नाहिद कुरेशी, शहनाज हारून बेग, जमील कुरेशी, वजाहत आबिद, हिना सैय्यद अबरार, नियामत खान आणि सैय्यद एजाज यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक मोहम्मद वसीम कुरेशी यांनी केले. यास्मीन मॅडम यांनी आभार मानले. यावेळी सैय्यद उझैर यांचे विशेष सहकार्य लाभले. बैठकीला उपस्थित पालक व मान्यवरांनी नवनिर्वाचित शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासह शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांना ‘डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार’

## चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुणे विद्यापीठाच्या ऐतिहासिक सभागृहात गौरव

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात बी. एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील मराठी विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद भीमराव गारोडे यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार’ (सन २०२४-२५) प्रदान करण्यात आला. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभहस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, कला शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, कुलसचिव प्रा. प्रफुल्ल पवार, उच्च शिक्षण



विभागाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोराडे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.प्रा. डॉ. गारोडे हे बी. एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे मराठी विभागात कार्यरत आहेत. अध्यापनाकडे केवळ ज्ञानदानाचे माध्यम म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन म्हणून त्यांनी त्याकडे पाहिले आहे.

प्रा. डॉ. गारोडे यांनी अध्यापनाबरोबरच संशोधन क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मराठी भाषा व साहित्याशी संबंधित विविध विषयांचा अभ्यास,संशोधनपर लेखन आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि नव्या पिढीतील अभ्यासकांना साहित्याकडे चिकित्सक आणि व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्या शाखेचे सदस्य म्हणूनही ते शैक्षणिक व विद्यापीठीय क्षेत्रात सक्रिय आहेत. विद्यापीठीय जबाबदाऱ्या पार पाडताना शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासक्रमाशी निगडित बाबी, विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन आणि उच्च शिक्षणातील सकारात्मक बदल यासाठी त्यांचा सहभाग राहिला आहे.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऐतिहासिक सभागृहात झालेला हा गौरव सोहळा प्रा. डॉ. गारोडे यांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. अध्यापनातील सातत्य, संशोधनाची निष्ठा, साहित्यिक जाण, विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी या विविध पैलूंच्या एकत्रित योगदानाची राज्य शासनाने केलेली ही पावती असल्याचे मानले जात आहे.

# १३ तारखेला गणपतीचे नवे गाणे होणार रिलीज

## अरुण सांगोळे,अमित चंद्रमोरे आणि अमृता जोशी यांची गणेशभक्तांना सांगितीक भेट



**अमरावती/का.प्र.**

आगामी गणेशोत्सवाचे औचित्य साधून संगीतप्रेमींसाठी आणि गणेश भक्तांसाठी एक खास भेट अमरावती तसेच नाशिक येथील कलाकार घेऊन येत आहेत. श्री गणरायाच्या आगमनानिमित्त मोरया फिल्म्स युट्युब चॅनेल प्रस्तुत एक विशेष भक्तीगीत ‘गणनायका’ हे येत्या तेरा तारखेला विविध समाजमाध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या भक्तीगीताचे गायन नाशिकची सुप्रसिद्ध गायिका अमृता जोशी हिने केले असून गाण्याला प्रसिद्ध संगीतकार अमित चंद्रमोरे यांनी बहारदार संगीत दिले आहे. या गाण्याचे भावपूर्ण शब्द अमरावती येथील कवी, गझलकार आणि गीतकार प्रा अरुण सांगोळे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारले आहे.मुंबईचे ख्यातनाम संगीत संयोजक अमित पाध्ये यांनी या गाण्याचे संगीत संयोजन केले आहे. त्यामुळे या गाण्याला एक उत्तम तांत्रिक आणि संगीतमय दर्जा लाभला आहे.गाण्यात स्टेल्ला अँथोनी आणि अंजली चंद्रात्रे यांनी सहगायनाची साथ दिली आहे. नाशिक येथील फेदरटच स्टुडिओमधे शुभम जोशी यांनी या गाण्याचे ध्वनिमुद्रण आणि मिश्रण केले असून महेश खर्जुल यांनी गाण्याचे आकर्षक पोस्टर डिझाइन तयार केले आहे.गणनायका गिरिजात्मका ही एक अत्यंत भावपूर्ण आणि उदात्त अशी प्रार्थना आहे. यामधे गणेशाचे वर्णन केवळ विघ्नहर्ता म्हणून नाही तर मानवी जीवनात सकारात्मकता, समाधान आणि माणुसकी पेरणाऱ्या एका परमतत्वाच्या रूपात केले असल्याची भावना कवी अरुण सांगोळे यांनी सदर प्रतिनिधीजवळ व्यक्त केली.

## राष्ट्रीय स्तरावर मराठीचा झेंडा!

# वरूडच्या शासकीय आश्रमशाळा माणिकपूरला देशात द्वितीय क्रमांक

## १० व्या ‘सीआयआय स्कूल एज्युकेशन समिट’मध्ये नवी दिल्लीतील ‘द ललित’मध्ये देशातील अव्वल ५ शाळांमध्ये रंगली अंतिम लढत

**वरूड/वार्ताहर**

दुर्गम व ग्रामीण भागातील आश्रमशाळाही राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग भरारी घेऊ शकतात, हे अमरावती जिल्ह्यातील वरूड तालुक्यातील ‘शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, माणिकपूर’ या शाळेने सिद्ध करून दाखवले आहे. नवी दिल्ली येथे भारतीय उद्योग महासंघ यांच्या वतीने आयोजित ‘१०th CII School Education Summit २०२६’ या राष्ट्रीय परिषदेत माणिकपूर आश्रमशाळेने देशात द्वितीय क्रमांक पटकावून नवा इतिहास रचला आहे.

नवी दिल्लीतील ‘द ललित’ या पंचतारांकित हॉटेलमध्ये पार पडलेल्या या परिषदेची मुख्य संकल्पना **'Future of Education: Building Educators, Transforming Learners'** अशी होती. परिषदेचे उद्घाटन भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या परिषदेमध्ये सीआयआय (CII) चे महासंचालक चंद्रजित बॅनर्जी, सीआयआय स्कूल्स फोरमच्या चेअरपर्सन मीनाक्षी सिंग यांच्यासह देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि धोरणकर्ते उपस्थित होते.

या परिषदेअंतर्गत 'Integration and Delivery of Vocational Education in India' (भारतातील शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रीकरण आणि वितरण) या विषयावर राष्ट्रीय केस स्टडी




स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. संपूर्ण भारतातून आलेल्या शेकडो नामांकित शाळांच्या प्रस्तावांमधून अव्वल ५ शाळांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली होती.या अंतिम फेरीत देशातील ४ नामांकित सीबीएसई (CBSE) शाळा आणि एकमेव मराठी माध्यमाची माणिकपूर शासकीय आश्रमशाळा अशी चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली.

शाळेचे मुख्याध्यापक मा. जी. बी. तेलमोरे सर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नवी दिल्ली येथे गेलेल्या आश्रमशाळेच्या प्रतिनिधी पथकाने तज्ज्ञ राष्ट्रीय ज्युरींसमोर प्रभावी सादरीकरण केले. शाळेचे प्राथमिक शिक्षक एन. डी. काळे सर आणि व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षक व्ही.बी.सोने सर यांनी आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय वयातच कौशल्याधिष्ठित, रोजगारक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी शाळेत राबवल्या जाणाऱ्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण मॉडेलचे सादरीकरण केले.

मराठी माध्यमातील या अभिनव उपक्रमाचे आणि सादरीकरणाचे राष्ट्रीय ज्युरींनी विशेष कौतुक केले. सर्व निकषांवर आधारित मूल्यमापनानंतर परिषदेच्या समारोप व पारितोषिक वितरण सत्रात माणिकपूर आश्रमशाळेला देशात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.एका दुर्गम आदिवासी भागातील मराठी आश्रमशाळेने राष्ट्रीय पातळीवर मारलेली ही मजल संपूर्ण अमरावती जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या आदिवासी विकास विभागाची मान उंचावणारी ठरली आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल शाळेचो मुख्याध्यापक, सादरीकरण करणारे शिक्षक प्रतिनिधी, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांवर शिक्षण क्षेत्रातून व सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ‘सीजेपी’ चालती ‘उबाठा’ची पावले?

सध्या राज्यात उपोषणे, मोर्चे व आंदोलनांचे उदंड पीक फोफावले आहे. या आंदोलनांपैकीच नाशिक येथे सुमारे १४ दिवसांपासून आदिवासी वसतिगृहातील असुविधांच्या विरोधात विद्यार्थ्यांचे आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे. हे आंदोलन मात्र ‘जेन-झी’चे नव्हे तर, ख-या विद्यार्थ्यांचे खरे आंदोलन आहे. कारण, ‘जंतरमंतर’वर जो महिनाभर तमाशाचा फड रंगला होता. तसा प्रकार येथे नाही. आज राज्याच्या राजकारणात ‘जेन-झी’बद्दल ‘फुकाचा’ पुळका दाखवून, आपली राजकीय पोळी भाजून घेण्याची, किंवा आपला स्वार्थ साधून घेण्याची ‘कारभा-यां’मध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. यात हौशे, नौशे, गौशे, मंदबुद्धी, अपरिपक्व असे नवशिकेही मागे नाहीत. यांचे हे ‘जेन-झी’ वरचे प्रेम नसून त्यांच्या मतपेटीवरचा ‘नेम’ व आपली डुबती नौका वाचवण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आहे. तसेच, ‘महायुती’चे सरकार अडचणीत आणण्याचा हा दयनीय प्रकार आहे, हे न समजण्याइतकी जनता आता ‘दूधखुळी’ नक्कीच राहिलेली नाही, हे या ‘नौटंकीबाजां’ना कसे समजत नाही? याचेच आश्चर्य वाटते.

या अंतर्गत नुकतेच ज्युनिअर व सिनीयर ‘पप्पू’ नाशकात येऊन, या आंदोलक विद्यार्थ्यांसमोर ‘मगरीचे अश्रू’ ढाळत आपल्या बेगडी प्रेमाचे प्रदर्शन मांडून गेले. त्यांची पाठ फिरते न फिरते तोच, पाठोपाठ युवकांवरील ‘पुतणा’ मावशीचे प्रेम दाखवण्यासाठी ‘कॉक्रोच जनता पक्षा’चा ‘जेन-झी’ संस्थापक अभिजीत दीपके याने या विद्यार्थ्यांची भेट घेऊन, माझा व पक्षाचा तुमच्या आंदोलनाला पाठिंबा आहे,असे सांगितले. तसेच, आता उपोषण स्थगित करा. परंतु, आंदोलन चालूच ठेवा. या आंदोलनाची व्याप्ती राज्यभरात वाढवून, आपण दिल्लीतील ‘जंतरमंतर’प्रमाणे सकल आदिवासींचा मोर्चा थेट मुंबईला घेऊन जाऊ; आणि आदिवासी विकासमंत्र्यांना राजीनामा द्यायला भाग पाडू, असा इशारा दिला. आता हा इशारा होता की, या विद्यार्थ्यांना भडकवण्याचा केलेला प्रयत्न होता? असा प्रश्न मनात उभा राहतो. कारण, आपण कसे कट्टर भाजपद्वेशी आणि ‘उपद्रवी झुरळ’ आहोत, हे त्याने आपल्या अनेक ‘लीलां’नी दाखवून दिले आहे. याने काहीही संबंध नसताना मनोज जरांगेच्या आंदोलनाला पाठिंबा दिला व लवकरच भेटणार असल्याचेही कळवले आहे. पंजाब व कर्नाटक राज्यांतही पेपर फुटले होते. तेथे ‘आप’ व ‘काँग्रेस’चे सरकार असल्याने तेथील शिक्षणमंत्र्यांचे राजीनामे मागणे तर सोडा पण, त्यावर ‘ब्र’ शब्दही या ‘झुरळा’ने काढला नव्हता. झारखंडच्या रांचीमध्येही याच मुद्यावरून विद्यार्थ्यांचे आंदोलन चालू होते. येथे ‘इंडिया आघाडी’चे सरकार असल्याने या आंदोलनाकडेही याने हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले. परिस्थिती चिघळून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व सरकार अडचणीत येण्यासाठी ‘देव पाण्यात बुडवून’ बसलेल्या विरोधकांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी धर्मेंद्र प्रधान यांनी स्वतःहून राजीनामा दिला. परंतु, सरकार आपल्यापुढे झुकले, असा गैरसमज करत अभिजीत दीपके व त्याच्या झुरळांना पंख फुटून ते हवेत उडू लागली.याबाबत पत्रकारांनी दीपकेला छेडले असता, ३६ दिवस आंदोलन केल्याने झुरळं थकली होती. थोडी मौजमजा केली तर काय बिघडले’? असा उलट प्रश्न त्याने पत्रकारांना केला होता. मग, राजीनामा दिल्यानंतर प्रधानांच्या सहका-यांनी त्यांचे स्वागत केले तर, यांना ‘मिरच्या झोंबण्या’चे कारणच नव्हते. आणि थकण्यासाठी यांनी कसे आणि काय आंदोलन केले होते, हे संपूर्ण जगाने बघितले होते. याआधीही पंतप्रधानांना अश्लील शिविगाळ केल्याप्रकरणी या ‘असंस्कारी’ झुरळाने शिव्या देणे हा गुन्हा आहे का’? अशी मुक्ताफळे उधळली होती.



थोड्याच दिवसांत यांच्या अहंकार आणि ‘मग्रुरपणा’च्या फुग्याला टाचणी लागायला सुरुवात झाली. एक समिती नेमण्यासाठी यांना बैठक घेण्यास दिल्लीत कोणी जागा द्यायला तयार होत नव्हते. इकडून तिकडून कसा तरी एक हॉल मिळवला. पण, त्या मालकानेही ऐनवेळी नकार देत यांना यांची औकात दाखवून दिली. मग संभाजीनगरमध्ये दीपकेच्या घरी बैठक घेण्याचे ठरले. सदर बैठकीसाठी आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावणारे गुजरातच्या अहमदाबाद येथील मनीष ब्रह्मभट्ट व राहुल पांड्या हे २ आंदोलक आले होते. परंतु, त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. या निषेधार्थ त्यांनी दीपकेच्या घरासमोर उपोषणही केले होते.याच दरम्यान, याने त्याच्या संरक्षणासाठी दिलेल्या पोलिस ताफ्यातील सुरेश सांगळे नावाच्या पीएसआयला अरेरावी करत, तेथे थांबण्यास मज्जाव करत, आपला मग्रुरपणा दाखवून दिला होता. आंदोलन संपल्यानंतर मग प्रसिद्धीसाठी ‘स्कूल ठीक करो’ ही मोहीम त्याने हातात घेतली. सरकारी शाळांत जाऊन तेथील असुविधांबद्दल सरकारला जाब विचारायचा, असा हा त्या मोहिमेमागचा उद्देश होता. कल्पना छान होती. पण, ती राबवण्यामागचा हेतू अयोग्य होता. झोपेतून उठल्यासारखे केव्हाही उठायचे, पूर्वसूचना न देता, प्रसारमाध्यमांना सोबत घेऊन कोणत्याही शाळेत घुसायचे, तेथील शिक्षकांची ‘झाडाझडती’ घ्यायची, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय आणायचा, शिक्षक व मुख्याध्यापकांना निलंबित करण्याच्या मागण्या करायच्या; आणि या सर्वाचे चित्रीकरण करून ते समाज माध्यमांवर व वृत्तवाहिन्यांवर दाखवून, सवंग प्रसिद्धी मिळवून सरकारवर दबाव आणायचा, असा ‘गोरखधंदा’ यांनी सुरू केला होता.त्यांची ही ‘नौटंकी’ नागरिकांच्या लक्षात आल्यामुळेच जयपूर व उदयपूर येथील नागरिकांनी त्यांना चोप देऊन गावातून हुसकावून लावले होते.अशाच प्रकारे लातूरमधील एका शाळेत ही झुरळं घुसली आणि शमशाद बानो शेख नावाच्या शिक्षिकेवर प्रश्नांची सरबत्ती करण्यास सुरुवात केली. पण, शेख या ‘शेरास सव्वाशेर’ निघाल्या. तुमच्याकडे परवानगी आहे का? पूर्वसूचना का दिली नाही? चौकशी करण्याचा तुम्हाला अधिकार आहे का? असे अनेक प्रश्न विचारत त्यांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता, त्यांनी पोलिसांत तक्रार दिल्याने या झुरळांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यासंदर्भात, न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. परंतु, कोणत्याही शाळेत विनापरवानगी व कोणतीही पूर्वसूचना न देता जाणे, चित्रीकरण करणे याला मज्जाव करत, ही याचिका न्यायालयाने फेटाळून लावली. हा या झुरळांना मोठा धक्का तर होताच. पण, मनीष ब्रह्मभट्ट व राहुल पांड्या या त्यांच्या २ सहका-यांनी यांना ‘४४० व्होटस्’चा ’जोरका झटका धीरे’से दिला आहे.

**ब्रह्मभट्ट व पांड्या यांनी दीपके व त्याच्या निवडक सहका-यांची पिसे काढताना, आम्ही नाईलाजाने या पक्षातून बाहेर पडत असून, लवकरच ‘कॉक्रोच जनता पक्ष डेमोक्रॅटिक’ या नव्या पक्षाची स्थापना करणार आहोत’, अशी घोषणा करत, ‘सीजेपी’त उभी फूट पडल्याचे जाहीर केले.**

२ दिवसांपूर्वी या दोघांनी एक पत्रकार परिषद घेऊन, दीपके व त्याच्या सहका-यांचे पितळ उघडे पाडले आहे. आंदोलन यशस्वी झाल्यानंतर त्याचे राजकारण केले गेले व ते मोठ्या व्यक्तींपुरते मर्यादित ठेवले गेले. देशभरातील कोणत्याही आंदोलक, तळागाळातील कार्यकर्ते व समाज माध्यमांद्वारे पाठिंबा देणा-या एकाशीही सल्लामसलत केली गेली नाही. प्रत्येक राज्यातून किमान ५ आंदोलक व स्वयंसेवकांचा समावेश असलेला एक राष्ट्रीय संघ तयार करायचा. तसेच, संघ निवड प्रक्रिया हायकमांड किंवा कोणत्याही एका व्यक्तीच्या आदेशापासून मुक्त असावी, असे ठरले होते. परंतु, याला हरताळ फासत व मनमानी करत ‘आप’ पक्षाचे कार्यकर्ते, काही नातेवाईक, कॉलेजचे मित्र व सर्वांच्या गर्लफ्रेंड गोळा करून, एक लिमिटेड कंपनी बनवली गेली. अशा प्रकारची धूर्तता आणि मनमानीची कल्पना ही केजरीवालचीच आहे. ही टीम आता पहिल्यापासूनच फसवणुकीची कार्यशैली असणा-या केजरीवालची टीम झाली आहे. पहिली अण्णा हजारेंची फसवणूक केली होती, आता आमची फसवणूक केली आहे. असे अनेक गंभीर आरोप या दोघांनी दीपके व त्याच्या निवडक सहका-यांवर करून त्यांची पोलखोल केली आहे.

ब्रह्मभट्ट व पांड्या यांनी दीपके व त्याच्या निवडक सहका-यांची पिसे काढताना, आम्ही नाईलाजाने या पक्षातून बाहेर पडत असून, लवकरच ‘कॉक्रोच जनता पक्ष डेमोक्रॅटिक’ या नव्या पक्षाची स्थापना करणार आहोत’, अशी घोषणा करत, ‘सीजेपी’त उभी फूट पडल्याचे जाहीर केले. अहंकार,लालसा,एककल्लीपणा व ‘मग्रुरी’मुळे ‘दहा हत्तींचे बळ’ असणा-या बलाढ्य रावणाचा विनाश झाला.संक्रांतीला अजून ४ महिने बाकी असताना, आजच ‘सीजेपी’वर संक्रांत यावी, याचे वाईट वाटते. विद्यार्थ्यांवर लाठीमार झाल्यानंतर सर्वात प्रथम त्यांचे बेगडी सांत्वन करण्यासाठी व ‘भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे’, असा आशीर्वाद देण्यास, हातातले ‘रामरक्षा’ आंदोलन अर्धवट सोडून उधोजीराव गेले होते. एका रात्रीत ‘भरती’ आलेल्या ‘विष्णू’च्या पक्षाला ‘ओहोटी’चे ग्रहण लागून अवघ्या २ महिन्यांत ‘सीजेपी’ चालती ‘उबाठा’ची पावले, अशी दयनीय अवस्था व्हावी, हा संगतीचा परिणाम म्हणायचा की, ‘योगायोग’ समजायचा? हे तुम्हीच ठरवा.

**- प्रदीप व्ही.खोलमकर,**
नाशिक.
मो.८७६७५९२९८०

## त-ड-का

### संवाद..!

तू आधी बरसला
म्हनुन भाऊ पेरलं
आता कायले-
हूलकावनी देऊन राहीलं?

आवतन देऊन
जेऊ नाय घालायचं
असे कोतेपन
काय रे कामाचं ?..

पाठीवर मार बाबा
पोटावर नगं मारु
पाण्याविना पिक गेलं
जीव लागलाय झुरु..!

**प्रा अशोक सारडा,**
**मेहकर**

९४२१३९४३३९

# निष्पाप मुलींचे हुंडाबळी थांबतील का?

**हुंड्याच्या लालसेपोटी आजही विवाहित महिलांचा छळ आणि हुंडाबळीच्या घटना सुरूच आहेत. मुलीच्या सुखासाठी सर्वस्व देणाऱ्या आई-वडिलांच्या अपेक्षांना या घटनांमुळे मोठा धक्का बसतो.**

मुलगी सुखाने नांदावी, तिचे वैवाहिक जीवन आनंदी असावे, या अपेक्षेने आई-वडील आपल्या ऐपतीपेक्षा अधिक खर्च करून तिचे लग्न लावून देतात. हुंडा, दागिने, मानपान आणि लग्नाचा अवाढव्य खर्च करण्यासाठी अनेक कुटुंबे कर्ज काढतात. मात्र, एवढे करूनही काही सासरच्या मंडळींचा पैशाचा हव्यास संपत नाही. उलट माहेरची आर्थिक परिस्थिती लक्षात आल्यानंतर वेगवेगळ्या कारणांनी पैशांची, जमिनीची, सोन्याची किंवा व्यवसायासाठी मदतीची मागणी सुरू होते.

मुलीच्या सुखासाठी सुरुवातीला केलेली मदतच अनेकदा सासरच्या मंडळींच्या अपेक्षा वाढवते. एकदा मागणी पूर्ण झाली की पुढील मागणी करण्याचे धाडस वाढते. ती पूर्ण झाली नाही की सुनेचा मानसिक किंवा शारीरिक छळ सुरू होतो. अनेक मुली आई-वडिलांना त्रास होऊ नये, दोन्ही कुटुंबांची प्रतिष्ठा टिकावी, या भावनेने हा अन्याय सहन करत राहतात. परिणामी परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतरच सत्य समोर येते.

आजही देशातील अनेक भागांत हुंडाबळीच्या घटना घडत आहेत. कधी मारहाण करून, कधी मानसिक छळ करून तर कधी आत्महत्येस प्रवृत्त करून विवाहितेचा जीव घेतला जातो. काही घटनांमध्ये खुनाला आत्महत्येचे स्वरूप देण्याचाही प्रयत्न होतो. त्यामुळे अशा प्रकरणांचा निष्पक्ष आणि वेगवान तपास होणे अत्यंत आवश्यक आहे. दोषींना कठोर शिक्षा झाली तरच कायद्याचा धाक निर्माण होईल.

या प्रश्नाकडे केवळ गरीब कुटुंबांची समस्या म्हणून पाहता येणार नाही. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांमध्येही हुंडा, मानपान आणि प्रतिष्ठेच्या नावाखाली मोठ्या अपेक्षा केल्या जातात. विशेषतः पुणे जिल्ह्यासारख्या झपाट्याने आर्थिक बदल होत असलेल्या भागात जमिनीच्या वाढलेल्या किमतीमुळे काही कुटुंबांच्या हातात अचानक मोठ्या प्रमाणात पैसा आला आहे. शेतीच्या जमिनी विकून कोट्यवधी रुपये मिळविणे, मोठ्या इमारती उभारणे आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक विषमता यामुळे सामाजिक प्रतिष्ठेची नवी मोजमापे तयार झाली आहेत. गाडी, बंगला, जमीन आणि पैसा यावर प्रतिष्ठा ठरवण्याची प्रवृत्ती वाढत आहे.



या खोट्या प्रतिष्ठेचा परिणाम विवाहसंस्थेवरही होत आहे. ’आपली मुलगी आपल्यापेक्षा श्रीमंत घरात जावी’ ही पालकांची इच्छा स्वाभाविक असली, तरी लग्नाच्या व्यवहारात भावनिक होऊन अवाजवी देणग्या देणे धोकादायक ठरू शकते. आपण किती सक्षम आहोत, हे सासरच्या मंडळींना दाखवण्याची गरज नाही. कारण त्यातून भविष्यातील आर्थिक मागण्यांना खतपाणी मिळू शकते. हुंडाबळीच्या घटनांमध्ये स्त्रियांची भूमिकाही काही वेळा चर्चेत येते. सासू, नणंद किंवा घरातील अन्य महिला सुनेवर नियंत्रण ठेवतात, तिच्या प्रत्येक व्यवहारात हस्तक्षेप करतात, तिला आर्थिक स्वातंत्र्य देत नाहीत, अशा तक्रारी अनेकदा समोर येतात. मात्र, याचा अर्थ सर्व स्त्रिया दोषी आहेत असा नाही. समस्या ही व्यक्तीच्या मानसिकतेची आणि कुटुंबातील सत्तासंबंधांची आहे. घरात कोणत्याही एका व्यक्तीचा अवाजवी हस्तक्षेप वाढला, तर सुखी संसारातही विष पेरले जाऊ शकते. ’लेक चालली सासरला’ आणि ’माहेरची साडी’ यांसारख्या चित्रपटांनी सुनेचा छळ, हुंडा आणि कौटुंबिक अन्यायाचे वास्तव प्रभावीपणे मांडले. त्या काळात या विषयांवर समाजात मोठी चर्चा झाली. मात्र, आज मनोरंजनाच्या माध्यमांमध्ये कौटुंबिक कलह आणि हिंसाचाराचे चित्रण वाढले आहे. टीआरपीच्या स्पर्धेत संवेदनशील विषय हाताळताना त्याचा सामाजिक परिणाम लक्षात घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यूच्या घटनेने महाराष्ट्राला हादरवून सोडले. त्यानंतर पिंपरी-चिंचवडमधील शिल्पा गवारे यांच्या आत्महत्येच्या प्रकरणानेही मोठी खळबळ उडाली. या प्रकरणांत राजकीय आणि सामाजिक स्तरावर प्रतिक्रिया उमटल्या. तपास जलदगतीने व्हावा, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी झाली. अशा घटनांना प्रसिद्धी मिळणे हा उद्देश नसून, त्यातून भविष्यातील घटना रोखण्यासाठी ठोस व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. हुंडाबळी रोखण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची किंवा महिला आयोगाची नाही. कुटुंब, समाज आणि प्रत्येक नागरिकाची त्यात भूमिका आहे. मुलीने लग्नानंतर होणारा मानसिक किंवा शारीरिक छळ लपवून ठेवू नये. आई-वडिलांनीही ’समाज काय म्हणेल?’ या भीतीपेक्षा मुलीच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. सुरुवातीच्या टप्प्यावरच पोलिसांची किंवा कायदेशीर यंत्रणेची मदत घेतली, तर गंभीर घटना टाळता येऊ शकतात.

पोलिसांनीही अशा तक्रारींकडे केवळ कौटुंबिक वाद म्हणून न पाहता गांभीर्याने कारवाई करणे आवश्यक आहे. समज देऊन प्रकरण मिटवण्याऐवजी दोष आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. तपासाला विलंब झाला किंवा आर्थिक आणि राजकीय प्रभावामुळे आरोपी सुटले, तर समाजात चुकीचा संदेश जातो. हुंडा देणे-घेणे ही केवळ कायद्याची बाब नाही; ती सामाजिक मानसिकतेची समस्या आहे. मुलीच्या सुखासाठी केलेला खर्च तिच्या सुरक्षिततेची हमी देत नाही. उलट, अवाजवी देणग्या आणि मानपानाच्या प्रथेमुळे लोभाला प्रोत्साहन मिळू शकते. त्यामुळे विवाह हा व्यवहार न राहता दोन कुटुंबांना जोडणारा संस्कार राहणे आवश्यक आहे.

**विनायक गायकवाड**

# अभूतपूर्व कार्याने तुकाराम मुंडे आणि वैभव गायकवाड विलक्षण चर्चेत

सध्या महाराष्ट्रातील धडाडीचे आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळख असलेल्या आयएएस तुकाराम मुंडे यांच्या कार्यशैलीची जोरदार चर्चा होत असताना तेलंगणात महाराष्ट्राच्या मातीतून गेलेल्या एका आयपीएस अधिका-याने आपल्या कार्यक्षमतेची वेगळी छाप निर्माण केल्यामुळे तेही चर्चेच्या अग्रस्थानी आहे. तेलंगणासह हैदराबादमध्ये भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणा-या भेसळखोरांवर कठोर कारवाई करण्याचा विडाच वैभव गायकवाड यांनी उचलल्याचं त्यांच्या कारवाईतून पाहायला मिळत आहे.आहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव माळवी येथील मूळ रहिवासी असलेले आयपीएस अधिकारी वैभव रघुनाथ गायकवाड यांनी तेलंगणा कॅडरमध्ये विविध महत्त्वाच्या जबाबदा-या सांभाळत गुन्हेगारीविरोधात धडक कारवाईचा धडाका कायम ठेवला आहे. सध्या ते हैदराबाद शहरात डीसीपी, टास्क फोर्स म्हणून कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संघटित गुन्हेगारी, राऊडीशीटर्स, अवैध धंदे, अमली पदार्थांची तस्करी तसेच अन्नभेसळीविरोधात प्रभावी कारवाया सुरू आहेत.

आयपीएस वैभव गायकवाड हे भारतीय पोलीस सेवेत २०१८ मध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांची तेलंगणा कॅडरमध्ये नियुक्ती झाली. तेलंगणामध्ये त्यांच्या सेवेला नालगुंडा जिल्ह्यात प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून सुरुवात झाली. त्यानंतर वरंगळ येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. वरंगळमध्येच अप्पर पोलीस उपआयुक्त (प्रशासन) तसेच टास्क फोर्स या महत्त्वाच्या जबाबदा-याही त्यांनी पार पाडल्या. त्यानंतर पेद्दापल्ली आणि नागरकर्नूल या दोन जिल्ह्यांत पोलीस अधीक्षक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. विविध जिल्ह्यांमध्ये काम करताना कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी नियंत्रण, तपास आणि प्रतिबंधात्मक पोलिसिंगचा व्यापक अनुभव त्यांना मिळाला. डिसेंबर २०२५ पासून ते हैदराबाद शहरात पोलीस उपायुक्त, टास्क फोर्स म्हणून कार्यरत आहेत.

हैदराबाद शहरातील टास्क फोर्सची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. संघटित गुन्हेगारी, गुंडागर्दी, राऊडीशीटर्स, अवैध धंदे, संवेदनशील व गंभीर गुन्ह्यांचा तपास आणि शोध तसेच मोठ्या प्रमाणातील मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणण्याचे काम या विभागामार्फत केले जाते. याशिवाय गणपती, दुर्गाष्टमी, मिलाद-उन-नबी, मोहरम आणि बोनालूसारख्या मोठ्या धार्मिक व संवेदनशील कार्यक्रमांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, सुरक्षा बंदोबस्ताचे नियोजन करणे आणि संभाव्य धोके टाळणे ही महत्त्वाची जबाबदारीही टास्क फोर्सकडे असते.




मार्च २०२६ पासून हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) ने अन्नभेसळीविरोधात बुद्धिमत्ता-आधारित कारवाई सुरू केली. विविध खाद्यपदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीच्या ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त साहित्य जप्त करण्यात आले. मार्च २०२६ पासून आतापर्यंत २०८ गुन्हे दाखल करण्यात आले असून २३२ प्रकरणे अन्न सुरक्षा अधिका-याकडे सोपविण्यात आली आहेत. या कारवाईदरम्यान तब्बल २ लाख ९२ हजार २९८ किलो म्हणजेच सुमारे २९२ टन भेसळयुक्त साहित्य जप्त करण्यात आले आहे. यामध्ये मसाले, तूप, दुग्धजन्य पदार्थ, मांसजन्य पदार्थ, चहा, फळे, बेकरी उत्पादने, आले-लसूण पेस्ट यांसह विविध खाद्यपदार्थांचा समावेश आहे. तपासादरम्यान खाद्यपदार्थांमध्ये कपडे रंगवण्याचे रंग, कृत्रिम रंग, हानिकारक रसायने, पाम तेल,वनस्पती,पिष्ट (स्टार्च) तसेच इतर अपायकारक पदार्थांचा वापर करून भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले.

हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) चे वैशिष्ट्य म्हणजे केवळ एखाद्या दुकानावर छापा टाकून कारवाई करण्याऐवजी भेसळीचा स्त्रोत आणि संपूर्ण पुरवठा साखळी शोधण्यावर भर दिला जात आहे. तक्रारी, गुप्त माहिती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील माहितीच्या आधारे संशयित व्यवसायांची ओळख केली जाते. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी आणि ग्रेटर हैदराबाद महानगरपालिका (जीएचएमसी) अधिका-यांच्या सहकार्याने संयुक्त कारवाई केली जाते. नमुने संकलित करणे, पुरावे गोळा करणे, भेसळीचे मूळ ठिकाण शोधणे, पुरवठा साखळीचा मागोवा घेणे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे अशा पद्धतीने ही मोहीम राबविण्यात येत आहे. अन्न भेसळी विरोधात पोलिस यंत्रणेचा थेट सहभाग घेऊन स्वतंत्र पथकाच्या माध्यमातून काम करण्याचा हा अभिनव प्रयोग असून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचा दृष्टिकोन केवळ अमली पदार्थांचा पुरवठा करणा-यांवर कारवाई करण्यापुरता मर्यादित नाही. अमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठीही विशेष प्रयत्न केले जात आहेत. तेलंगणा सरकारने सरकारी रुग्णालयांमध्ये व्यसनमुक्ती केंद्र सुरु केले आहेत. अमली पदार्थांचे सेवन करणा-या व्यक्तींना या केंद्रांमध्ये उपचार, व्यसनमुक्ती आणि पुनर्वसनासाठी पाठविले जात आहे. हैदराबाद शहरात अलीकडच्या काळात जवळपास २ हजार व्यक्तींची अंमली पदार्थ तपासणी (ड्रग टेस्टिंग) करण्यात आली. त्यापैकी सुमारे ८०० व्यक्ती ड्रग पॉझिटिव्ह आढळल्या. या सर्वांना पुढील व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले. यामध्ये केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किंवा राऊडीशीटर्सच नव्हे, तर गुंडागर्दीत सहभागी व्यक्ती, रस्त्यावरील गुन्हेगारीमध्ये सहभागी असलेले तसेच सुशिक्षित आयटी आणि इतर क्षेत्रात नोकरी करणा-या व्यक्तींचाही समावेश असल्याचे समोर आले.

अमली पदार्थ विरोधातील लढा केवळ तस्कर आणि पुरवठादारांवर कारवाई करण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याची मागणी कमी करण्यावरही भर दिला जात आहे. व्यसनाधीन व्यक्तींना उपचार व पुनर्वसनाच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हैदराबाद शहर पोलिसांकडून पुरवठा आणि मागणी या दोन्ही बाजूंवर एकाच वेळी लक्ष केंद्रित केले जात आहे. अमली पदार्थांचा गैरवापर रोखणे, तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवणे आणि समाजाचे भविष्य सुरक्षित करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव माळवी येथून भारतीय पोलीस सेवेत दाखल झालेल्या वैभव रघुनाथ गायकवाड यांनी तेलंगणातील विविध आव्हानात्मक जबाबदा-या समर्थपणे सांभाळत आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ
७४९८८८५०६१

# वरुड-वडनेरमध्ये १५ बकऱ्या चोरीला

## पंचगव्हाणनंतर पुन्हा बकरी चोरीची घटना ; पशुपालकांमध्ये चिंता

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यात बकरी चोरीच्या घटना सुरूच असल्याने पशुपालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. वरुड-वडनेर येथे काशीराम नागे यांच्या मालकीच्या तब्बल १५ बकऱ्या अज्ञात व्यक्तींनी चोरी केल्याची माहिती समोर आली आहे. एकाचवेळी मोठ्या संख्येने बकऱ्या चोरीला गेल्याने परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



यापूर्वी ५ सप्टेंबर रोजी उंबरखेडा-पंचगव्हाण परिसरातही बकरी चोरीची घटना घडल्याची माहिती आहे. त्यानंतर काही दिवसांतच वरुड-वडनेर येथे १५ बकऱ्या चोरीला गेल्याने तालुक्यातील पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. वरुड-वडनेर येथील घटनेत चोरट्यांनी बकऱ्या नेण्यासाठी वाहनाचा वापर केला आहे का, तसेच या चोरीमागे एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा तपास होणे आवश्यक आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज, संशयास्पद वाहनांची माहिती आणि यापूर्वी घडलेल्या पशुधन चोरीच्या घटनांचा तपास केल्यास चोरट्यांचा माग काढण्यास मदत होऊ शकते.

बकरीपालन हा ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे पशुधन चोरीला जाण्याच्या घटनांमुळे पशुपालकांना आर्थिक फटका बसत आहे. रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवून अशा घटनांना आळा घालावा, अशी मागणी पशुपालकांकडून होत आहे. दरम्यान, पंचगव्हाण आणि वरुड-वडनेर येथील घटनांचा परस्पर संबंध आहे का, यासह चोरीच्या घटनांमागे एकच टोळी कार्यरत आहे का, याचा तपास पोलिसांकडून होणे अपेक्षित आहे. चोरीला गेलेल्या बकऱ्यांचा शोध घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. अधिकृत पंचनामा आणि पोलिस तपासानंतर चोरीला गेलेल्या पशुधनाची नेमकी संख्या तसेच घटनेबाबतचे अन्य तपशील स्पष्ट होणार आहेत.

# बायकोने संशय घेतला अन पतीच निघाला चोर!

## खदान पोलिसांची १२ तासांत कारवाई; गहाण ठेवलेली सोन्याची पोत केली हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

घरातील कपाटातून सोन्याची पोत व रोख रक्कम चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर खदान पोलिसांनी अवघ्या १२ तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. फिर्यादीने पतीवर व्यक्त केलेल्या संशयाची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेत त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने चोरीची कबुली दिल्याचे समोर आले. आरोपीने सोन्याची पोत सराफा व्यावसायिकाकडे गहाण ठेवल्याचेही तपासात उघड झाले. पोलिसांनी ६ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत व ५०० रुपये रोख, असा एकूण ७२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



महात्मा फुलेनगर, खदान परिसरातील सौ. सीमा मनोज राठोड यांनी ४ सप्टेंबर रोजी खदान पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली. त्यांच्या घरातील कपाटातून २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेच्या दरम्यान ६ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, अंदाजे ७२ हजार रुपये किमतीची, तसेच ५०० रुपये रोख चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. तक्रारीवरून खदान पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. चोरीचा मुद्देमाल आणि आरोपीचा शोध घेत असताना फिर्यादीने आपल्या पतीवरच संशय व्यक्त केला. पोलिसांनी त्यानंतर मनोज नंदकिशोर राठोड (४५) याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरी केलेली सोन्याची पोत सराफा व्यावसायिकाकडे गहाण ठेवल्याची माहिती त्याने दिल्यानंतर पोलिसांनी संबंधित सराफा व्यावसायिकाकडून सोन्याची पोत ताब्यात घेतली. तसेच आरोपीकडील ५०० रुपये रोख रक्कमही जप्त करण्यात आली.

अशाप्रकारे ७२ हजार ५०० रुपयांचा संपूर्ण मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करून चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. तक्रार दाखल झाल्यानंतर अवघ्या १२ तासांत पोलिसांनी केलेल्या या कारवाईची परिसरात चर्चा आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज केदारे, पोहेकॉ निलेश खंडारे, भूषण मोरे, अभिमन्यू सदांशिव, पोलीस कॉन्स्टेबल वैभव कस्तुरे, मंगेश खेडकर आणि शिवम दुबे यांनी केली.

# गणेश मंडळांसाठी मनपात 'एक खिडकी' योजना सुरू



**मंडप, वीज, ध्वनिक्षेपकासह विविध परवानग्या एकाच ठिकाणी**

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन**

■ प्रतिनिधी | अकोला ■

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना गणेशोत्सवासाठी आवश्यक असलेल्या विविध परवानग्या मिळविण्यासाठी आता वेगवेगळ्या कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही. अकोला महानगरपालिकेने गणेश मंडळांसाठी 'एक खिडकी योजना' सुरू केली आहे. शुक्रवार, ४ सप्टेंबरपासून मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृहात कार्यालयीन वेळेत ही सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गणेश मंडळांकडून सार्वजनिक ठिकाणी मंडप उभारून विविध देखावे साकारले जातात. त्यासाठी मंडप परवानगी, विद्युत जोडणीसाठी महावितरणची परवानगी, ध्वनिक्षेपकासाठी पोलिस विभागाची परवानगी, रस्त्यालगत मंडप उभारण्यासाठी शहर वाहतूक विभागाची परवानगी, तसेच मनपाच्या नगररचना, अग्निशमन व बांधकाम विभागाच्या परवानग्या घेणे आवश्यक असते.

या सर्व परवानग्या मिळविताना मंडळांची होणारी धावपळ कमी करण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. पोलीस प्रशासन, महावितरण आणि महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या परवानगीचा मात्र या योजनेत समावेश करण्यात आलेला नाही. दरम्यान, शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आवश्यक त्या परवानग्या घेऊनच गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर व स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी केले आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक सार्वजनिक गणेश मंडळाने किमान पाच वृक्षांचे रोपण करून त्यांचे संगोपन करावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक उत्साहासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यास हातभार लागणार आहे.

# औद्योगिक ग्राहकांना अखंडित सेवा देण्याच्या दृष्टीने नियोजन करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्याच्या विकासात औद्योगिक ग्राहक महत्त्वाची भूमिका बजावत असून त्यांना दर्जेदार व अखंडित वीज सेवा देण्यासाठी महावितरण पूर्णपणे बांधिल आहे. जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांच्या समस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आणि भविष्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिली. अकोला इंडस्ट्रियल असोसिएशन भवन येथे काल (दि.५ सप्टेंबर) आयोजित औद्योगिक ग्राहकांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महावितरणचे प्रभारी प्रादेशिक संचालक राजेश नाईक, मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे (अकोला), दिलीप दोडके (अमरावती), अकोला इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, महावितरणचे माजी स्वतंत्र संचालक आशिष चंदाराणा, नितीन बियानी, उमेश मालू यांच्यासह इतर उद्योजक उपस्थित होते. यावेळी महावितरण आणि उद्योजकांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील वीज पायाभूत सुविधा, दर्जेदार वीजपुरवठा, फीडर व उपकेंद्रांची क्षमता, व्होल्टेजची गुणवत्ता, नवीन उद्योगांना वीज जोडणी आणि भविष्यातील वाढत्या मागणीवर सविस्तर चर्चा करतांना औद्योगिक वसाहतीला गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या दृष्टीने ३३ केव्हीच्या नवीन उपकेंद्रासाठी औद्योगिक ग्राहकांनी उपलब्ध करून दिलेली जागा तत्काळ ताब्यात घेऊन प्रस्ताव तयार करून मुख्य कार्यालयाला पाठवा.

# महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करा

**नगरसेवक आकाश कवडे यांची मागणी; माहिती लपवल्याचा आरोप, स्मार्ट मीटर व अघोषित लोडशेडिंगवरही आक्षेप**



■ प्रतिनिधी | अकोला ■

महावितरणच्या अकोला शहर विभागाचे कार्यकारी अभियंता हेमंत पावडे यांच्या कार्यकाळातील कारभाराची स्थानिक अधिकाऱ्यांऐवजी महावितरणच्या मुंबई मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक आकाश कवडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. माहितीच्या अधिकारातून मागविलेली देखभाल-दुरुस्तीच्या कामांची माहिती अर्धवट देऊन काही बाबी लपविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

कवडे यांनी १ जून रोजी माहितीच्या अधिकारांतर्गत अकोला शहर विभागातील एचटी, एलटी तसेच डीटीसी मेंटेनन्सच्या कामांबाबत माहिती मागितली होती. मात्र, मागितलेली माहिती पूर्णपणे उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा दावा त्यांनी केला असून, याविरोधात प्रथम अपील दाखल केले आहे. देखभाल-दुरुस्तीच्या कामांमध्ये आर्थिक अनियमितता झाली आहे का, याची वरिष्ठ पातळीवरून तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

कार्यकारी अभियंता पावडे रुजू झाल्यापासून शहरातील वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या वाढल्याचा आरोप कवडे यांनी केला आहे. ठराविक कंत्राटदारांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी नियम डावलून कामे दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. महावितरणच्या शहर विभागात अधिकाऱ्यांपेक्षा कंत्राटदारांचेच वर्चस्व असल्याचे चित्र निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला असून, यामुळे नागरिकांसह एमआयडीसीतील उद्योजकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

### स्मार्ट मीटरला विरोध

अकोला जिल्ह्यात सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेलाही कवडे यांनी विरोध दर्शविला आहे. स्मार्ट मीटर तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याचा दावा करीत, त्याच्या माध्यमातून नागरिकांना वाढीव वीजबिलांचा भार सहन करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. नागरिकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर लादू नयेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### जुन्या शहरातील वीजपुरवठ्यावर नाराजी

प्रभाग क्रमांक ८ सह जुन्या शहरातील विविध भागांत मेंटेनन्सच्या नावाखाली वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा आरोपही कवडे यांनी केला आहे. देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली अघोषित लोडशेडिंग सुरू असल्याचा दावा करीत, हा प्रकार तातडीने थांबविण्याची मागणी त्यांनी केली. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

### मुंबई मुख्यालयाकडून चौकशीची मागणी

अकोला शहर विभागातील ब्रेकडाऊन व मेंटेनन्सच्या कामांची चौकशी स्थानिक अधिकाऱ्यांकडे न देता महावितरणच्या मुंबई येथील मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करावी, प्रलंबित वीज जोडणीचे अर्ज तत्काळ निकाली काढावेत आणि अकोला शहर विभागासाठी मुख्यालयात नियमित उपस्थित राहणारा कार्यकारी अभियंता नियुक्त करावा, अशी मागणीही कवडे यांनी केली आहे.

# 'हनुमान अंश'ने सिनेमागृहाला दिले मंदिराचे स्वरूप; रामभक्तांना प्रसादाचे वाटप



**अकोला :** शहरातील वसंत टॉकीजमध्ये 'हनुमान अंश' चित्रपटाच्या विनामूल्य शोचे आयोजन करण्यात आल्याने सिनेमागृहाला जणू मंदिराचेच स्वरूप प्राप्त झाले होते. चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या रामभक्तांच्या उपस्थितीत 'जय श्रीराम'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.

राजेश दिनोदिया आणि सुंदरकांड मंडळाच्या वतीने रामभक्तांसाठी या विनामूल्य शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांना पोहे, पाणी तसेच सुंदरकांडच्या प्रती प्रसाद म्हणून मोफत वितरित करण्यात आल्या. या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

चित्रपटाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच संस्कार, मर्यादा, भक्ती आणि सत्कर्मांचा संदेश कुटुंबांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

**सुंदरकांडच्या प्रतीही दिल्या ; आणखी एक शो विनामूल्य दाखविण्याचे आश्वासन**

विशेषतः लहान मुले आणि कुटुंबीयांना सकारात्मक व संस्कारक्षम आशय मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

विनामूल्य चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सिनेमागृह परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. 'हनुमान अंश'च्या माध्यमातून भगवान श्री हनुमान यांच्या भक्ती, आदर्श आणि संस्कारांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, नागरिकांच्या प्रतिसादाचा विचार करून आणखी एक शो विनामूल्य आयोजित करण्याचे आश्वासन आयोजकांनी दिले.


## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७/२०२६ प्रोसेस नं.११७२/२०२६
चौ.ता. ०९/१०/२०२६ दिनांक : ३१/०८/२०२६

**अर्जदार :** १. सुधाकर मोतीराम राऊत, वय -६४ वर्ष, धंदा शेती रा. गंवडाळा, ता. खामगाव, जि. बुलढाणा ह.मु. मळसुर, ता. पातूर, जि. अकोला २. दिलीप मोतीराम राऊत, वय ६२ वर्ष, धंदा - शेती, ३. गजानन मोतीराम राऊत, वय - ६८ वर्ष, धंदा - शेती, ४. किशोर मोतीराम राऊत, वय - ६० वर्ष, धंदा - शेती, ५. कौसल्याबाई मोतीराम राऊत, वय- ८७ वर्ष, धंदा - शेती, अनुक्रमांक २ ते ५ रा. मौजा मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : मोतीराम नामदेव राऊत,
**पत्ता :-** रा. मौजा मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोतीराम नामदेव राऊत यांचा मृत्यु दि. २०/०८/२०२१ रोजी मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला येथे झाला. मयताची आई ही सुध्दा मयत आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- ३१/०८/२०२६
पातुर
शिक्का
आदेशानुसार
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# गुणवंत शिक्षकांचा मनपातर्फे गुणगौरव

## शिक्षक दिनानिमित्त अकोला मनपा शिक्षण विभागाचा उपक्रम; कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त अकोला महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षक दिन व गुणवंत शिक्षक गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. प्रमिलाताई ओक सभागृहात आयोजित या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय, गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या कार्यरत तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



मनपा आयुक्त डॉ. सुनीलजी लहाने व अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे यांच्या आदेशाने, तसेच महापौर सौ. शारदाताई खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमास उपमहापौर अमोलभाऊ गोंगे, सभागृह नेते पवन महल्ले, महिला व बालकल्याण सभापती सौ. आरतीताई घोगलिया, झोन सभापती सौ. रश्मीताई अवचार, माजी नगरसेवक प्रकाशजी घोगलिया व उपआयुक्त विजय पारतवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राम शेगोकार अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाची सुरुवात सौ. अनुभा मस्के यांच्या स्वागतगीताने झाली. पीएम श्री शाळा क्रमांक ७च्या विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छांचा वर्षाव करून मान्यवरांचे स्वागत केले. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यरत शिक्षकांमध्ये मराठी माध्यमातील प्रभारी मुख्याध्यापक राजू भिरड, सौ. अनिता नवलकर, सौ. अपर्णा ढोरे, सौ. संगीता ताथोड, हिंदी माध्यमातील विजय पवार तसेच उर्दू माध्यमातील मुख्याध्यापक मो. अब्दुल अजीज, मुख्याध्यापक जहूर अहमद, सौ. अतुफा बाजी, सौ. सादिया समन, सौ. नाजिया फरहत व सौ. नाजनीन यांचा सन्मान करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षकांमध्ये पद्माकर फुलंबरकर, सौ. कमल खंडारे, मुजाहेर सर आणि मोहन पांडे यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांनी गुणवंत शिक्षकांच्या निवडीचे निकष आणि त्यांच्या कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, शाळेच्या प्रगतीसाठी पुढाकार घेणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुणवंत शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन इतर शिक्षकांनीही अधिक चांगले कार्य करावे. ज्यांच्या कार्याची अद्याप अपेक्षित दखल घेतली गेलेली नाही, त्यांनी निराश न होता आपले कार्य सुरू ठेवावे. चांगल्या कार्याची निश्चितच दखल घेतली जाईल, असे आवाहन इटकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नयना गोटे व सौ. उजेफा कुलसुम यांनी केले. गजेंद्र ढवळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अन्वर हुसेन, हबीबुर रेहमान, राजू अवधूत, साकिब सर, युवराज पठाडे, संजय खराटे, अशोक चव्हाण व हेमंत उपरीकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मनपा शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# वाघाचा बकऱ्यांच्या कळपावर हल्ला

## मेंढपाळाच्या प्रसंगावधानामुळे वाचले प्राण

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यातील सोनोरी येथील काट वनात रविवारी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास वाघाने बकऱ्यांच्या कळपावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात एक बकरी ठार झाली असून दोन बकऱ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. मेंढपाळाने दाखवलेल्या कमालीच्या धाडसामुळे आणि प्रसंगावधानामुळे त्यांचे प्राण सुदैवाने वाचले आहेत.





मिळालेल्या माहितीनुसार, सोनोरी येथील रहिवासी सोमा पराते हे रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे आपल्या बकऱ्या चरण्यासाठी काट वनात घेऊन गेले होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास अचानक त्यांच्यासमोर वाघ आला. वाघ आपल्यावर हल्ला करण्याच्या तयारीत असल्याचे लक्षात येताच सोमा पराते यांनी क्षणाचाही विलंब न करता हातातील कुऱ्हाडीचा उलटा वार वाघाच्या डोक्यावर केला. या अनपेक्षित प्रहारामुळे वाघ १५ ते २० सेकंदांसाठी मूर्च्छित पडला. याचा फायदा घेत पराते यांनी तातडीने गावाच्या दिशेने पळ काढला.

दरम्यान, काट वनात राहिलेल्या बकऱ्यांवर शुद्धीवर आलेल्या वाघाने हल्ला केला. यात सोमा पराते यांची एक बकरी जागीच ठार झाली, तर दोन बकऱ्या जखमी झाल्या. घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच गावकऱ्यांनी काट वनाकडे धाव घेतली आणि ब्राम्हणवाडा थडी पोलीस व वनविभागाला याबाबत कळवले. माहिती मिळताच पोलीस आणि वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाने वाघाच्या पाऊलखुणांचा मागोवा घेण्यासाठी गावकऱ्यांना काट वनात न जाण्याचे आवाहन केले आहे. तसेच सोनोरी, सुलतानपूर, गणोजा, ब्राम्हणवाडा पाठक, बोरज, नानोरी आणि सुरळी या परिसरातील नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला असून, शेतकऱ्यांना शेतात एकटे न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# बी.डी.एस. हायस्कूल येथे शिक्षक दिन व गोकुळाष्टमी कार्यक्रम

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे ५ सप्टेंबर रोजी गोकुळाष्टमी व शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे पर्यवेक्षक नितीन धोपटे तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका एस.बी.देशमुख, एस.डी.फुके, पवन देशमुख तसेच कार्यक्रम संयोजक योगेश कोठाळे, एम.जी.गोळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख तसेच डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णा यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पन करण्यात आले.



यानंतर विद्यार्थ्यांनी गोकुळाष्टमी व शिक्षक दिनावर छान भाषणे व नृत्य सादर केली. यावेळी शाळेचा संपूर्ण परिसर श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.यावेळी विशेष दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. शेवटी वर्ग ९ अ च्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्यात यश मिळवले. यावेळी सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाकरिता शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# चव्हाण कुटुंबाची गोकुळाष्टमीची अखंड परंपरा कायम

## श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त भावपूर्ण सोहळा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** भगवान श्रीकृष्णावरील असीम श्रद्धा, ज्येष्ठांनी दिलेले संस्कार आणि कुटुंबातील एकोपा यांची सांगड घालत चव्हाण कुटुंबीयांनी तब्बल ६२ वर्षांपासून जपलेली गोकुळाष्टमीची अखंड परंपरा यंदाही भक्तिभावाने कायम ठेवली. चांदूर रेल्वे येथील महारुद्र नगरचे रहिवासी प्रकाश चव्हाण हे आपल्या संपूर्ण कुटुंबीयांसह अमरावतीमधील चव्हाण प्लॉट, रिमांड होम लाईन, गाडगे नगर येथे हा धार्मिक सोहळा दरवर्षी आयोजित करतात. यंदाच्या सोहळ्याला आमदार सुलभा खोडके यांनी चव्हाण कुटुंबीयांच्या निवासस्थानी भेट देत उपस्थिती लावली.

श्रीकृष्णभक्त स्व. चंद्रभानजी सू. चव्हाण यांच्या प्रेरणेतून तब्बल ६२ वर्षांपूर्वी गोकुळाष्टमी उत्सवाची ही परंपरा सुरू झाली. श्रीकृष्णावरील श्रद्धा आणि पूर्वजांनी जपलेले संस्कार यामुळे ही भक्तीची परंपरा आजही तितक्याच उत्साहाने पुढे सुरू आहे. यंदा शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर शनिवार, ५ सप्टेंबर रोजी श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले. तसेच श्री गुरुदेव सेवा भजन मंडळी, गोपाळपूर यांच्या वतीने दुपारी काल्याचे भजन सादर करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमानंतर सायंकाळी ७ वाजता भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम



न राहता कुटुंबाची श्रद्धा, संस्कार, एकोपा आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परंपरेचा जिवंत वारसा ठरला आहे.

शांताबाई चंद्रभानजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश चव्हाण, अशोक चव्हाण, केशव चव्हाण, राजेंद्र चव्हाण, मेघनाथ चव्हाण तसेच वंदना चव्हाण, माधुरी चव्हाण, कविता चव्हाण, रत्ना चव्हाण आणि रोशनी चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कुटुंबातील पुढील पिढीतील निशांत, यशवर्धन, अभिजीत, हिमांशू, वंश आणि अथर्व यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत ही परंपरा पुढे नेण्याचा संकल्प जपला. पूर्वजांनी लावलेली श्रीकृष्ण भक्तीची ज्योत पुढील पिढ्यांच्या मनातही तेवत ठेवण्याचे काम चव्हाण कुटुंबीय करत आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात ६२ वर्षांची ही अखंड परंपरा श्रद्धा, संस्कार आणि कौटुंबिक एकोप्याचा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

गोकुळाष्टमीच्या या पारंपरिक सोहळ्याच्या निमित्ताने आमदार सुलभा खोडके यांनी चव्हाण कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी ६२ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या धार्मिक परंपरेची माहिती जाणून घेत कुटुंबीयांचे कौतुक केले. आमदार खोडके यांच्या उपस्थितीमुळे चव्हाण कुटुंबीयांच्या या भावनिक आणि भक्तिमय सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# तळेगाव येथे आशा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**तळेगाव :** SkeesefveLe CSR – ममता H.I.M.C. यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या उन्नती प्रकल्पाच्या वतीने तळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आशा कार्यकर्त्या, ए.एन.एम., एम.पी.डब्ल्यू. व आशा ग्रुप फॅसिलिटेटर यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणाला सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षणामध्ये ममता H.I.M.C. मुख्य कार्यालयाच्या प्रशिक्षक डॉ. नेहा मॅडम यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान ANC/PNC (गर्भावस्था व प्रसूतीनंतरची काळजी), उच्च जोखमीच्या माता, स्तनपान, कांगारू मदर केअर (KMC), BCG लसीकरण, गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग तसेच HPV लसीकरण या महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली.





स्तनपानाचे महत्त्व व योग्य स्तनपान पद्धती समजावून सांगण्यासाठी प्रात्यक्षिक (डेमो) घेण्यात आले. तसेच महिलांमध्ये स्तनाच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी स्तनाच्या स्व-परीक्षणाची सहा टप्प्यांची पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. विविध आरोग्य समस्यांची लवकर ओळख, प्रतिबंध आणि वेळेवर आरोग्य सेवा घेण्याचे महत्त्व याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण अधिक प्रभावी व सहभागी पद्धतीने घेण्यासाठी साप-शिडी बोर्ड आधारित उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून संतुलित आहार, पोषण तसेच पोषणाचे आरोग्यावरील फायदे सोप्या व मनोरंजक पद्धतीने समजावून सांगण्यात आले. प्रशिक्षणामध्ये एकूण ३१ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. यामध्ये २२ आशा कार्यकर्त्या, ६ ए.एन.एम., १ आशा सुपरवायझर आणि २ एम.पी.डब्ल्यू. यांचा समावेश होता. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. दाते मॅडम यांचीही प्रशिक्षणास उपस्थिती होती. कार्यक्रमास एवोनिथ CSR टीमच्या समीक्षा तसेच ममता H.I.M.C. उन्नती प्रकल्पाच्या पिंकी, संगीता आणि आकाश यांची उपस्थिती लाभली. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आशा कार्यकर्त्या, ए.एन.एम. व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना माता व महिला आरोग्याशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांवर ज्ञान तसेच व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. सहभागी उपक्रमांमुळे आरोग्यविषयक माहिती अधिक प्रभावीपणे समजून घेण्यास मदत झाली. समुदाय स्तरावर मातृ व महिला आरोग्याबाबत जनजागृती वाढविणे तसेच योग्य आरोग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण व उपयुक्त ठरले.

# खगोलशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धेत घुईखेड येथील टावरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची भरारी

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभाग आणि स्टारगेझर क्लब, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अंतराळ सप्ताह २०२६ निमित्त आयोजित ऑनलाईन खगोलशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धेत श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अंतराळ, ग्रह-तारे, खगोलशास्त्र, अवकाश संशोधन तसेच विज्ञानविषयक विविध प्रश्नांना आत्मविश्वासाने सामोरे जात उत्कृष्ट कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्पर्धेत त्रिशा मनोज ढोके (इयत्ता सातवी) हिने प्रथम क्रमांक पटकावून विशेष यश संपादन केले. तसेच अश्का अनिस शेख (इयत्ता सातवी) हिने तृतीय क्रमांक, मिताली संदीप गावंडे (इयत्ता सातवी) हिने चौथा क्रमांक आणि श्रद्धा प्रदीप लडके (इयत्ता पाचवी) हिनेही चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन, नियमित अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व अवकाश संशोधनाविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांची निरीक्षणशक्ती व तार्किक विचारशक्ती विकसित व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रम राबविले जातात.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक प्रकाश मिरासे तथा शिक्षकवृंद, श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड यांच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. भविष्यातही विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी भरारी घ्यावी, अशा शुभेच्छा संस्थापक कृष्णकुमार टावरी यांच्या मार्फत देण्यात आल्या.

Sipna Shikshan Prasarak Mandal's
**Sipna College of Engineering & Technology, Amravati (ESTD-1999)**
An Autonomous Institute
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)
Accredited by NAAC with A+ Accredited by NBA Accredited by IAO

**Admission Notice For MBA/MMS for Academic Year 2026-27**
**Institute Level Seats / Probable Vacancy After CAP Round**

Applications are invited from aspiring candidates in online mode, fulfilling the eligibility criteria as notified by the Government and specified by the appropriate authority, from time to time for the admissions at the institute level seats/Probable Vacancy After CAP seats as per the seat matrix given in the Table No. 01

**Table No. 01: Seat Matrix***

| Sr. No. | Programme | Institute Level Seats |
|---|---|---|
| 1 | MBA | 07 |

Seat matrix for Probable Vacancy After CAP will be displayed on Institute website www.sipnaengg.ac.in after the complete conduction of CAP Round IV by CET CELL.

The candidates are strictly instructed to follow the schedule given in table 2.

**Table 2:Activity and schedule**

| Sr. No. | Activity | Proposed Dates |
|---|---|---|
| 1 | Release of advertisement on Institute website & on Institute Notice Board | 07-09-2026 |
| 2 | Online submission of application form by eligible candidates on the website www.sipnaengg.ac.in | 07-09-2026 to 08-09-2026 till 03.00 PM |
| 3 | Display of Provisional Merit List for Institute Level Seats & Probable Vacancy After CAP Round | 09-09-2026 at 11.00 AM |
| 4 | Submission of grievances if any: Candidate shall raise the Grievance about correction required in the data displayed in provisional merit list | 09-09-2026 up to 03.00 PM |
| 5 | Display of Final Merit List for Institute Level Seats & Probable Vacancy After CAP Round | 09-09-2026 at 05.00 PM |
| 6 | Display of information brochure, admission process, schedule of reporting of admission and seat matrix on institute website & on Institute Notice Board | 09-09-2026 at 6.00 PM |

1) Kindly refer to the cap schedule declared by the competent authority from time to time.
2) All eligible and aspiring candidates for the admissions should refer the institute website www.sipnaengg.ac.in & Institute Notice Board, for application, detail rule and regulations as per Rule no.13 of information brochure of Government of Maharashtra State Common Entrance Test Cell Academic Year 2026-27 and detail schedule of admission.
3) Those candidates who have applied on CET Cell website through their login, they may not need to apply separately.

Sd/-
**Principal**
Sipna College of Engineering & Technology, Amravati

# राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनात प्रा.राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचा अभिमानास्पद ठसा

**अमरावती/प्रतिनिधीः-** दि. २१ व २२ ऑगस्ट २०२६ रोजी द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनात विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी संचालित प्रा. राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन बडनेरा (स्वायत्त संस्था) येथील विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी असोसिएट सदस्य म्हणून उल्लेखनीय सहभाग नोंदवत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली.




या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी आयोजन समितीचे सदस्य म्हणून सक्रियपणे कार्य केले. विद्यार्थ्यांचा उत्साह, समर्पण, शिस्त, सांघिक भावना आणि कार्याप्रती असलेली बांधिलकी यामुळे या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शक्य झाले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची आय इ आय कौन्सिलच्या चेअरमन यांनी विशेष दखल घेत प्रशंसा केली, तसेच अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी दिलेल्या मौल्यवान योगदानाबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये महाविद्यालयाला तीन प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले. विद्यार्थ्यांनी अधिवेशनात तीन वेगवेगळे पुरस्कार जिंकून संस्थेचा गौरव वाढवला आहे: १. 'सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण संकल्पना' (पेपर) पुरस्कार – 'स्मार्ट इलेक्ट्रिक वाहन बॅटरीच्या आरोग्याची स्थिती तपासणाऱ्या प्रणालीची रचना आणि विकास' २. 'सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण संकल्पना आणि पेपर सादरीकरण' पुरस्कार – 'सौर पॅनेलची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ते फिरवणाऱ्या एका बिगर-विद्युत उपकरणाचा विकास' ३. 'सामाजिक विषयावरील नाविन्यपूर्ण उपक्रम' (पेपर/पोस्टर) पुरस्कार हे पुरस्कार विशेष महत्त्वाचे आहेत कारण प्रत्येक श्रेणीतून केवळ एकाच पुरस्काराची निवड करण्यात आली होती; त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील या परिषदेत मिळालेली ही कामगिरी एक उल्लेखनीय ओळख ठरली आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आपला नाविन्यपूर्ण प्रकल्प इंजि. केयूर ठक्कर, चेअरमन, द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), वडोदरा, गुजरात यांच्यासमोर सादर करण्याची विशेष संधी मिळाली. १०० कोटींपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या कंपनीचे मालक असलेल्या इंजि. ठक्कर यांनी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी त्यांनी उत्सुकता दर्शविली असून, प्रकल्पाच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. तसेच या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यासही त्यांनी स्वारस्य दर्शविले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणासाठी अशा कार्यक्रमा मध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा व असे कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फार उपयुक्त असल्याचे सांगून विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अमित मोहोड यांनी विद्यार्थ्यांनी अशा शैक्षणिक उपक्रमांमधून मिळणाऱ्या व्यावहारिक ज्ञानाचा प्रभावी उपयोग करून आपल्या तांत्रिक कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी प्राचार्य डॉ. अजय ठाकरे आणि विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा. अमित मोहोड यांनी मौल्यवान सहकार्य आणि मार्गदर्शन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंगजी चौधरी, सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे यांनी कौतुक केले.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सुचना

या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांना सुचित वजा कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली **मनोज रामदास हरणे,** रा.वार्ड नं.२, इब्राहीमपूर, फुलमाळा, अमरावती, **ममता निलेश कडू,** रा.रोहन खेडा, देवरा, अमरावती, **उज्वला किशोर बहाळे,** रा.कवठा, अमरावती, **वनिता प्रविण देशमुख,** रा.शिवजी खुर्द, ता.भातकुली, जि.अमरावती, **प्रमिला रामदास हरणे,** रा.वार्ड नं.२ इब्राहीमपूर फुलमाळा, अमरावती यांच्या संयुक्त मालकीची व ताब्यातील मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. सदर मालमत्तेचे वणन खालीलपमाणे--

**मालमत्तेचे वर्णन -** मौजे - इब्राहीमपूर, ता.भातकुली, जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. व भूमापन नं.३२, एकुण क्षेत्रफळ ०.७३ हे.आर. आकार रु.३.८५ रु.पैसे

**चतुःसिमा-**

पुर्वेस - विनाय हरणे यांचे शेत
पश्चिमेस - रस्ता
उत्तरेस - श्रीधर हरणे यांचे शेत
दक्षिणेस - शुभम नाना अंबाडेकर यांचे शेत

ही शेतजमीन विकत घेण्याचा सौदा झालेला आहे.

तरी आम जनतेस सुचित करण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी खरेदी-विकीचा सौदा झाला असून सदर शेतजमिनी संबंधी इतर कोणासही कोणताही आक्षेप, हरकत असल्यास किंवा हितसंबंध, बोझा, कर्ज, इतर अधिकार असल्यास त्यांनी ०८ दिवसांचे आत सदर नोटीसमधील पत्त्यावर रितसर लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर सदर मालमत्तेसंबंधी कोणासही कोणत्याही प्रकारचा उजर राहणार नाही व सदर मालमत्तेची खरेदीखत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील. कृपया सर्वांनी दक्षता व नोंद घ्यावी.

करीता याची नोंद घ्यावी.

दि.०६.०९.२०२६
अमरावती

**ॲड.कार्तिक आर.गजभिये**
**पत्ता- आशियाना पोलीस क्लब जवळ,**
**वडाळी रोड, अमरावती**
**मो.९५९५६६१११३**

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेद्वारे सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.नंदलाल नारायणदासजी बंग**, रा.फ्लॅट क्र.२०६, हिंदुस्थान हॉटेल, सतीधाम कॉम्प्लेक्स, चित्रा टॉकीजच्या मागे, अमरावती, ता.जि.अमरावती हे खालील वर्णनांकित स्थावर मालमत्ताचे (राहते घर) एकमेव मालक व कब्जेदार असून त्या मालमत्ताचे वर्णन येणेप्रमाणे--

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** अमरावती महानगरपालिकेचे हद्दीतील व सहदुय्यम निबंधक, अमरावती यांचे कक्षेतील मौजा-अमरावती, पेठ, मौजा-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शिट क्र.६८-सी, प्लॉट क्र.८९ त्यावर बांधलेले एक मजली जुने मकान ज्याची उत्तर-दक्षिण लांबी ४० फुट, पुर्व-पश्चिम लांबी ३० फुट असे एकुण १२०० चौ.फुट असून ज्याचा मनपा मालमत्ता क्र.२६५ व जुना वार्ड क्र.४३ असून या घराचा संपूर्ण पहिला मजला व या मजल्यावर असलेले संपूर्ण तदंगभूत वस्तू, दरवाजे, खिडक्या, गच्ची, नळ, पायऱ्या व इजमेंटे सर्व हक्क व अधिकारासह असून त्याची चतुःसिमा येणेप्रमाणे--

पुर्वेस - वासुदेव लक्ष्मणराव भोकरे यांचे मकान, पश्चिमेस - सरकारी रस्ता
उत्तरेस - कॉटन मार्केट रोड, दक्षिणेस - सर्व्हिस लाईन

माझे पक्षाकर यांनी वरील वर्णनांकित स्थावर मालमत्ता (पहिल्या माळ्यावरील घर) श्री.ब्रिजमोहन रामप्रताप राठी यांचेपासून दिनांक १२.०१.१९८६ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र.७५२/१९८७ नुसार (१२०० चौ.फुट) विकत घेतले होते. सन १९८६ पासून वरील वर्णनांकित स्थावर मिळकतीचा पहिला माळा हा माझे पक्षकार यांचे मालकी व ताब्यात असून माझे पक्षकार हे सदर्हु मिळकतीमध्ये राहत आहेत. तसेच सदरहू स्थावर मिळकतीचे मालमत्ता पत्रक मध्ये माझे पक्षकार यांचे नावाची नोंद मालक म्हणून सन १९८६ पासून आहे.

तसेच माझे पक्षकार हे वरील वर्णनांकित स्थावर मिळकतीचे एकमेव मालक असून सदरहू मिळकतीचा पहिला मजला पूर्णपणे माझे पक्षकार यांचा असून यामध्ये माझे पक्षकार जवळपास ४० वर्षापासून राहत असून त्यांचे मालकी व ताब्यात आहे. परंतु काही लोक माझे पक्षकार यांची वरील वर्णनांकित स्थावर मिळकतीमध्ये हक्क असल्याबाबत दुष्प्रचार करुन माझे वयोवृध्द पक्षकार यांना जाणून बुजून त्रास देवून माझे पक्षकाराची वरील वर्णनांकित स्थावर मिळकतीमधील पहिला माळा हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

करीता माझे पक्षकार हे या जाहीर सुचनेद्वारे सर्व आम जनतेस सुचित करतात की, वरील वर्णनांकित स्थावर मिळकतीमधील पहिला माळा हा माझे पक्षकार यांचे एकमेव मालकी व ताब्यात असून माझे पक्षकार यामध्ये त्यांचे कुटूंबासह राहत आहेत. तसेच सदरहू मिळकत विकण्याचा किंवा त्याची विल्हेवाट लावण्याचा माझे पक्षकार यांना संपूर्ण अधिकार आहे. करीता सदरहू जाहीर नोटीस माझे पक्षकार हे प्रसिध्द करीत आहे.

दि.०७.०९.२०२६
अमरावती

**ॲड.दीपक एस.चौधरी (जैन)**
**रा.सत्यनारायण मंदिराजवळ, रंगारी गल्ली, ता.जि.अमरावती**
**मो.९७६६४९१४४८**

# शहरासह लगत ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले १०० च्यावर तक्रारींवर निवेदन

**वर्धा/जनमाध्यम**

वाढत्या लोकसंख्येमुळे शहरालगत असलेल्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात ले-आऊटच्या माध्यमातून विस्तार होत आहे. पुर्वी या ले-आऊटधारकांनी आवश्यक सुविधा निर्माण करुन दिल्या नाही. त्यामुळे परिसरात रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा, वीज अशा आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. यासाठी नागरी सुविधा, जिल्हा नियोजन समितीच्या निधी सोबतच म्हाडाच्या निधीमधून आवश्यक सुविधा निर्माण करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.



म्हसाळा येथे पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला तहसिलदार संदीप पुंडेकर, गट विकास अधिकारी समर्थ शेवाळे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, म्हसाळाचे माजी उपसरपंच संदेश किटे, संजय गांधी योजना समितीचे अध्यक्ष आशिष कुचेवार, दिलीप चव्हाण, राजु धमाने, बंटी गोसावी, नितीन डफळे, पृथ्वीराज शिंदे आदी उपस्थित होते.

म्हसाळा येथे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देऊन विकासाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली आहे. या परिसरातील रस्ता, नाली बांधकामासाठी १ कोटी ७२ लाख ५० लक्ष रुपयाची निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण करण्यात आली. म्हसाळा टी पॉईट ते सेवाग्राम रस्त्याच्या ५० लक्ष रुपयाच्या बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले आहे. या रस्त्यामुळे सेवाग्राम रस्त्यावरुन थेट म्हसाळा येथे जाणाऱ्या नागरिकांना चांगली सुविधा निर्माण होणार असल्याचे पुढे बोलतांना डॉ.पंकज भोयर म्हणाले.

जिल्ह्यात महिला स्वयंसहाय्यता बचतगटाची चळवळ मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत असून जिल्ह्यातील ५० हजाराच्यावर महिला लखपती दिदी झालेल्या आहे. येथील नव्याने बांधण्यात आलेल्या महिला बचत भवनाच्या माध्यमातून महिलांनी आपले उत्पन्न वाढविण्यासाठी उपयोग करावा, असे आवाहन यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. यावेळी म्हसाळा येथील ग्रामस्थांकडून रस्ता बांधकाम करणे, नाली बांधकाम करणे, घरकुल मागणी तसेच जमीनीचे पट्टे मिळण्याबाबत १०० निवदेन प्राप्त झाली. या निवेदनावर लवकर कार्यवाही करण्यात येईल, असे ग्रामस्थांना त्यांनी आश्वस्त केले. तत्पूवी म्हसाळा टी पॉईट ते सेवाग्राम रोड येथील रस्त्याच्या बांधकामाचे भूमीपूजन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.

# गांधी जिल्ह्यात दारूचा महापूर, पंचायत समितीच्या मागे गावठी दारूचा गुत्ता

## प्रशासनाच्या नाकावर टिच्चून अवैध विक्रीचा आरोप,

**आर्वी/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात अवैध दारूविक्रीला ऊत आला असून गावोगावी दारूचे अड्डे फोफावत असल्याचा आरोप होत आहे. आर्वी शहरात तर या प्रकाराने कहर केला आहे. पंचायत समिती कार्यालयाच्या अगदी मागे आणि स्मशानभूमी रोडवरील शेत परिसरात गावठी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याची धक्कादायक तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे दिवस-रात्र दारू घेण्यासाठी आणि पिण्यासाठी येथे गर्दी होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

पंचायत समिती कार्यालयाच्या पाठीमागेच हा प्रकार सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्मशानभूमीच्या मागील परिसरात दारू पिणाऱ्यांची वर्दळ वाढल्याने नागरिक, महिला आणि शाळकरी मुलांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत.

**पोलिसांच्या डोळ्यांसमोरच धंदा**

शहरातील मध्यवर्ती भागात अवैध दारूविक्रीचा प्रकार सुरू असल्याची चर्चा असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. वारंवार तक्रारी होऊनही कारवाई होत नसेल तर या अवैध धंद्याला कोणाचे पाठबळ आहे, याची चौकशी होण्याची गरज आहे. गावठी दारू आरोग्यासाठी घातक असून तिच्या सेवनामुळे गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा अड्ड्यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ करण्यासारखे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**कारवाईची मागणी**

कथित गावठी दारूविक्रीची तातडीने चौकशी करून कारवाई करावी. तसेच शहरातील इतर अवैध दारूविक्री केंद्रांवरही धडक मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. दारूबंदीच्या घोषणा कागदावर आणि गावठी दारूचा महापूर रस्त्यावर, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पोलिस प्रशासनाने आता ठोस कारवाई करण्याची गरज आहे.

## संक्षिप्त

### पंपाच्या वादातून बहिणीला मारहाण

**हिंगणघाट-** घरासमोर ठेवलेला फवारणीचा पंप दिसत नसल्याने भावाला विचारणा केल्यावर झालेल्या वादात भावाने बहिणीला काठीने मारहाण केल्याची घटना नगाजी पारडी येथे घडली. या प्रकरणी स्मिता संदीप धुल यांच्या तक्रारीवरून समीर सदाशिव पाटील याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी आणि आरोपी हे बहीण-भाऊ आहेत. आरोपी दारूच्या नशेत फिर्यादी तसेच आई-वडिलांसोबत विनाकारण वाद घालत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घरासमोर फवारणीचा पंप ठेवण्यात आला होता. तो दिसून न आल्याने स्मिता यांनी भावाला पंपाबाबत विचारणा केली. यावरून दोघांमध्ये वाद झाला. स्टीलची गुंजळी जमिनीवर आपटल्याने ती आरोपीच्या पायाला लागली. त्यानंतर आरोपीने बहिणीला काठीने मारहाण केली. यात तिच्या दोन्ही हातांना तसेच उजव्या डोळ्याच्या वरच्या भागाला दुखापत झाली. वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### अल्पवयीनांना तंबाखू विक्रीचा आरोप

**आष्टी-** अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केल्याच्या आरोपावरून आष्टी पोलिसांनी पानठेला चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नवनित भीमराव कोल्हे, रा. बालक राजपुरा, आष्टी असे आरोपीचे नाव आहे. फॉरेस्ट ऑफिससमोरील रस्त्यालगत असलेल्या पानठेल्यावर पोलिसांनी तपासणी केली. यावेळी तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचे आढळल्याने पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला. अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास कायद्याने प्रतिबंध असतानाही विक्री केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

# शिक्षक दिनानिमित जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव सोहळा उत्साहात

## टीईटी परीक्षेसाठी ऑनलाइन मार्गदर्शन वर्ग-सीईओ पराग सोमण

**वर्धा/जनमाध्यम**

शिक्षक दिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील गुणवंत शिक्षक तसेच विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शिक्षक मित्र उपक्रमातून टीईटी परीक्षेसाठी ऑनलाइन मार्गदर्शन वर्ग राबविण्यात येणार असल्याचे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण होते. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांचे अधिकारी तसेच ५०० हून अधिक शिक्षक, विद्यार्थी, पालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील शिक्षकांनी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊन आपली शैक्षणिक व व्यावसायिक गुणवत्ता वाढवावी, या उद्देशाने पराग सोमण यांनी शिक्षक मित्र उपक्रमांतर्गत ऑनलाइन मार्गदर्शन वर्ग सुरु करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा यावेळी केली. या उपक्रमाद्वारे शिक्षकांना टीईटी परीक्षेच्या तयारीसाठी तज्जांचे मार्गदर्शन, अभ्यासाचे नियोजन तसेच आवश्यक शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच त्यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करतांना जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकाने स्वतःची गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

गुणगौरव सोहळ्यात जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधून प्रत्येकी एका गुणवंत शिक्षकाची निवड करून एकूण ८ शिक्षकांचा शाल, श्रीफळ, साडी व मोमेंटो देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षणाधिकारी सीमा पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सूरज गोहाड यांनी आपल्या मनोगतात शिक्षक हे समाज व राष्ट्रनिर्मितीचे प्रमुख आधारस्तंभ असून, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी शिक्षकांनी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी इयता ४ थी, ७ वी तसेच ५ वी, ८ वीच्या ञ्शएए परीक्षेत पात्र ठरलेल्या एकूण १०० विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. याशिवाय जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत निवड झालेल्या ३६ विद्यार्थ्यांचाही प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

शिक्षकांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा हा सोहळा जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवता वृद्धीसाठी प्रेरणादायी ठरला. गुणवंत शिक्षकांचा सन्मान, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि शिक्षकांच्या गुणवत्तावृद्धीसाठी 'शिक्षक मित्र' उपक्रम हा कार्यक्रमाचा विशेष केंद्रबिंदू ठरला. कार्यक्रमाचे संचलन नीता भांडवलकर यांनी केले तर आभार उपशिक्षणाधिकारी रुपेश कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी, शिक्षक तसेच संबंधित सर्वांनी सहकार्य केले.

## बेरोजगारांच्या मैदानावर 'ई-लिलाव'चा डाव

# सर्कस ग्राउंडचा निर्णय रद्द करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**पुलगाव/जनमाध्यम**

गणेशोत्सवात मीना बाजारासाठी वर्षानुवर्षे वापरल्या जाणाऱ्या शहरातील सर्कस ग्राउंडच्या ई-लिलाववरून पुलगावात राजकीय वातावरण तापले आहे. नगरपालिकेने मैदानाच्या वापरासाठी ई-लिलाव प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतल्याने स्थानिक बेरोजगार युवक आणि छोट्या व्यावसायिकांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विधानसभा अध्यक्ष तथा पुलगाव विकास समितीचे अध्यक्ष तुषार वाघ यांनी या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत ई-लिलाव तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

नगरपालिकेच्या विशेष सभेत घेण्यात आलेला निर्णय स्थानिकांच्या हिताला छेद देणारा असल्याचा आरोप वाघ यांनी केला.

शासनाच्या परिपत्रकानुसार सरकारी मैदानासाठी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्राधान्य देण्याचे धोरण असताना ई-लिलावाचा घाट कशासाठी, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

ई-लिलाव झाल्यास मोठ्या बोलीदारांची मक्तेदारी निर्माण होऊन स्थानिक बेरोजगार आणि छोट्या व्यावसायिकांना मैदानापासून दूर केले जाईल, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार स्थानिकांना प्राधान्य देऊन मैदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. ई-लिलावाचा निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक दिलीप मेश्राम, गणेश एदबाण, प्रशांत लोणकर, किरण मलमकर, अजय यादव, सुदेश अंबादे, दिलीप नंदेश्वर, आकाश पाटील, रियाज उल हक, विलास ढोके यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# उद्योग गेले कुठे? तीन तालुके बेरोजगारीच्या विळख्यात

## धामणगाव रेल्वेत एमआयडीसीचा 'एल्गार'; खा.अमर काळेंची उद्योगमंत्र्यांकडे आक्रमक मागणी

**वर्धा/अमरावती जनमाध्यम**

एका बाजूला विकासाच्या गप्पांचा धुरळा उडवायचा आणि दुसऱ्या बाजूला तरुणांच्या हाताला कामच द्यायचे नाही, असा कारभार चांदूर रेल्वे विधानसभा मतदारसंघात सुरू असल्याचा आरोप होत आहे. धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यांत मोठ्या उद्योगांचा पत्ता नसल्याने रोजगाराच्या संधी खुंटल्या आहेत. परिणामी स्थानिक तरुणांना रोजगारासाठी शहरांची वाट धरावी लागत आहे. या प्रश्नाला आता खासदार अमर शरदराव काळे यांनी थेट उद्योग विभागाच्या दरबारात धडक दिली आहे. वर्धा लोकसभा मतदारसंघातील अमरावती जिल्ह्यात येणाऱ्या धामणगाव रेल्वे येथे तातडीने नवीन औद्योगिक वसाहत म्हणजेच एमआयडीसी मंजूर करावी, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी उद्योग, गुंतवणूक व सेवा मंत्री उदय सामंत यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



**तीन तालुक्यात एकही उद्योग नाही**

चांदूर रेल्वे विधानसभा मतदारसंघातील धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर हे तीन तालुके औद्योगिक विकासापासून दूर राहिले आहेत. गेल्या अनेक वर्षांत या भागात मोठा उद्योग किंवा महत्त्वाचा औद्योगिक प्रकल्प उभा राहिला नसल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेला अपेक्षित चालना मिळालेली नाही. उद्योग नसतील तर रोजगार कुठून येणार आणि रोजगार नसेल तर तरुणांनी करायचे काय, हा थेट प्रश्न खासदार काळे यांनी उपस्थित केला आहे. स्थानिक युवकांनी यापूर्वी धामणगाव रेल्वे येथे एमआयडीसी उभारण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेत खासदारांनी आता शासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

**रेल्वे-रस्ते जोडणीचा फायदा; तरीही दुर्लक्ष**

धामणगाव रेल्वे हे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने मध्यवर्ती आणि महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे येथे औद्योगिक वसाहत उभारल्यास उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण होऊ शकते. छोटे-मोठे उद्योग, प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रातील व्यवसायांना चालना मिळून स्थानिक युवकांसाठी रोजगाराची दारे खुली होऊ शकतात.

**एमआयडीसी द्या, स्थलांतर थांबवा**

औद्योगिक वसाहत मंजूर झाल्यास केवळ नोकऱ्या निर्माण होणार नाहीत, तर स्थानिक तरुणांना उद्योग-व्यवसाय उभारण्याची संधीही मिळेल. त्यामुळे धामणगाव रेल्वे येथे एमआयडीसी मंजुरीचा निर्णय आता कागदोपत्री आश्वासनांमध्ये अडकवू नये. शासनाने तातडीने निर्णय घेऊन औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करावी, अशी आक्रमक मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे. तरुणांच्या हाताला काम आणि परिसराच्या अर्थकारणाला गती देण्यासाठी धामणगाव रेल्वे येथे एमआयडीसी कधी हा प्रश्न आता शासनासमोर उभा ठाकला आहे.

### स्कॉर्पिओ देतो म्हणत साडेपाच लाख उकळले

**गिरड-** सेकंड हॅन्ड स्कॉर्पिओ वाहन देण्याचे आमिष दाखवून गिरड येथील वेल्डिंग व्यावसायिकाची तब्बल पाच लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कैलास अंबादास सहारे यांच्या तक्रारीवरून नागपूर येथील युनुस खान याच्याविरुद्ध गिरड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीला सेकंड हॅन्ड चारचाकी वाहन खरेदी करायचे होते. ओळखीच्या व्यक्तीमार्फत त्यांची युनुस खान याच्याशी ओळख झाली. आरोपीने बँकेने जप्त केलेली स्कॉर्पिओ असल्याचे सांगून तिची किंमत पाच लाख ५९ हजार रुपये असल्याचे सांगितले. वाहन पाहिल्यानंतर फिर्यादीने आरोपीच्या बँक खात्यात टप्प्याटप्प्याने एकूण पाच लाख ५० हजार रुपये जमा केले. मात्र, पैसे मिळाल्यानंतरही वाहन ताब्यात देण्यात आले नाही.

# तृतीय पंथीयांसाठीच्या कार्यक्रमासाठी स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

तृतीयपंथीय एक दुर्लक्षित घटक असून या घटकास विकास प्रक्रियेत आणण्यासाठीं त्यांचा सर्वांगीन विकास करण्याकरीता त्यांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करुन देणे, त्यांचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छुक संस्थांनी १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असून, या घटकास समाजाकडून सापत्न व भेदभावाची वागणुक दिली जाते. नेहमीच भेदभाव व सापत्न वागणुकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासून दुर्लक्षित राहीलेला आहे. त्यामुळे या समाज घटकाचे शासनामार्फत मुलभूत अधिकाराचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देण्याकरिता तृतीयपंथीय व्यक्ती (हक्काचे संरक्षण) कायदा, २०१९ नियम २०२० संपूर्ण देशात लागू झालेला आहे.

तृतीयपंथीय व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करुन देणे, त्यांचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यासाठी विविध शिबिरांचे आयोजन करुन त्यांना राष्ट्रीय ओळखपत्र व प्रमाणपत्र देणे, रेशनकार्ड, मतदार नोंदणी करणे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे व त्यांना कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन करणे आहे. जाणिव जागृती कार्यशाळा, प्रचार प्रसिध्दी अंतर्गत तृतीयपंथीयांबाबत भेदभाव रोखणे करिता शाळा, महाविद्यालयामधिल शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आश्रमशाळा कर्मचारी, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक जिल्हास्तर तसेच तालुकास्तरावरिल शासकीय कार्यालयामध्ये जाणिव जागृती कार्यकम, कार्यशाळा तसेच अनुषंगीक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. तसेच स्वयंरोजगार मेळावे, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम घेवुन प्रशिक्षण देणे, तृतीयपंथीयांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करणे ईत्यादी कार्यक्रमाचे ३१ऑक्टोंबर पर्यंत आयोजन करावयाचे आहे.

सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेकडून अर्ज, प्रस्ताव मागविण्यात येत आहे. ईच्छुक स्वयंसेवी संस्थेने त्यांच्या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्रासह ते सदर कार्यक्रम व उपक्रम आयोजीत करण्यास ईच्छुक असल्याचे लेखी अर्ज १५ सप्टेंबर पर्यंत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय येथे सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.

# रासायनिक खतांना फाटा देत सोयाबीनचा सेंद्रिय प्रयोग

## आयुर्वेदिक पद्धतीचा वापर; एकरी १२ क्विंटल उत्पादनाचा प्राथमिक अंदाज

**आर्वी/जनमाध्यम**

रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढत असताना आर्वी तालुक्यातील प्रा. सुधाकर भुयार यांनी सेंद्रिय आणि आयुर्वेदिक पद्धतीचा वापर करून सोयाबीन उत्पादनाचा प्रयोग केला आहे. नोकरी आणि राजकारणाची जबाबदारी सांभाळत त्यांनी स्वतःच्या शेतात हा प्रयोग राबविला असून, पहिल्याच प्रयत्नात पीक समाधानकारक आल्याचा त्यांचा दावा आहे.

या प्रयोगात सोयाबीन पिकासाठी रासायनिक खतांचा वापर न करता आयुर्वेदिक तसेच सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करण्यात आला. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासोबतच उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने हा प्रयोग करण्यात आला आहे. सध्या पिकाची स्थिती पाहता एकरी सुमारे १२ क्विंटल उत्पादन मिळण्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



**उत्पादन खर्च कमी करण्यावर भर**

शेतीमध्ये वाढत असलेल्या निविष्ठांच्या किमतींमुळे शेतकऱ्यांसमोर उत्पादन खर्चाचे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करून कमी खर्चात उत्पादन घेण्याच्या पद्धतींकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. त्याच पार्श्वभूमीवर भुयार यांनी हा प्रयोग केला आहे.

**प्रयोगातून शेतकऱ्यांना प्रेरणा**

सोयाबीन हे आर्वी परिसरातील प्रमुख खरीप पीक असून, हवामानातील बदल, वाढता उत्पादन खर्च आणि विविध पिकांवरील रोग-किडींचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. या पार्श्वभूमीवर सेंद्रिय पद्धतीने घेतलेल्या सोयाबीनच्या प्रयोगाकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष वेधले गेले आहे.

भुयार यांच्या मते, शेतीत केवळ पारंपरिक पद्धतीवर अवलंबून न राहता प्रयोगशील दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. जमिनीचे आरोग्य, उत्पादन खर्च आणि अपेक्षित उत्पादन यांचा समतोल साधत शेती करण्याचा प्रयत्न त्यांनी या प्रयोगातून केला आहे.

मात्र अंतिम उत्पादनाची आकडेवारी काढणीनंतर स्पष्ट होणार असून, त्यानंतर या पद्धतीची प्रत्यक्ष आर्थिक परिणामकारकता अधिक स्पष्ट होईल.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मान्सूनने दिला पश्चिम विदर्भाला धोका!

## ४० लाख हेक्टर कापूस,सोयाबीन व तूर संकटात

**अमरावती-** यंदाच्या मान्सूनने पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांना अक्षरशः धोका दिला असून, पावसाचे उशिरा आगमन, सुरुवातीची अनिश्चितता, काही काळातील अतिवृष्टी, दुबार-तिबार पेरणी आणि त्यानंतर ऑगस्टमध्ये पडलेल्या अभूतपूर्व दीर्घ कोरड्या खंडामुळे यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा आणि वर्धा या सहा जिल्ह्यांतील सुमारे ४० लाख हेक्टर कोरडवाहू कापूस, सोयाबीन, तूर व इतर खरीप पिकांचा विस्तीर्ण पट्टा गंभीर उत्पादन-जोखमीखाली आला आहे.ऑगस्ट २०२६ मध्ये विदर्भात सरासरीच्या तुलनेत तब्बल ५८ टक्के पावसाची तूट नोंदवली गेली. अकोल्यात ८४ टक्के, अमरावतीत ८२ टक्के आणि यवतमाळमध्ये ७८ टक्के तूट नोंदली गेल्याने पिकांच्या सर्वात निर्णायक अवस्थेत जमिनीतील ओलावा संपत चालला आहे.




कापूस पाते, फुले आणि बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे; सोयाबीन फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या निर्णायक टप्प्यात आहे; तुरीची वाढ खुंटत आहे. त्यामुळे 'हंगाम संपल्यानंतर नुकसान किती झाले याचा पंचनामा करण्यापेक्षा आज शेतात उभे असलेले पीक आणि जिवंत असलेला शेतकरी वाचविण्याची वेळ आहे,' असा इशारा विदर्भ जनआंदोलन समितीचे शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी दिला आहे.

तिवारी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पश्चिम विदर्भातील परिस्थिती 'कृषी आणीबाणी' म्हणून हाताळण्याचे आवाहन केले आहे.ऑगस्टच्या कोरड्या खंडाने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले.उपलब्ध पर्जन्य आकडेवारीनुसार ऑगस्ट २०२६ मध्ये विदर्भात सामान्य २९७.१ मिलिमीटरच्या तुलनेत केवळ १२५.५ मिलिमीटर पाऊस झाला.म्हणजे ५८ टक्के तूट. जून ते ऑगस्ट या संपूर्ण कालावधीतील संचयी तूट सुमारे २२ टक्के असली तरी शेतीच्या दृष्टीने एकूण पाऊस किती झाला यापेक्षा तो कधी पडला, किती दिवसांचा खंड पडला आणि पिकाच्या कोणत्या अवस्थेत पाणी मिळाले, हे अधिक महत्त्वाचे आहे. पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये ऑगस्टचे चित्र अधिक गंभीर आहे. अकोला ८४ टक्के, अमरावती ८२ टक्के, यवतमाळ ७८ टक्के, वर्धा ७३ टक्के, वाशीम ७१ टक्के आणि बुलढाणा ६१ टक्के तुटीचा सामना करत आहे.

## संक्षिप्त

### जिल्ह्यात विविध ठिकाणी शिक्षक दिन



#### डी.एस.काळे विद्यालय

**चांदूर बाजार-** स्थानिक डी एस काळे विद्यालयात शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'स्वयंशासित शाळा' उपक्रम अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षपद शाळेच्या मुख्याध्यापिका कडू यांनी भूषवले. तर प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शक म्हणून शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. यामध्ये सन्माननीय मोहड,मस्के, खुळे,घाटे आणि विधाते हे विशेष अतिथी म्हणून प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. त्यानंतर स्वयंशासित शाळा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक आणि पर्यवेक्षक यांची भूमिका साकारत विविध वर्गांवर जाऊन अध्यापनाचे धडे दिले.अध्यक्षीय भाषणात कडू यांनी विद्यार्थ्यांच्या नियोजनाचे कौतुक केले आणि शिक्षकांचे समाजातील स्थान व जबाबदारी यावर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित मोहड,मस्के,खुळे,घाटे आणि विधाते यांनीही विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.या कार्यक्रमाचे संचालन अवनी वरघट हिने केले, तर उपस्थितांचे आभार चिरंजीव रामटेके याने मानले. विद्यालयात राबवण्यात आलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे पालक आणि परिसरवासीयांकडून भरभरून कौतुक होत आहे.




#### पीडीएमसी महाविद्यालय

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे मा. अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षक दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करून त्यांना योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



#### शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**अंजनगाव बारी-** बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य अजय चौबे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका प्रिया वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन व संचालन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना समर्पित गाणी, नृत्य व भाषणांतून कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी प्राचार्य अजय चौबे, संगीत शिक्षक शैलेंद्र बोडे व श्वेता ढोके यांच्या संगीतमय सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली. या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. शिक्षकांसाठी आयोजित मनोरंजक खेळांमध्ये शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे कौतुक करताना प्राचार्य अजय चौबे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वैशाली खाडेकर यांनी आभार मानल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था, अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा, विद्यालयाच्या प्राचार्य, तथा मुख्याध्यापिका आर. जी. कुंमरे या होत्या तर प्रमुख अतिथी अशोक शिक्षण संस्था, संचालक. प्रा.एच.एन.बोके व प्रा.एस.आर जिरापुरे, एस.आर. इसळ, व्ही.आर.इंगोल, एस. एस.चव्हाण, इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये अनुश्री बेहरे, आनंदी मुरायते, माही चुंगळे अक्षरा सम्भ,सान्वी धर्माळे, अंतरा कुऱ्हेकर, पूर्वा गभने,पंखुडी धरपवार, श्रावस्ती ढोणे, जानवी भागवत, अर्णवी नागपुरे, लवकेश बैरागी, मयुरी राठोड, नम्रता भोगे, मिताली



बनारसे, वंशिका नारनवरे वैशाली वानखडे,रितू भोसले कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संचालक, प्रा.एच.एन. बोके, एस.एस.चव्हाण प्रा.एस.आर.जीरापुरे, व्ही.आर.इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शिक्षक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या याच कार्यक्रमांमध्ये दरवर्षीप्रमाणे एस. एस.सी.परीक्षा व एच.एस. सी.परीक्षेमध्ये यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख अतिथीच्या हस्ते त्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमा चे संचालन, प्रा.एस.पी. ढोले,पी. एम. राऊत यांनी केले हा कार्यक्रम सांस्कृतिक विभागा तर्फे आयोजित करण्यात आला होता.या सम्पूर्ण कार्यक्रमाचे संचालन अनुष्का कुरळकर हिने केले तर आभार शर्वरी सुने हिने केले. या कार्यक्रमाला प्रा.एन. एस. घुणारे, प्रा.एम.एच. वाळके,प्रा. एस. पी. रवाळे,ए. बी.चांबटकर,एन. डी. राठोड,एस. व्ही. चौधरी,के.एन. ढगे,जे. पी. निमकर,एच. बी. जाधव,एस.ए. पारवे,व्ही. जी. बेठेकर,एस. एस. इरपाते,युनिस खान इत्यादी वर्ग ५वी ते १२वी चे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## दामोदर महाराज महाविद्यालयात शिक्षक दिन

**लेहेगाव-** दामोदर महाराज महाविद्यालय, नेरपिंगळाई. येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज. यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिता दे. उमप होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. देविदास शं. उमप होते. शिक्षक दिनाबद्दल प्रा. हर्षा चर्तुभुज यांनी शिक्षकांचे जिवनात महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल सौ. प्रतिक्षा बरडे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. रेणुका वानखडे, प्रा. ओमप्रकाश उमप तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कॉलेज चे क्लर्क शुशांत मडगे यांनी केले.

## शिक्षक दिनी जनता विद्यालयात 'स्वयंशासित शाळा'चा अभिनव प्रयोग

**अंजनगाव बारी-** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून जनता विद्यालय, अंजनगाव बारी येथे विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'स्वयंशासित शाळा' हा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या विविध भूमिका जबाबदारीने पार पाडत प्रत्यक्ष शालेय कामकाजाचा अनुभव घेतला. स्वयंशासित



शाळेचे मुख्याध्यापक आदित्य हटवार व पर्यवेक्षिका श्रावणी शेलोकार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड व पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. गोकुळाष्टमीचे औचित्य साधून इयत्ता पाचवीतील गौरी बेरड व निर्भय चुरागडे यांनी राधा-कृष्णाची भूमिका साकारत उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या विविध भूमिकांमुळे विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यानंतर विविध उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन यश खाकरे व आभार राशी ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन कल्पना भटकर, डॉ. अर्चना पोकळे, जयश्री पवार व प्रवीण सोळंके यांनी केले. सर्व शिक्षकवृंदाचे त्यांना सहकार्य लाभले.

## प्रा.शेळके यांना पीएच.डी.; घोडे अकॅडमीतर्फे सत्कार

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे तालुक्यातील अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या टेंभुर्णी या छोट्याशा गावातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत आपल्या मेहनतीच्या जोरावर उच्च शिक्षणाची वाटचाल करणारे प्रा. श्रीकांत आनंदराव शेळके यांनी जीवशास्त्र विषयातील बुरशीशास्त्र या शाखेत पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक आणि संशोधनात्मक यशामुळे चांदूर रेल्वे तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. प्रा. श्रीकांत शेळके यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाची जिद्द कायम ठेवली. जीवशास्त्रातील बुरशीशास्त्र या महत्त्वपूर्ण विषयात त्यांनी संशोधन



करून डॉक्टरेट पदवी मिळवली. या उल्लेखनीय यशाबद्दल स्थानिक घोडे अकॅडमी येथे अकॅडमीचे संचालक प्रा. अंकुश घोडे यांच्या पुढाकाराने प्रा. श्रीकांत आनंदराव शेळके यांचा शिक्षकवृंदाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. अंकुश घोडे, आकाश मोटघरे, अतुल उज्जैनकर, मनोज सांधेकर, ऋषिकेश कळमकर, तन्मय पुनसे, हर्षल मेश्राम,पूजा कलाने,अनुष्का गुजर,ऋतिका रंगारी, प्रांजली गुजर आणि निकिता नेमाडे यांच्यासह अकॅडमीचे शिक्षकवृंद उपस्थित होते. टेंभुर्णी या ग्रामीण भागातून सुरू झालेला शैक्षणिक प्रवास पीएच.डी.पर्यंत पोहोचवत प्रा. श्रीकांत शेळके यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसमोर शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून यश मिळविण्याचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल चांदूर रेल्वे शहर व तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## तोंगलाबादच्या राष्ट्रीय विद्यालयात शिक्षक दिन

**खल्लार-** शिक्षकांच्या ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांच्या जिवनाला योग्य दिशा मिळते. अशा शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, तोंगलाबाद शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा कांताबाई रामकृष्ण मुळे,प्रमुख अतिथी संतनगरी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक राहुल उत्तमराव तांदळे तर विशेष अतिथी म्हणून युवराज कमल धोंडफळे (आर्किटेक्ट, स्टेप इंटिरियर) उत्तमराव तांदळे उपस्थित होते.यावेळी लोककल्याण शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र जळमकर, सहसचिव उपेंद्र गुलाबराव



कळसकर, संस्थेचे सदस्य डॉ. कपिल खोकले,शाळा समितीचे सदस्य पुंडलिकराव राऊत, शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र कंकाळे, सेवानिवृत्त शिक्षक गजानन कातखेडे तसेच वसतिगृहाचे अधिक्षक डिगांबर काळदाते यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा काळपांडे,श्रीकांत नांदुरकर,भूपेंद्र कळसकर,शैलेंद्र चांदेकर,मनीष वंजारे,डॉ. मनीषा मानकर,पंकज पेठे,संध्या चौरपगार,जया बीजवाडे, आरती चव्हाण व राहुल जळमकर यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन शैलेंद्र चांदेकर यांनी केले, तर आभार श्रीकांत नांदुरकर यांनी केले. शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



## विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल येथे शिक्षक दिन व दहीहंडी उत्सव

**लेहेगाव-** विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल, नेरपिंगळाई येथे शिक्षक दिन, दहिहंडी उत्सव आणि गोपाल-काल्याचे आयोजन करण्यात आले होते.शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि प्रथम महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वर्ग नर्सरी ते वर्ग ३ री पर्यंतचे विद्यार्थी राधा-कृष्णा यांच्या मनमोहक वेशभुषेमध्ये वर्ग ४थी आणि ५ वी च्या विद्यार्थ्यांनी मनोरा उभारून वर्ग ४ थी च्या हार्दिक साजनराव पांडे या विद्यार्थ्याने उंचावरील दहीहंडी फोडली. तसेच वर्ग ६ वी ते वर्ग ८ वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित शिक्षकांची भूमिका पार पाडली त्यानिमित्त सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिकेच्या भूमिकेतील विद्यार्थीनी मनस्वी होले हिने स्विकारले तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षिकेच्या भूमिकेतील रविना पांडे आणि आशिमरा माहीन जाएद अली यांनी स्वीकारले होते. कार्यक्रमाचे संचालन राधिका जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक सिद्धांत म.दाभेकर,शाळेच्या सहाय्यक शिक्षिका मयुरी बुरंगे,अनुराधा मोरस्कर,सायली इंगळे, प्रिया झोडगे, प्रतिक्षा कोहळे, प्रतिक्षा यावले, निकिता जाणे,बुशरा शेख,रोशनी भालेराव,पल्लवी तायडे,गायत्री राऊत,समिक्षा बेहरे उपस्थित होत्या. तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी शिला उपरिकर,सुवणा पातुरकर उपस्थित होत्या.शाळेच्या संचालिका सौ सोनालीताई ग.नवले आणि गजाननराव रा. नवले यांच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये हा कार्यक्रम पार पडला.

## शिरजगाव मोझरीत कृष्णभक्तीचा जागर

## ढोल-ताशांच्या गजरात कृष्णमूर्तींची मिरवणूक

**शिरजगाव मोझरी-** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शिरजगाव मोझरी येथे सायंकाळी कृष्णमूर्तींची मिरवणूक भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. गावातील नागरिकांनी घरोघरी श्रीकृष्णमूर्तींची पूजा व आरती करून त्यानंतर मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत सहभागी केल्या. सजविलेल्या श्रीकृष्णमूर्ती घेऊन नागरिक मिरवणुकीत सहभागी झाले. ढोल-ताशांचा गजर आणि



कृष्णनामाचा जयघोष यामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले होते. महिला, पुरुष, युवक तसेच बालकांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.मिरवणूक हनुमान मंदिरात पोहोचल्यानंतर तेथे सर्व श्रीकृष्णमूर्ती यांची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक नदीकडे रवाना झाली.नदीपात्रात श्रीकृष्णमूर्तींचे भाविकांनी श्रद्धा आणि भक्तिभावाने कृष्णमूर्तींचे विसर्जन केले.घरोघरीची पूजा,सामूहिक आरती आणि पारंपरिक पद्धतीने निघालेली मिरवणूक यामुळे शिरजगाव मोझरीत कृष्ण जन्माष्टमीचा उत्सव उत्साहात साजरा झाला. गावकऱ्यांच्या एकजुटीने पार पडलेल्या या सोहळ्याने उत्सवाला विशेष रंगत आणली.

## ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगमध्ये शिक्षक दिन व श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, चांदूर रेल्वे येथे शिक्षक दिन तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडून जन्माष्टमीचा उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत जय हिंद क्रीडा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तसेच समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलेश विश्वकर्मा यांची उपस्थिती लाभली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिक्षक दिनानिमित्त भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात



आली. यावेळी डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका किती महत्त्वाची आहे,याबाबत मार्गदर्शन केले.शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे मार्गदर्शक असून,त्यांच्या संस्कारातून विद्यार्थ्यांना जीवनात योग्य दिशा मिळते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदरभाव ठेवून ज्ञान,शिस्त आणि प्रामाणिकपणाचा अंगीकार करावा,असेही त्यांनी सांगितले.

जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित दहीहंडी कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाचा संदेश देत सर्वप्रथम विद्यार्थिनींच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमास गोपालजी गुप्ता (इंदौर), गोलू भाऊ जैन, मनीषजी पोलाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक दिन आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या संयुक्त आयोजनामुळे महाविद्यालयात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# वाघिणीच्या हल्ल्यात २० वर्षांच्या तरुणीचा मृत्यू; गावकऱ्यांमध्ये प्रचंड दहशत


## मोर्शीनंतर आता चांदूर बाजारात वाघिणीचे तांडव

### संतप्त गावकऱ्यांकडून वनविभागाच्या वाहनांची तोडफोड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात सोनोरी येथे वाघिणीच्या हल्ल्यात रविवारी (दि.६) एका तरुण मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. मोर्शी तालुक्यातून चांदुरबाजार तालुक्यात मार्गक्रमण करत आलेल्या या वाघिणीमुळे सोनोरी आणि परिसरात नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनोरी येथील उर्मिला बाजीराव इवाने (वय १८) ही तरुणी आपल्या आईसोबत गावाजवळील शेतात





शेळ्यांसाठी चारा आणण्यासाठी गेली होती. चारा कापताना उर्मिला आणि तिच्या आईला वाघीण अचानक त्यांच्या दिशेने येताना दिसली. वाघीण अगदी जवळ आल्याचे पाहून आई जीवाच्या आकांताने गावाच्या दिशेने पळाली. तरुणीने स्वतःचा बचाव करण्यासाठी तातडीने झाडावर चढण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाघिणीने तिला झाडावरून खाली खेचून तिच्यावर हल्ला केला आणि सुमारे १५ ते २० फूट झुडपांमध्ये फरफटत नेले. मुलीच्या आईने गावात जाऊन आरडाओरडा केल्यावर नागरिक शेताकडे ☞(पान २ वर)

# पैशाच्या वादातून भावाचा घेतला जीव

## खोलीत डांबून लोखंडी सळईने मारहाण

### वरूड पोलिसांकडून आरोपी भावाला अटक

**वरूड/प्रतिनिधीः-** पैशांच्या कारणावरून झालेला वाद विकोपाला गेल्यानंतर सख्ख्या भावानेच आपल्या भावाला लोखंडी सळईने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना वरूड शहरातील पारडी चौक परिसरात घडली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या भावाचा उपचाराअभावी घरीच मृत्यू झाला. या प्रकरणी वरूड पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी भावाला अटक केली आहे. गजानन अनिल काळे (वय ३८) आणि मोहन अनिल काळे (वय ३५) हे दोघे भाऊ पारडी




चौक परिसरात अनेक वर्षांपासून राहत होते. दोघांनाही दारूचे व्यसन असल्याने त्यांच्यात वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी (५ सप्टेंबर) दुपारी पैशांच्या कारणावरून दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. यावेळी वादाचे रूपांतर मारहाणीत झाले.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, मोहन याने गजाननला शिवीगाळ केल्यानंतर संतप्त झालेल्या गजाननने मोहनला एका खोलीत डांबले. त्यानंतर लोखंडी सळईने त्याच्यावर वारंवार मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेत मोहन गंभीर जखमी झाला. ☞(पान २ वर)

# पीक कर्जासाठी स्टॅम्प व प्रतिज्ञापत्राचा भुर्दंड?

### -बँकांनुसार वेगवेगळ्या कागदपत्रांची मागणी
### -नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकरी संभ्रमात

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** पीक कर्जासाठी काही बँकांकडून स्टॅम्प पेपर व प्रतिज्ञापत्राची मागणी केली जात असल्याने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची तक्रार शेतकरी वर्गातून पुढे येत आहे. विशेष म्हणजे विविध बँकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या कागदपत्रांची व वेगवेगळ्या मूल्याच्या स्टॅम्पची मागणी होत असल्याचे सांगण्यात येत असल्याने शेतकरी संभ्रमात पडले आहेत.

पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करताना काही बँकांमध्ये ५००/ १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र



मागितले जात असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे. तर काही बँकांमध्ये कमी मूल्याच्या स्टॅम्पवर ही प्रक्रिया पूर्ण केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पीक कर्जासाठी नेमके कोणते कागदपत्र आवश्यक आहे आणि कोणत्या मूल्याचा स्टॅम्प पेपर बंधनकारक आहे, याबाबत एकसमान माहिती उपलब्ध नसल्याने संभ्रम वाढत आहे.

आधीच वाढता शेती उत्पादन खर्च, नैसर्गिक संकटे आणि बाजारभावातील अनिश्चिततेमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत पीक कर्ज मिळविण्यासाठी अतिरिक्त स्टॅम्प व प्रतिज्ञापत्रासाठी खर्च करावा लागत असल्यास त्याचा फटका विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना बसत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

एका बँकेत ५००/ १०० रुपयांचा स्टॅम्प व प्रतिज्ञापत्र आवश्यक असल्याचे सांगितले जात असताना, दुसऱ्या बँकेत वेगळी प्रक्रिया का? ☞(पान २ वर)

# एसटी कामगारांच्या हक्कासाठी 'शिवप्रहार कामगार सेना'; बच्चू कडूंची घोषणा

### कामगार हितासोबत 'लालपरी'च्या आर्थिक बळकटीकरणाचे व्हिजन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधीः-** एसटी महामंडळातील कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्यासोबतच महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने 'शिवप्रहार कामगार सेना' या नव्या संघटनेची घोषणा आमदार बच्चु कडू यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील सुभेदार शासकीय विश्रामगृहात



केली. हाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेची 'लालपरी' ही केवळ बस नसून त्यांच्या जीवनाची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे कामगारांचे प्रश्न सोडवतानाच एसटीचे उत्पन्न वाढविणे, प्रवासी संख्या वाढविणे आणि महामंडळाला सक्षम करण्यासाठी ठोस ☞(पान २ वर)




**बाजारपेठ सजली**

अमरावती : बैलपोळा, लाडक्या बाप्पाचे आगमन आणि महालक्ष्मीच्या स्वागतासाठी अमरावतीत बाजारपेठेत सजली आहे.

# अखेर बंद असलेला माळवेशपुरा गेट रस्ता पूर्वरत सुरू

### -दैनिक जनमाध्यम इम्पॅक्ट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील माळवेशपुरा गेट ते अचलपूर नाका पर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे काम सुरू आहे.मात्र संबंधित ठेकेदाराने मनमर्जीने माळवेशपुरा गेट परिसर अनेक दिवसापासून बंद केल्याने वाहनचालकांना अडचणीचा सामना करावा लागत होता. याबाबत विविध


जनमाध्यम
अचलपूर नाका ते माळवेशपुरा गेट पर्यंतचे सिमेंट काँक्रीटीकरण संशयाच्या भोवऱ्यात

समस्यांचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.यानंतर या वृत्ताची तत्काळ दखल घेत माळवेशपुरा गेट परिसर पूर्वरत सुरू झाल्याने वाहनचालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनेक ठिकाणी या रस्त्याचे रुंदीकरण कमी - जास्त असल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहे .अचलपूर शहरातील माळवेशपुरा गेट येथून अचलपूर नाकाकडे जाणाऱ्या वाहनचालकांची नेहमी गर्दी असते . मात्र माळवेशपुरा गेट जवळ त्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे काम सुरू आहे.यामुळे माळवेशपुरा गेट जवळ हा रस्ता काही दिवसासाठी बंद करण्यात आला होता. पण हा रस्ता बंद करताना ☞(पान

## रमेशराव उंडे कुटुंबाची प्रज्ञा प्रबोधिनी संस्थेस एक लक्ष रूपयांची देणगी



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री.गोकुळष्टमीचे मुहूर्तावर अमरावती शहरातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व श्री.नारायण मंदीर, भाजीबाजार संस्थानचे विश्वस्त रमेशराव उंडे परिवाराने प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती संस्थेस पारधी समाजाच्या उत्थानासाठी कार्य करण्यास व विवेकानंद छात्रावासाच्या मदतीसाठी रू.एक लक्ष एवढी देणगी दिली. यावेळी त्यांनी विवेकानंद छात्रावासास भेट दिली व प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. रूपये एक लक्ष किमतीचा धनादेश त्यांचेकडून संस्थेचे अध्यक्ष अविनाश देशपांडे व त्यांच्या चमुने स्विकारला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मुकुंद देशपांडे, प्रविण जोशी☞(पान २ वर)

# खैरीया नगरात जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेची धाड

### 'गोलू' ताब्यात; ताशपत्त्यांसह मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध जुगार अड्ड्यांविरोधात कारवाई सुरू असतानाच गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ ने गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खैरीया नगर परिसरात सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकली. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून ५२ ताशपत्त्यांसह एकूण १० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शुक्रवारी, ५ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेच्या पथकाने खैरीया नगर परिसरात ही कारवाई केली. शेख अलबक्श शेख मन्नान ऊर्फ गोलू (वय २४, रा. अलहिलाल कॉलनी, अमरावती) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. खैरीया नगर परिसरात जुगार सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी माहितीची खातरजमा करून संबंधित ☞(पान २ वर)

# चालकाचे संतुलन बिघडल्याने ट्रक झाडावर आदळला

**मोर्शी/प्रतिनिधीः-** विटाभट्टीसाठी वापरण्यात येणारी राख खाली करून परत जाणाऱ्या मोठ्या डंपर ट्रक चालकाला अचानक चक्कर आल्यामुळे गाडीवरील चालकाचे संतुलन बिघडले व ट्रक रोडखाली उतरून एका झाडावर जाऊन आदळला.आजूबाजूच्या लोकांनी घटनास्थळी धाव घेऊन कॅबिनमध्ये अटकलेल्या ट्रक चालकाला सुखरूप बाहेर काढले. सुदैवाने कोणत्याही प्रकारची प्राणहानी झाली नसून मोठा अनर्थ



टळला.

सदर घटना आज दि.६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता मोर्शी ते अमरावती रोडवर असलेल्या मडघे मंगल कार्यालयाजवळ घडली. प्राप्त माहितीनुसार माऊली जहांगीर येथील ट्रकचालक किशोर बबनराव नाकाडे (वय ३५) याने सोफिया औष्णिक प्रकल्प येथून डंपर ट्रक क्र एम एच २७ बी एक्स ९३ ९३ मध्ये विटाभट्टी साठी व बांधकामासाठी वापरण्यात ☞(पान २ वर)

# विदर्भात पावसाचा जोर ओसरणार

### ११-१२ सप्टेंबरला पुन्हा पावसाचे वातावरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** कमी दाबाचे क्षेत्र उत्तरेकडे सरकल्याने विदर्भातील पावसाचा जोर आता ओसरण्याची शक्यता आहे. येत्या १० सप्टेंबरपर्यंत विदर्भातील काही भागांत विखुरलेल्या स्वरूपात हलक्या पावसाच्या सरी कोसळू शकतात. दरम्यान, ११ व १२ सप्टेंबरला पुन्हा पावसाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी व्यक्त केली आहे.

सध्या कमी दाबाचे क्षेत्र विदर्भापासून उत्तरेकडे सरकल्याने व्यापक किंवा जोरदार पावसासाठी पोषक स्थिती कमी झाली आहे. मात्र, स्थानिक हवामानातील बदल तसेच अरबी समुद्राकडून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे काही भागांत हलका पाऊस होऊ शकतो. त्यामुळे विदर्भात पावसाचे वितरण समान राहणार नसून काही ठिकाणी सरी, तर काही भागांत कोरडे वातावरण राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. ही स्थिती अनुकूल ठरल्यास ११ व १२ सप्टेंबरदरम्यान विदर्भात पुन्हा पावसाचे वातावरण तयार होऊ शकते. मात्र, त्याची तीव्रता आणि व्याप्ती सध्या निश्चित सांगता येत नसल्याचे हवामान अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

पाकिस्तान आणि राजस्थानकडून येणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांचा प्रभाव सध्या वाढला आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरातून पश्चिमेकडे सरकणाऱ्या हवामान प्रणालींच्या हालचालींवर परिणाम होण्याची शक्यता ☞(पान २ वर)

# कावड यात्रेनिमित्त दर्यापूरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त

### शिस्तीत व आनंदमय वातावरणात उत्सव साजरा करा- ठाणेदार अजित राठोड

**खल्लार/प्रतिनिधीः-** कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच कावड यात्रा शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावी, यासाठी दर्यापूर पोलिसांकडून तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

कावड यात्रेदरम्यान शहरातील प्रमुख मार्ग, चौक तसेच संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, वाहतूक



सुरळीत राहण्यासाठीही आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली ☞(पान २ वर)

# अंबाडा येथील युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथून जवळच असलेल्या अंबाडा येथील एका ३५ वर्षीय युवा शेतकऱ्याने कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना दि.५ सप्टेंबर रोजी घडली.मृतक युवकाचे नाव सुशील मधुकर वाघमारे रा. अंबाडा असे आहे.



प्राप्त माहितीनुसार अंबाडा येथील सुशील मधुकर वाघमारे यांची शेती चरूड शेत शिवारात असून त्यांनी आपल्या शेतात सरकारी बँकेचे कर्ज घेऊन सोयाबीन,तूर, कपाशीची पेरणी केली होती.सुरुवातीला पीक बऱ्यापैकी जमिनीतून वर येऊन डौलाने उभे होते. मात्र निसर्गाच्या अवकृपेमुळे जवळपास एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे पीक सुकू लागले.नगदी असलेले सोयाबीन पीक सुद्धा पूर्णतः खराब झाल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा तथापि बँकेचे कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत सुशील हा नेहमी राहत होता.दि ५ सप्टेंबर रोजी तो नेहमीप्रमाणे दु.२ वाजता आपल्या शेतात गेला व त्याने टोकाची भूमिका घेऊन शेतात असलेल्या झोपडीच्या मयालीला दोरीचा गळफास घेऊन आत्महत्या केली. सुशील घरी रात्री उशिरापर्यंत पोहचला नसल्यामुळे गावातील काही नागरिकांनी त्याच्या शेताकडे धाव घेऊन बघितले असता सुशील हा फाशी घेऊन लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. लगेच या घटनेची माहिती दूरध्वनीवरून मोर्शी पोलिसांना देण्यात आली. मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची ☞(पान २ वर)

# डॉ. सुधांशु तायडे यांचे युपीएससी -सीएमएस परीक्षेत यश

**खल्लार/प्रतिनिधीः-** ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या कामगिरीची नोंद करत येवदा येथील डॉ. सुधांशु तायडे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची सी. एम. एस. परीक्षा प्रथम प्रयत्नातच उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशामुळे येवदा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. डॉ. सुधांशु तायडे यांच्या यशाचा प्रवास हा विशेष कौतुकास्पद आहे.



येवदा येथिल जिल्हा परिषद शाळेतून त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर काशीबाई अग्रवाल विद्यालयातून माध्यमिक शिक्षण घेतले. पुढे अकोला येथील ☞(पान २ वर)